सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

Solapur Tarun Bharat

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | रविवार, २५ ऑगस्ट २०२४ | वर्ष दुसरे | अंक १५३ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


## राज्यात मान्सून पुन्हा सक्रिय

मुंबई : राज्यात मान्सून पुन्हा सक्रिय झाला आहे, ज्यामुळे रत्नागिरी जिल्ह्याला रेड अर्लट तर मुंबईसह पालघर, ठाणे या प्रमुख जिल्ह्यांसाठी ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. मुंबईत मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता आहे, तर ठाणे आणि पालघर जिल्ह्यांमध्ये रविवारी (२५ ऑगस्ट) पावसाची तीव्रता वाढणार आहे. मुंबई आणि नजीकच्या भागात शुक्रवारीच पावसाचा जोर वाढलेला दिसून आला.

भारतीय हवामान विभागाच्या अंदाजानुसार, महाराष्ट्राच्या किनारपट्टीपासून पूर्व मध्य अरबी समुद्रात कमी दाबाचे क्षेत्र तयार झाले आहे, ज्यामुळे राज्यात पुढील चार ते पाच दिवस मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. या काळात काही ठिकाणी मेघगर्जनेसह पाऊस पडू शकतो.

मुंबईत शनिवारी सकाळी ८.३० वाजता सुरू होणाऱ्या २४ तासांच्या कालावधीसाठी ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे, ज्यामध्ये शहरातील काही भागात अतिमुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. पालघर आणि ठाणे जिल्ह्यांमध्येही शनिवारी मुसळधार पाऊस पडेल, आणि रविवारी याची तीव्रता वाढू शकते. त्यामुळे नागरिकांनी खबरदारी घेण्याची आवश्यकता आहे.

कोल्हापूर, रायगड, सिंधुदुर्ग, पुणे, सातारा आणि विदर्भातील काही जिल्ह्यांमध्येही ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. पुणे आणि साताऱ्यातील घाट परिसरात शनिवार ते सोमवारपर्यंत पावसाचा जोर वाढण्याचा अंदाज आहे.

या सर्व परिस्थितीत, राज्यातील नागरिकांना हवामानाच्या बदलांवर लक्ष ठेवून आवश्यक ती खबरदारी घेण्याचा सल्ला दिला आहे, मुसळधार पावसामुळे जलभराव, वाहतूक कोंडी आणि अन्य अडचणी उद्भवू शकतात.

# गृहमंत्री आणि पोलिसांना शिव्याच खाव्या लागतात : देवेंद्र फडणवीस

नाशिक : गृहमंत्री आणि पोलिसांना शिव्याच खाव्या लागतात. थँक्स लेस हा जॉब आहे, त्यांना अवार्ड मिळत नाही. पोलिसांमध्येही माणूस आहे. चांगल्याला चांगलं आणि वाईटाला वाईट म्हटलं पाहिजे. नाशिक पोलिसांनी सकारात्मक बदल घडवला आहे. कायदा आणि सुव्यवस्था आहे हे पोलिसांनी दाखवले. स्टार्सचे स्वागत आणि सत्कार करण्याचे भाग्य लाभले याचा मोठा आनंद झाला, हा अभिमानाचा क्षण आहे अशा शब्दांत गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. ते नाशिकमध्ये बोलत होते.

महिलांच्या सुरक्षेसाठी प्रत्येक युनिटमध्ये 'दामिनी पथक' सुरु केले आहे. वेगवेगळ्या ॲप्स आणि नंबरच्या मदतीने महिलांना या सेवा तात्काळ पुरवण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. शाळांमध्ये पोलीस दीदी 'गुड टच बॅड टच'चे मुलींना प्रशिक्षण देत आहेत. तसेच 'भरोसा सेल'च्या माध्यमातून त्रासित महिलांना मदत केली जात आहे, अशी माहिती यावेळी फडणवीस यांनी दिली.

पोलिसांचे जीवन अतिशय चॅलेंजिंग जॉब झाला आहे. पूर्वी कायदा सुव्यवस्था ठेवण्यासाठी वेगवेगळ्या गोष्टी वापराव्या लागत होत्या. व्हाईट कॉलर क्राईम व्हायला लागल्या आहेत. जमीन, ड्रग्स असं विषय आता आले आहेत. देशातील १०० वर्षे जुने ब्रिटिशकालीन कायदे होते. मात्र, मोदी आणि अमित शाह यांनी कायदे बदलले, असेही फडणवीस यावेळी म्हणाले.

या सुधारित नवीन कायद्याला प्रगत तंत्रज्ञानाची जोड देण्यात आली आहे. सोशल मीडिया हे अभिव्यक्तीचे एक माध्यम आहे. परंतु, त्याचा चुकीचा वापर करून अनेक गुन्हे घडत आहेत. वाढलेल्या आर्थिक गुन्ह्यांना जलद गतीने रोखण्यासाठी महाराष्ट्र पोलीस विभागाने एक 'डायनॅमिक प्लॅटफॉर्म' तयार करून सर्व सोशल मीडिया कंपन्या आणि बँकांना एकत्रित आणले आहे. या प्लॅटफॉर्मचे काम सध्या प्रगतीपथावर सुरु असून कोणताही आर्थिक गुन्हा झाल्यास तो तात्काळ डिटेक्ट होईल, अशी व्यवस्था उभारण्यात आली आहे. याशिवाय घडलेल्या गुन्ह्यांचा प्रभावी तपास करण्यासाठी आणि फॉरेन्सिक कॅपॅसिटी वाढवण्यासाठी 'फॉरेन्सिक व्हॅन्स' पोलीस आयुक्तालयांना देण्यात आल्या आहेत, अशी माहितीही फडणवीस यांनी यावेळी दिली.

ड्रग्जचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढत असल्याने केंद्र सरकारने याविरुद्ध 'झीरो टॉलरन्स पॉलिसी' सुरु केली आहे. तसेच ड्रग्ज प्रकरणात पोलिसांचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष सहभाग असल्यास त्यांना बडतर्फ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, असेही फडणवीस यावेळी म्हणाले.

महिलांवरील गुन्हे हे अतिशय संवेदनशीलपणे हाताळले जावेत, अशी माझी पोलिसांकडून अपेक्षा आहे. समाजाने वाढत्या विकृतींकडे लक्ष देणे महत्त्वाचं आहे. तसंच, आपल्या मुलांना महिलांविषयी आदर आणि सन्मान शिकवणं व तो जागृत करणं गरजेचं आहे. ही भावना वाढीस लावली तर आणि तरच आपण वाढत्या विकृतींना आळा घालू शकतो.

## अणुस्कुरा घाटात दरड कोसळल्याने राजापूर-कोल्हापूर मार्ग बंद



रत्नागिरी : राजापूर तालुक्यातील अणुस्कुरा घाटात आज पहाटे पाच वाजण्याच्या सुमारास दरड कोसळली. त्यामुळे राजापूर ते कोल्हापूर मार्गावरची वाहतूक बंद पडली आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाने जेसीबी आणि कर्मचारी तातडीने घाटात पाठविले असून वाहतूक पूर्ववत सुरू करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. राजापूर आणि परिसरातून कोल्हापूरकडे जाणारा हा सर्वात जवळचा घाटस्ता आहे. त्यामुळे या भागातील वाहतूक त्याच घाटातून सुरू असते. अणुस्कुरा घाटातील निसर्गसौंदर्यही अप्रतिम असल्याने अनेक पर्यटक याच मार्गाने प्रवास करतात. दरड कोसळल्याने सध्या वाहतूक बंद पडली आहे. सायंकाळपर्यंत वाहतूक सुरू होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. मात्र त्या भागात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे घाटाच्या दुरुस्तीच्या कामात अडथळे येत आहेत.

## राज्य सरकारी कर्मचाऱ्यांसह शिक्षक २९ तारखेपासून बेमुदत संपावर

अलिबाग : राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना महाराष्ट्र आणि कर्मचारी शिक्षक समन्वय समितीतर्फे सोमवारी बेमुदत संपाची नोटीस सरकारला देण्यात आली होती. त्यानुसार गुरुवारी पासून महाराष्ट्रातील सर्व सरकारी, निमसरकारी कर्मचारी व शिक्षक बेमुदत संपावर जाणार असल्याची माहिती संघटनेच्या वतीने देण्यात आली. रायगड जिल्हयातील कर्मचारी व शिक्षकही या संपात सहभागी होणार आहेत. यादिवशी सकाळी तालुक्यातील सर्व कर्मचारी व शिक्षक तहसिलदार कार्यालयावर मोर्चा आयोजित करणार आहेत. अलिबाग येथे रायगड जिल्हयाचे जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी व जिल्हा पोलीस अधिक्षक यांना संपाबाबतचे निवेदन सादर करण्यात आले.

## नदीकाठावरील गावातील नागरिकांना सतर्कतेचा ईशारा

अहमदनगर दि. २४ ऑगस्ट : पुणे जिल्ह्यात अतिवृष्टीचा ईशारा देण्यात आला आहे. खडकवासला, घोड व इतर धरणातुन विसर्ग सुरु असल्याने श्रीगोंदा तालुक्यातील भीमा व घोड नदी तसेच कर्जत तालुक्यातील भीमा नदीकाठावरील नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. तसेच नाशिक जिल्ह्यातील नांदुर मधमेश्वर धरणातुन गोदावरी नदी पात्रामध्ये विसर्ग सुरु असुन नाशिक व अहमदनगर जिल्ह्यात सुरु असलेल्या पावसामुळे गोदावरी नदीतील विसर्गामध्ये वाढ होऊ शकते. त्यामुळे कोपरगाव, राहाता, श्रीरामपुर व नेवासा तालुक्यातील गोदावरी नदीकाठावरील गावातील नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. त्याचबरोबर भंडारदरा धरण पाणलोट क्षेत्रात अतिवृष्टी झालेली असून प्रवरा नदीच्या विसर्गात वाढ झालेली आहे. निळवंडे धरणातून प्रवरा नदीपात्रात विसर्ग सुरू असून संततधार पाऊस वा अतिवृष्टी झाल्यास विसर्गामध्ये वाढ होऊ शकते.पर्यायाने ओझर बंधाऱ्यावरून प्रवरा नदीच्या विसर्गात वाढ होऊ शकते. त्यामुळे जिल्ह्यातील अकोले, संगमनेर, राहाता, राहुरी, श्रीरामपूर व नेवासा तालुक्यातील प्रवरा नदी काठावरील नागरिकांना सतर्कतेचा ईशारा देण्यात आला आहे.

नदीकाठावरील गावांनी स्थानिक प्रशासनाद्वारे देण्यात आलेल्या सुचनांचे पालन करावे. सखल भागात राहणाऱ्या नागरिकांनी तातडीने सुरक्षितस्थळी स्थलांतर करावे. नदी,ओढे व नाल्याकाठच्या नागरिकांनी दक्ष रहावे. पाणी पातळीत वाढ होत असल्यास नागरिकांनी नदीपात्रापासुन तसेच ओढे व नाले यापासुन दुर रहावे व सुरक्षित स्थळी स्थलांतर करावे. नदी अथवा ओढे नाल्यावरील पुलावरुन पाणी वाहत असल्यास पुल ओलांडू नये. पूर पाहण्यासाठी गर्दी करु नये. जुनाट, मोडकळीस आलेल्या व धोकादायक इमारतीमध्ये आश्रय घेऊ नये. अतिवृष्टीमुळे भूस्खलन होण्याची व दरडी कोसळण्याची शक्यता असते. त्यादृष्टीने डोंगराच्या पायथ्याशी राहणाऱ्या लोकांनी दक्षता घ्यावी व वेळीच सुरक्षित स्थळी स्थलांतर करावे. घाट रस्त्याने प्रवास करणे शक्यतो टाळावे. धरण व नदीक्षेत्रामध्ये पर्यटनासाठी जाणाऱ्या नागरिकांनी विशेष खबरदारी घ्यावी. नदीच्या पाण्याच्या प्रवाहामध्ये उतरू नये, धोकादायक ठिकाणी सेल्फी काढू नये. मेघगर्जना होत असताना झाडांच्या खाली न थांबता सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा. आपत्कालिन परिस्थितीमध्ये नजीकच्या तहसिल कार्यालय, पोलीस स्टेशन यांच्याशी संपर्क साधावा. तसेच जिल्हा नियंत्रण कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथील दूरध्वनी क्रमांक १०७७ (टोल फ्री) अथवा ०२४१-२३२३८४४, २३५६९४० येथे संपर्क साधावा, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, अहमदनगर अतुल चोरमारे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

## पुण्यात खराब हवामानामुळे हेलिकॉप्टर कोसळले

पुणे : पुणे जिल्ह्यातील पौड जवळ आज, शनिवारी एका खासगी कंपनीचे हेलिकॉप्टर क्रॅश झाले. ही दुर्घटना खराब हवामानामुळे घडल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.

पुणे जिल्ह्यातील पौड गावाजवळ आज शनिवारी एक खासगी हेलिकॉप्टर कोसळून अपघात झाला. हे दुर्घटनाग्रस्त हेलिकॉप्टर एका खासगी विमान कंपनीचे आहे. ते मुंबईहून हैदराबादला जात होते. यादरम्यान ते कोसळले. या हेलिकॉप्टरमधून ४ जण प्रवास करत होते. या दुर्घटनेत कोणी जखमी झाले आहे का? याची माहिती घेतली जात असल्याचे पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक पंकज देशमुख यांनी सांगितले. पौड जवळ असलेल्या घोटावडे या ठिकाणी ही भीषण दुर्घटना घडली आहे. खराब हवामान आणि पाऊस यामुळे हे हेलिकॉप्टर क्रॅश झाले असावे असा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. या अपघाताची माहिती मिळताच परिसरात मोठी गर्दी झाली आहे.






## बदलापूर घटनेवरून भाजप आणि महाविकास आघाडी आमने सामने





तभा वृत्तसेवा

हिंगोली, २४ ऑगस्ट

बदलापूर घटनेच्या पार्शवभूमीवर भाजप आणि महाविकास आघाडीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांनी महात्मा गांधी चौकात आंदोलन केले. यावेळी दोन्हीकडच्या आंदोलकांनी एकमेकांच्या नेत्यांविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. भाजपने बदलापूर घटनेचा जाहीर निषेध करीत आरोपीला कठोर शिक्षा व्हावी अशी मागणी केली तर महाविकास आघाडीने तोंडाला काळी पट्टी बांधून घटनेचा आणि महायुती सरकारचा निषेध केला. विरोधक आणि सत्ताधारी आमनसामने आल्यामुळे कायदा व सुयवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून चोख पोलीस बंदोबस्त लावण्यात आला होता.

बदलापूर घटनेच्या पार्शवभूमीवर महाविकास आघाडीने घटनेविरोधात आणि सत्ताधारी महायुती सरकारविरोधात काळया पट्टी तोंडाला बांधून निषेध आंदोलन सुरू केले. या आंदोलनात कॉंग्रेस आ. प्रज्ञा सातव, माजी आ. भाऊराव पाटील गोरेगावकर, जिल्हाध्यक्ष दिलीप देसाई, उबाठा शिवसेनेचे जिल्हाप्रमुख गोपू पाटील यांच्यासह कॉंग्रेस. राष्ट्रवादी. उबाठा शिवसेनेचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते तोंडाला काळी पट्टी बांधून आंदोलनात सहभागी झाले होते. दुसरीकडे भाजपनेही बदलापूर घटनेचा निषेध करण्यासाठी आ. तान्हाजी मुटकुळे यांच्या नेतृत्वाखाली घटनेचा निषेध करण्यासाठी आणि आरोपीला कठोर शिक्षा द्यावी अशी मागणी करीत आंदोलन सुरू केले. यावेळी जिल्हाध्यक्ष फुलाजी शिंदे.माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर यांच्यासह पदाधिकारी आणि कार्यकर्ते आंदोलनात सहभागी झाले होते. सत्ताधारी आणि विरोधक आमने सामने आल्यामुळे अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलीस प्रशासनाने जादा पोलीस बल तैनात केले होते. एकीकडे सत्ताधारी आरोपीला फाशीची शिक्षा व्हावी यासाठी आंदोलन करीत होते तर दुसरीकडे महाविकास आघाडी घटनेचा निषेध करीत राजकारण करीत असताना दिसत होते. तोंडाला काळी पट्टी बांधूनही महायुतीच्या नेत्याविरोधात घोषणाबाजी करीत होते. त्यामुळे भाजप कडूनही महाविकास आघाडीच्या नेत्यांविरोधात घोषणाबाजी सुरु झाली. घटना बाजूलाच राहिली आणि आंदोलनात राजकारण शिरलं.


दरम्यान, महाविकास आघाडीच्या नेत्यांनी सर्व सामान्य लोक आंदोलनात उत्स्फूर्त पणे सहभागी होतील अशा वल्गना केल्या होत्या परंतु आंदोलनात राजकीय पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांच्याशिवाय सामान्य माणूस फिरकला सुद्धा नाही. उलट बाजारपेठा नेहमीप्रमाणे सुरळीत सुरु होत्या.

## महाराजाने केला अल्पवयीन मुलीवर अत्याचार; आरोपीस अटक

तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.२५ ऑगस्ट :- तालुक्यात खळबळजनक घटना घडली असून आश्रमात असणाऱ्या अल्पवयीन पीडितेवर नराधम महाराजाने अत्याचार केल्याची घटना घडली आहे

पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार तालुक्यातील माऊली वारकरी कन्या आश्रम जैतापुर गट क्र.१३१ येथे हा निंदनीय प्रकार घडला असून दि.२४ रोजी उघडकीस आला,या आश्रमात तब्बल १५ मुली वास्तव्यास असून या आश्रमाचा महाराज आरोपी दादासाहेब पुंडलिक अकोलकर वय ६७ वर्ष याने अल्पवयीन पीडितेवर अत्याचार केल्याची खळबळजनक घटना उघडकीस



आली आहे,

अल्पवयीन पीडिता ही जवळ असलेल्या शाळेत शिक्षण घेत असून माऊली वारकरी कन्या आश्रम येथे वास्तव्यास होती दि.२० मंगळवार रोजी पीडिता इतर मुलीनं समवेत रात्री झोपी गेली असता आरोपी महाराजाने पीडितेला उठवून हात,पाय,चेपून देण्यासाठी लगत असलेल्या शेडमध्ये बोलावले,पीडित गेली असता पीडितेकडून हात,पाय चेपून घेऊन तिच्यावर अत्याचार केला आणि कोणाला काही सांगू नये असे धमकावत पाठवले,पहाटे पुन्हा परत आरोपी महाराज आला आणि दुसऱ्या अल्पवयीन पीडितेला बोलावून घेतले,पण त्यावेळी कोणी आल्याचा आवाज आल्याने दुसरी पीडिता निसटून बाहेर आली,त्यावेळी घडलेली हकीकत त्यांनी ऐकमेकींना



सांगितली,

दोन दिवस शाळेतील शिक्षक सुट्टीवर असल्याने पीडितांना घरच्यांना माहिती देत आली पण दि.२४ रोजी पीडितेने घरच्यांना सदर घटनेची माहिती दिली पीडिता आणि घरच्यांनी कन्नड ग्रामीण पोलिस स्टेशन गाठले सदर घटनेचे गांभीर्य बघता उपविभागीय पोलिस अधिकारी विजकुमार ठाकूरवाड,सहाय्यक पोलिस निरीक्षक डॉ.रामचंद्र पवार यांनी तत्काळ पथके रवाना करत आरोपी महाराज यास ताब्यात घेतले,

महाराजांच्या या कृत्यामुळे तालुक्यात रोष व्यक्त होत आहे भारतीय न्यास संहिता अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे अधिक तपास उपविभागीय पोलिस अधिकारी विजयकुमार ठाकूरवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस निरीक्षक डॉ. रामचंद्र पवार करत आहेत

उपविभागिय पोलीस अधिकारी विजयकुमार ठाकूरवाड,पोलिस निरीक्षक बाळासाहेब भापकर,सहाय्यक पोलिस निरीक्षक रामचंद्र पवार, सहाय्यक उपनिरीक्षक कदिर पटेल , बीट जमादार कैलास करवंदे, संजय आटोळे , संदीप कणकुटे ,अमोल गायकवाड ,रामचंद्र बोंद्रे,धीरज चव्हाण, मोनिका बाविस्कर ,रेखा चव्हाण , सुकेनिशी कांबळे, यांनी घटनास्थळी भेट दिली.




## बदलापूरच्या अत्याचार विरोधात कन्नड मध्ये काळ्या फिती लावून निषेध



तभा वृत्तसेवा

कन्नड:- दि २५ ऑगस्ट - शहरातील पिशोर नाका येथे महाविकास आघाडीचे वतीने महाराष्ट्रात राज्यभर होत असलेल्या महिलांवर व शाळेमध्ये विविध प्रकारचे मानसिक अत्याचार, विनयभंग आणि बदलापूर येथे झालेल्या चार वर्षे दोन अल्पवयीन विद्यार्थिनीवर लैंगिक शोषणाच्या प्रकरणाच्या विरोधात निषेध करण्यात आला

महाविकास आघाडीच्या वतीने पिशोर नाका येथे काळ्या फिती लावून, काळे झेंडे दाखवून महाराष्ट्र शासनाचा निषेध केला सकाळी ११ वाजेच्या सुमारास पिशोर नाक्यावर महा विकास आघाडीचे कार्यकर्ते एकत्र जमा होऊन तोंडाला काळी पट्टी बांधून, दंडाला काळे रिबीन, हातात काळे झेंडे घेऊन शासनाचा निषेध केला. या आंधळ्या व बहिऱ्या महाराष्ट्र शासनाच्या आणि विशेष करून गृह राज्य मंत्र्याचा या ठिकाणी काळे झेंडे दाखवून निषेध केला. संपूर्ण महाराष्ट्रात कायदा सुव्यवस्था कोलमडली असून गृह खाते हे झोपेचे सोंग घेत आहे. बदलापूर सारख्या ठिकाणी एवढी मोठी घटना घडून सुद्धा शासन कठोर भूमिका अजून ही घेत नाही. त्यामुळे जनतेचा रोष वाढत आहे.

यावेळी शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख अवचित वळवळे, शिवसेना तालुकाप्रमुख संजय मोटे, राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष (शरदचंद्र पवार गट) प्रसन्ना पाटील, काँग्रेस तालुकाध्यक्ष गणेश पाटील शिंदे, किसान संघटने जिल्हाध्यक्ष बाबा मोहिते, तालुका संघटक डॉ अण्णा शिंदे, शहरप्रमुख डॉ सदाशिव पाटील, सरपंच अशोक दाबके, उपतालुका प्रमुख शिवाजी थेटे, राष्ट्रवादी शहराध्यक्ष इमरान शालिमार, काँग्रेस शहराध्यक्ष असद खान, नगरसेवक बंटी सुरे, माजी नगरसेवक भगवान शिंदे, चिकलठाण विभाग प्रमुख कल्याण चव्हाण, कामगार आघाडी शहर अध्यक्ष किसन भालेराव, उपशहर प्रमुख चंद्रकांत लाडे, हिंदराज लखवाल, तुकाराम बोरकर, रामराजे देशमुख, प्रकाश काचोळे, अतीक बॉड, गोकुळ राठोड, भास्कर दांडगे, अक्रम शेख, आसिफ शेख, सह महाविकास आघाडीचे कार्यकर्ते उपस्थित होते.

## सोयगावात महावितरणचा महागोंधळ

### विजेचा प्रश्न कायमस्वरूपी सोडवण्याची मागणी

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२४ ऑगस्ट

शहरात थोडासा जरी पाऊस पडला की विजपुरवठा खंडित केला जातो.गुरुवारी रात्री पाऊस सुरु होताच वीज गुल झाली काही भागात रात्रभर वीज गायब होती. महावितरणकडून नेहमीच काम करण्यासाठी दिवसदिवस लाईट बंद ठेवून नेमकं काय काम केलं असा संतप्त सवाल महावितरण च्या भोंगळ कारभाराला वैतागलेले नागरिक विचारत आहे..

सोयगाव शहरातील विजपुरवठा गेल्या काही महिन्यापासून सुरळीत होत नाही. कधी रोहित्र जळतात,कधी केबल खराब होतात तर कधी फ्यूज उडणे डियू पडणे या कारणामुळे लाईट जाते.प्रत्येक भागात ह्या समस्या आहेत.तसेच सोयगाव च्या ३३ के.व्ही.उपकेंद्रात बिघाड होतो.त्यामुळे अनेकदा तासंतास वीज पुरवठा खंडीत होतो.बऱ्याच वेळा मेंटेन्स साठी दिवस दिवस वीज पुरवठा बंद ठेऊन काम केले जाते.तेव्हा आता लाईट जाणार नाही वीज पुरवठा सुरळीत होईल असे वाटते परंतु वारंवार जाणाऱ्या लाईट ची समस्या कायम आहे. सध्या तर पाऊसाच्या हलक्या सरी सुरु होताच वीज पुरवठा खंडीत होत आहे.त्यामुळे नागरिकांना खूप त्रास होत आहे.गुरुवारी रात्री पाऊस सुरु होताच लाईट गेली काही भागात रात्री तीन वाजेपर्यंत विजपुरवठा खंडित होता तर गलवाडा फिडर वर रात्रभर लाईट नव्हती त्यामुळे अर्ध शहर रात्रभर अंधारात राहिलं.

उकाडा अन मच्छर

सोयगाव परिसरात सध्या प्रचंड गरमी आणि उकाड्यामुळे नागरिक हैराण आहे त्यात वीज पुरवठा खंडीत झाल्यावर पंखे बंद होतात त्यामुळे प्रचंड गरमी सहन करावी लागते सोबत डास मच्छर झोपू देत नाही..

महावितरण चे कर्मचारी रात्री नागरिकांचे फोन उचलत नाही,त्यामुळे अनेकवेळा युवक स्वतः रोहित्रावर जाऊन बिघाड दुरुस्त करतात महावितरण चे सोयगाव येथील वीज पुरवठ्याकडे पूर्ण दुर्लक्ष होत आहे.शहरातील या वीज समस्याकडे महावितरण च्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी गांभीर्याने लक्ष देऊन प्रश्न कायमस्वरूपी निकाली काढावा अशी मागणी होत आहे.

## लाडक्या बहिणींनी बांधली राखी,तालुक्यात पहिल्यांदाच शेकडो बहिणींनी बांधली राखी



तभा वृत्तसेवा

कन्नड : दि.२२ऑगस्ट - कन्नड तालुक्याचे लाडक्या बहिणीचे अध्यक्ष केतन काजे यांना रक्षाबंधनाच्या सणाला ज्या गावात गेले तेथे आमच्या बँक खात्यात पैसे आले म्हणत बहिणींनी राखी बांधून आभार व्यक्त केले .

निंभोरा येथे शिवसेना तालुकाप्रमुख केतन काजे यांना बोलावून गावातील शेकडो बहिणींनी जमा होऊन राखी बांधली, यावेळी

विनोद जाधव, अर्जुन काळे, दिलिप पवार, कार्तिक जैस्वाल, धनराज पवार, प्रभु सपकाळ, गौरव आहुजा,लक्ष्मण सोनवणे, सुभाष सोनवणे, रामप्रसाद कंचार,कारभारी सोनवणे, वसंत सोनवणे, वसंत जायभाये,कडुबा सोनवणे,देविदास घुगे,भगवान घुले, तुळशीराम घुगे, रऊप शहा,अरुण जायभाये, अनिल चिकसे, गोविंद शाहूराजे,रामहरी घुगे,सह ग्रामस्थ उपस्थित होते .

## शिवसेनेच्या वतीने बदलापूर घटनेचा दंडाला काळ्याफिती बांधून मूक निदर्शने



वाळूज महानगर (प्रतिनिधी) बदलापूर येथील शाळेत दोन बालिकावर झालेल्या अत्याचाराच्या निषेधार्थ बजाजनगर येथे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) व अखिल भारतीय काँग्रेस पक्षाच्या वतीने महाराणा प्रताप चौकात शनिवार २४ रोजी सकाळी ११ वाजता दंडाला काळेफिती व तोंडाला काळे रुमाल बांधून महायुती सरकार च्या विरोधात मुक निदर्शने करण्यात आली.

महाविकास आघाडीच्या वतीने शनिवार २४ रोजी महाराष्ट्र बंद चे आवाहन केले होते.मात्र न्यायालयाने हा बंद बेकायदेशीर ठरवला होता.त्यामुळे महाविकास आघाडीने बंद मागे घेतला.परंतु या घटनेच्या निषेधार्थ राज्यभर शिवसेनेच्या वतीने शांततेच्या मार्गाने आंदोलन करत राज्य शासनाचा निषेध केला.

बजाजनगरातील महाराणा प्रताप चौकात शनिवारी अकरा वाजता शिवसेना व काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी एकत्रित येत आंदोलन केले यावेळी आंदोलकांनी हातात बदलापूर घटनेतील नराधमांना फाशीची शिक्षा द्या, महिलांना पंधराशे रुपये नको, सुरक्षा द्या अशा आशयाचे फलक घेत शासनाचा धिक्कार केला.

यावेळी शिवसेना तालुका समन्वयक सचिन गरड,उपतालुकाप्रमुख कैलास भोकरे, विष्णू जाधव,गणेश नवले,सुदाम भांडे, उपजिल्हाप्रमुख बाप्पा दळवी, विशाल खंडागळे,काँग्रेसचे वाळूजमहानगराध्यक्ष अर्जुन आदमाने, पोपटराव अदीक,नंदकुमार साळुंके, कृषी उत्पन्न समितीचे संचालक महेंद्र खोतकर,माजी पंचायत समिती सदस्य सतीश पाटील, उपशहर प्रमुख सय्यद बिबन,किशोर खांडरे, ग्रामपंचायत सदस्य विजय सरकटे,संभाजी चौधरी, काकाजी जीवरग,विभाग प्रमुख नामदेव सगडे,संतोष चंदन,सतीश हिवाळे,रोहित चव्हाण,लखन सलामपुरे,भागचंद खरात,आसाराम करपे,नवनाथ मनाळ,राजेश पाटील, रतन नलावडे अनिकेत थोरात तुषार ढवळे, सागर उगले,अक्षय साळुंखे,प्रशांत पथरीकर,आशिष ताजने,योगेश दुबीले,गोकुळ राठोड, प्रदीप मलोदे,गौरव खनासे,सागर पाटील,प्रवीण चव्हाण, यश चव्हाण,रोहित भालेकर,अनुदीप डबडे,आकाश हिवाळे,प्रणव तवले, सतीश शिंदे,गणेश औटे,विशाल सौदागर,अमित देशमुख,स्वप्निल राठोड,आशिष पवार,किरण बुचाले, प्रसाद काळे,सोमनाथ गायकवाड,बंटी बोरसे,केतन बगाडे,विजय टाक, विशाल राठोड,मयूर शेळके,शुभम पाटील यांच्यासह मोठ्या प्रमाणात शिवसैनिकांची उपस्थिती होती. यावेळी वाळूज एमआयडीसी पोलीस निरिक्षक कृष्णचंद्र शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक मनोज शिंदे, सुरेश कच्चे,एएसआय बन,बबन चोथे, विक्रम वाघ, विनोद नितनवरे, राजाभाऊ कोल्हे आदींनी चोख पोलीस बंदोबस्त ठेवला होता.

## महाराष्ट्रातील लघु व मध्यम उद्योगांसाठी सीआयआय तर्फे डिजिटल सक्षम उपक्रम

कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्री तर्फे आयोजित नवीन उपक्रम डिजिटल सक्षम द्वारे महाराष्ट्रातील एमएसएमई क्षेत्र डिजिटल बूस्टसाठी सज्ज आहे. उखख चा डिजिटल सक्षम कार्यक्रम डिजिटल तंत्रज्ञान आणि मायक्रो एंटरप्रायझेस यांच्यातील अंतर भरून काढण्यासाठी मास्टर कार्ड सोबत आयोजित करण्यात आला आहे. हा प्रकल्प १३ राज्यांमध्ये आणि ५५ हून अधिक औद्योगिक क्लस्टर्समध्ये प्रशिक्षण देत आहे. मास्टरकार्ड सेंटर फॉर इन्क्लुझिव्ह ग्रोथच्या भागीदारीत सीआयआय चा डिजिटल सक्शम हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प राज्यभरातील उद्योजकांना अत्यावश्यक डिजिटल साधने आणि कौशल्य संच, वाढ, शाश्वतता आणि जागतिक स्पर्धात्मकतेला चालना देण्यासाठी महाराष्ट्रात परिवर्तनकारी भूमिका बजावत आहे.

## उद्योगातील वितरण सहयोगींसाठी रेस्ट पॉईंट बनविण्यासाठी 'प्रोजेक्ट आश्रय' लॉन्च

पुणे - डिलिव्हरी असोसिएट्सच्या हिताला पाठिंबा देण्याच्या अटल वचनबद्धतेचा एक भाग म्हणून ऍमेझॉन इंडिया ने 'प्रोजेक्ट आश्रय' लॉन्च करण्याची घोषणा केली. या कार्यक्रमाद्वारे, संपूर्ण लॉजिस्टिक उद्योगातील ड्रायव्हर्सना दिल्ली एनसीआर, बेंगळुरू आणि मुंबई सारख्या शहरांमध्ये मोक्याच्या ठिकाणी विश्रांतीच्या ठिकाणी प्रवेश मिळेल. उदयसा फाऊंडेशनच्या सहकार्याने, प्रारंभिक पायलट प्रकल्प उच्च-पायांच्या ठिकाणी पाच आश्रय केंद्रे स्थापन करेल, पहिल्या आश्रय केंद्राचे उद्घाटन आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेचे भारताचे देश संचालक मिचिको मियामोटो यांच्या हस्ते, बुलेवर्ड, मालिबू टाऊन, सेक्टर ४७, गुरुग्राम येथे होणार आहे. ऍमेझॉन वर, आम्ही डिलिव्हरी सहयोगींसाठी ऑन-रोड अनुभव वाढवण्यासाठी उद्योग-अग्रणी पायाभूत सुविधा आणि सर्वोत्तम पद्धती राखण्यासाठी वचनबद्ध आहोत. 'प्रोजेक्ट आश्रय' हा ड्रायव्हरचा अनुभव आणि कल्याण सुधारण्यासाठी आमच्या व्यापक प्रयत्नांचा एक महत्त्वपूर्ण भाग आहे. या अत्यावश्यक सुविधांसह समर्पित विश्रांती पॉईंट्स, आम्ही सर्व डिलिव्हरी सहयोगी, मग ते ऍमेझॉन किंवा इतर कंपन्यांसह, काम करत असताना त्यांना शक्य तितके सर्वोत्तम आणि आरामदायक वातावरण मिळावे हे सुनिश्चित करण्याचे आमचे ध्येय आहे, असे अभिनव सिंग, उपाध्यक्ष - ऑपरेशन्स, ऍमेझॉन इंडिया म्हणाले.

## नाला दाबल्याने जिप शाळेत कमरेइतके पाणी



तभा वृत्तसेवा

पैठण दि २४ :- आधीचे नगर परिषद सार्वजनिक वाचनालय तसेच आताचे आपला दवाखाना शेजारून गागाभट्ट कडे जाणारा महाकाय नाला नळ्या टाकून बंदिस्त केल्याने परिणामी पाऊस सुरू असतांना सदरील नाल्याचे पाणी जिल्हा परिषद प्राथमिक केंद्रात घुसल्याने केंद्रातील पोषण आहार अन्नधान्य आणि ईतर साहित्याचे नुकसान झाले आहे. सुदैवाने शाळा सुटल्यावर हा प्रकार घडला. बंदीस्त केलेला हा नाला पुन्हा उघडा करावा अशी मागणी पालकांनी केली आहे.

पैठण शहरातील मुख्य नाल्या पैकी एक असलेला जिल्हा परिषद कन्या प्रशाळा व्हाया हमालगल्ली,दलित वस्ती लहुजीनगर,राजीव गांधी व्यापारी संकुल,परदेशीपुरा ते गागाभट्ट चौक असा हा नाला परदेशी पुरा जवळ नळ्या टाकून बंदीस्त करण्यात आला. आता बंदिस्त ठिकाणी अवैध बांधकामाची तयारी असतांना शनिवारी दुपारी शहरात झालेल्या मुसळधार पावसामुळे नाल्याचे पाणी नाल्याच्या खेटून असलेल्या जिल्हा परिषद शाळेत घुसले .बघता बघता याठिकाणी कमरे एवढे पाणी साचल्याने शाळेचे प्रचंड नुकसान झाले आहे. सुदैवाने शाळा सुटल्यावर हा प्रकार घडल्याने मोठा अनर्थ टळला.बंदीस्त केलेला नाला पुन्हा मोकळा करावा अशी मागणी शाळेतील चुमुकल्यांच्या पालकांनी केली आहे. यावर मुख्याधिकारी संतोष आगळे काय कार्यवाही करणार याकडे सर्वांचे लक्ष लागले असून नाला बंदिस्त केल्याने दुर्घटना घडू शकते याचे वार्तांकन काही दिवसांपूर्वीच करण्यात आले होते.

## कायलॅक: स्कोडा ऑटो इंडियाची आगामी नवीन कॉम्पॅक्ट एसयूव्ही

छत्रपती संभाजीनगर, २१ ऑगस्ट २०२४ : आजचा क्षण स्कोडा ऑटो इंडियासाठी महत्त्वाचा टप्पा आहे, जेथे कंपनी आपल्या नवीन कॉम्पॅक्ट एसयूव्हीसह भारतातील नवीन युगाच्या दिशेने वाटचाल करत आहे. फेब्रुवारीमध्ये घोषणा आणि नुकतेच डिझाइनचे टीझर सादर केल्यानंतर वेईकलना कल्पनात्मक देशव्यापी मोहिमेच्या माध्यमातून नाव देण्यात आले आहे. हजारो व्यक्तींच्या आवडीला सादर करणाऱ्या स्कोडा ऑटो इंडियाच्या नवीन कॉम्पॅक्ट एसयूव्हीचे नाव असणार आहे कायलॅक, जी तिच्या भावी ड्रायव्हर्ससोबत अद्वितीय कनेक्शनची प्रतीक आहे. नावाच्या अनावरणाप्रसंगी मत व्यक्त करत स्कोडा ऑटो इंडियाचे ब्रँड संचालक पीटर जनेबा म्हणाले, ''आमची नवीन एसयूव्ही कायलॅक भारतातील नागरिकांसाठी आहे. ते देशातील आमच्या आतापर्यंतच्या सर्वात मोठ्या लाँचच्या प्रत्येक टप्प्याचा भाग असण्याची आमची इच्छा होती. 'नेम युअर स्कोडा' मोहिमेचा सहभागी आणि संभाव्य ग्राहकांमध्ये अभिमान व आपलेपणाची भावना जागृत करण्याचा मनसुबा होता. २००,००० हून अधिक प्रवेशिकांसह प्रतिसाद अत्यंत उत्स्फूर्त आहे. यामधून भारतातील आमचा वारसा अधिक दृढ होतो आणि लोकांमध्ये ब्रँड स्कोडाप्रती असलेली खास आवड दिसून येते. कारची नामकरण प्रक्रिया आमच्यासाठी महत्त्वाची आहे. आणि आगामी नवीन कॉम्पॅक्ट एसयूव्ही भारतातील झपाट्याने विकसित होत असलेल्या व सर्वात मोठ्या सेगमेंटमधील अल्टिमेट टप्प्याला सादर करते. कायलॅक सह व्यक्ती, ग्राहक व चाहत्यांनी स्वत:हून आमच्या नवीन फॅमिली मेम्बरला नाव दिले आहे, जेथे ही नवीन एसयूव्ही भारत व युरोपमधील टीम्सनी संयुक्तपणे विकसित केली आहे आणि स्थानिक पातळीवर उत्पादित केली जाईल.''

## वाळूज गणेश महासंघाच्या अध्यक्षपदी आरगडे तर कार्याध्यक्ष राऊत

वाळूज महानगर(प्रतिनिधी)- दरवर्षी प्रमाणे यंदाही गणेश भक्ताची बैठक होऊन त्यात सर्वांनुमते वाळूज गणेश महासंघ कार्यकारिणीची निवड करण्यात आली.बैठकीच्या अध्यक्षस्थानी गणेश महासंघाचे संस्थापक बबन गायकवाड हे होते.त्यात



अध्यक्षपदी संतोष आरगडे तर कार्याध्यक्ष म्हणून नंदकुमार राऊत यांची निवड जाहीर करण्यात आली. इतर पदाधिकारी असे- उपाध्यक्ष उत्तम बनकर,राजेंद्र मालुसरे,प्रविण साकला,सुखदेव गुंजाळ सचिव नंदु सोनवणे,सहसचिव रतीलाल राजपुत, कोषाध्यक्ष सचिन पानकडे,मनोज साबळे सल्लागार- सर्जेराव भोंड, शरदचंद्र अभंग,काकासाहेब चापे,सईदा पठाण,योगेश आरगडे,मनोज जैस्वाल,डॉ.अनिल गंगवाल,मुकेश बोहरा, डॉ.सि.टी.पवार, संजय खोचे,शिवप्रसाद अग्रवाल,नंदकुमार गांधीले,परमेश्वर खोमणे,मनोज पिंपळे,राहूल ढोले,शंकर कुंजर,रमेश आरगडे,विजय साबळे आदी.प्रसिध्दीप्रमुख प्रा.रमेश हातोडे,भरत गायकवाड, नानासाहेब जंजाळे आदी. महासंघाचे १८ वे वर्ष असून यंदाही विविध सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.परिसरातील गणेश मंडळाचे परिक्षण होऊन महासंघातर्फे विजेत्यांना बक्षीसे देण्याची परपंरा यंदाही सुरू राहणार आहे. त्यासाठी परवानगी घेतलेल्या गणेश मंडळांनी महासंघाच्या कार्यालयात नोंदणी करण्याचे आवाहन संघातर्फे करण्यात आले आहे.

## महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद कर्मचारी महासंघाच्या वतीने जुनी पेन्शन लागू करा



खुलताबाद प्रतिनिधी. दि २९ इतर सेवा विषयक मागण्याच्या अनुषंगाने बेमुदत संप पुकारलेला आहे.

जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगरच्या वतीने जिल्हा परिषद कर्मचारी संपात सहभागी होणार असल्याचे निवेदन मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने मा.श्री. सुदर्शन तुपे उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प. छत्रपती संभाजीनगर यांना महासंघाचे राज्य सरचिटणीस संजय महाळंकर, जिल्हाध्यक्ष गणेश धनवई, जिल्हा सरचिटणीस स्वप्निल घरमोडे, कार्याध्यक्ष ताहेर देशमुख कोषाध्यक्ष डॉ. ज्ञानेश्वर बिडाईत, कार्यालयीन सचिव दिनकर अहेवाड, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर सोनवणे, दत्तात्रय वाणी,उमेश मिसाळ, प्रसिद्धी प्रमुख शशिकांत गवळी, महासंघाचे जिल्हा पदाधिकारी रवि रेड्डी, के.आर. चव्हाण, दिपक साळुंके व विविध संवर्गाचे प्रतिनिधी उपस्थित होते

## स.भु. प्रशालेत दप्तर मुक्त शाळा कार्यक्रम साजरा



तभा वृत्तसेवा बिडकीन दि २४ ऑगस्ट पैठण तालुक्यातील श्री.सरस्वती भुवन प्रशाला बिडकीन येथे शासनाच्या आदेशानुसार आनंददायी शनिवार म्हणजे दप्तर मुक्त शाळा हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा झाला. विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळावा, त्यांच्या मधील उपजत क्षमतांचा विकास व्हावा म्हणून प्रशालेत शनिवारी दप्तर मुक्त शाळेचे आयोजन केले जाते. यामध्ये कला, क्रीडा, संगीत, साहित्य, कौशल्य विकास, सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते.या शनिवारी विद्यार्थ्यांमधील संगीत व गायन कलेचा विकास व्हावा म्हणून सांस्कृतिक विभाग प्रमुख सुजाता तोष्णीवाल व जयश्री महाजन यांनी संगीत मैफिलीचे आयोजन केले होते. यासाठी महाराष्ट्राची ख्यातनाम व राष्ट्रीय स्तरावरील व राज्य स्तरावरील पुरस्कार प्राप्त गायिका मृदुला सोनजे हिस निमंत्रित करण्यात आले होते. मृदुला सोनजे प्रस्तुत संगीत मैफिलीचे उद्घाटन शालेय समितीचे अध्यक्ष किसनलाल तोतला, धर्मेंद्र येवले यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी उपमुख्याध्यापक युवराज पाडळे, पर्यवेक्षिका मनिषा मिश्रा , राजू शिंदे यांची उपस्थिती होती .याप्रसंगी प्रशालेच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन गायिका मृदुला सोनजे हिचे स्वागत केले. मृदुला सोनजे ही महाराष्ट्रातील ख्यातनाम गायिका असून तिने स्टार प्रवाह आयोजित मी होणार सुपर स्टार टॉप मध्ये क्रमांक मिळवला आहे. तसेच तिने नांदेड फेस्टिव्हलमध्ये प्रथम क्रमांक , राज्यस्तरीय गायन स्पर्धा, धुळे आयोजित प्रथम क्रमांक , लता मंगेशकर मंच आयोजित स्पर्धा विजेती, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ आयोजित युवक स्पर्धेत विजेतेपद या सह विविध स्पर्धेत पारितोषिके प्राप्त केली आहे. कार्यक्रमाची सुरुवात शारदा स्तवनाने झाली. यानंतर मृदुला सोनजे हिने मराठी, हिंदी चित्रपटातील अनेक लोकप्रिय गीते आपल्या सुमधूर आवाजात सादर केली. विद्यार्थ्यांनी तिच्या प्रत्येक गाण्यावर ठेका धरत दाद दिली. यावेळी प्रशालेच्या संगित शिक्षिका अक्षदा चौथमल, त्रिंबक गावडे, राजू शिंदे यांनी देखील आपल्या गोड आवाजामध्ये गीते सादर केली. कार्यक्रमाचे संचालन राजू शिंदे यांनी तर आभारप्रदर्शन सुजाता तोष्णीवाल यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षक शिक्षिका शिक्षकेतर कर्मचारी यांनी प्रयत्न केले

## दिगाव तंटामुक्ती अध्यक्षपदी धनराज काकडे यांची निवड



तभा वृत्तसेवा

नाचनवेल : दि.२४. ऑगस्ट-कन्नड तालुक्यातील दिगाव खेडी येथे शुक्रवार दिनांक २३ ऑगस्ट रोजी सरपंच पुंजाराम सुसून्दे व उपसरपंच आलिम शेख यांच्या अध्यक्षते खाली धनराज काकडे यांची तंटामुक्ती अध्यक्ष पदी तर उपाध्यक्षपदी त्रिंबक माणिकराव सुसुंद्रे व इरफान इरशाद शेख यांची निवड करण्यात आली.

यावेळी नवनिर्वाचित निवड झालेल्या अध्यक्ष, उपाध्यक्ष यांची ग्रामपंचायत व ग्रामस्थांच्या वतीने शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला .तसेच आपण निपक्षपणे गावातील वाद-विवाद तंटे मिटवण्यासाठी प्रामाणिकपने प्रयत्न करून गावामध्ये शांतता राहण्यासाठी प्रयत्न करावे असे मत सरपंच यांनी व्यक्त केले यासाठी आपण एकत्रित येऊन कार्य करणे गरजेचे आहे असे प्रतिपादन ग्रामस्थांच्या उपस्थितीत व्यक्त केले. यावेळी ग्रामसेवक अरुण चव्हाण व ग्रामपंचायत सदस्य , गावातील ग्रामस्थ, आजी-माजी पदाधिकारी, तरुण मित्र मंडळ, नागरिक उपस्थित होते

## राज्याच्या १३ कोटी जनतेच्या वतीने देण्यात येणारे राज्य मराठी चित्रपट पुरस्कार अनमोल - सुधीर मुनगंटीवार

छत्रपती संभाजीनगर : मराठी चित्रपटसृष्टीसाठी अत्यंत महत्त्वाचे आणि मानाचे समजले जाणारे राज्य शासनाचे महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट पुरस्कार हे राज्यातील १३ कोटी जनतेचे प्रतिनिधी म्हणून राज्य शासनामार्फत दिले जातात. हे पुरस्कार अनमोल असल्याचे प्रतिपादन सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केले.



या वेळी सांस्कृतिक कार्य विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी व सांस्कृतिक विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे-पाटील, सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक विभीषण चवरे यांच्यासह चित्रपट क्षेत्रातील दिग्गज मान्यवर उपस्थित होते.

गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार २०२४ प्रख्यात गायिका अनुराधा पौडवाल यांना , प्रख्यात अभिनेत्री रोहिणी हट्टंगडी यांना चित्रपटांसाठी राज्य सांस्कृतिक पुरस्कार २०२४ आणि कंठसंगीतासाठी प्रख्यात गायक सुदेश भोसले यांना प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

यावेळी चित्रपती व्ही. शांताराम जीवनगौरव पुरस्कार २०२३ शिवाजी साटम, चित्रपती व्ही. शांताराम विशेष योगदान पुरस्कार २०२३, दिग्पाल लांजेकर यांना प्रदान करण्यात आला. स्व.राज कपूर जीवनगौरव पुरस्कार २०२३ आशा पारेख यांना तर स्व.राज कपूर विशेष योगदान पुरस्कार २०२३ एन चंद्रा यांना प्रदान करण्यात आले.

## अंजनाबाई थोटे यांचे निधन;आज अंत्ययात्रा



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२४ ऑगस्ट

येथील रहिवासी अंजनाबाई संतोष थोटे (वय.६०) यांचे शनिवार रोजी दुपारी १:३० वा.अल्पशा आजाराने निधन झाले.त्यांच्या पार्थिवावर रविवार रोजी सकाळी ११:०० वा.सोयगाव येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे. त्यांच्या पश्चात,एक मुलगा,एक मुलगी,सुन,नातवंडे,असा परिवार आहे.ते संजय थोटे यांच्या आई व दिपक थोटे यांच्या त्या आजी होत.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# जालन्यात महाविकास आघाडीने मौन बाळगून केले धरणे आंदोलन



## माजी मंत्री आमदार राजेश टोपे, आमदार कैलास गोरंट्याल यांच्यासह स्थानिकचे मविआचे पदाधिकारी आंदोलनात सहभागी

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

महाविकास आघाडीच्या वतीने मौन बाळगून धरणे आंदोलन करण्यात आलंय. जालना शहरातील महात्मा गांधी चौकात बदलापूर येथे घडलेल्या अत्याचाराच्या घटनेचा मविआच्या पदाधिकाऱ्यांनी निषेध केलंय. तोंडाला काळ्या पट्ट्या लावून महाविकास आघाडीच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी बदलापूर येथील अत्याचाराच्या घटनेचा निषेध व्यक्त करत पिडीत मुलींना न्याय मिळण्याची मागणी केलीय. महिला - मुलींवर होणारे अत्याचार थांबवण्यासाठी राज्य सरकारने पाऊल उचलावेत असं म्हणत बदलापूर घटनेतील दोषीला फाशीची शिक्षा देण्याची मागणी महाविकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी केलीय. माजी मंत्री आमदार राजेश टोपे, आमदार कैलास गोरंट्याल यांच्यासह जालन्यातील स्थानिकचे मविआचे पदाधिकारी या धरणे आंदोलनात सहभागी झाले होते. यावेळी राज्य सरकारच्या विरोधात जोरदार घो-षणाबाजीने परिसर दणाणून गेला होता.

## वाढोणा ग्रामपंचायतची निवडणूक बिनविरोध

# सरपंचपदी सौ.अकिलाताई सलीम तडवी यांची सर्वांनुमते

**तभा वृत्तसेवा**
**धावडा/प्रतिनिधी**

भोकरदन तालुक्यातील वाढोणा ग्रामपंचायतची दि. २१ ऑगस्ट रोजी जालना जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांच्या आदेशान्वये सरपंचपदाच्या निवडीची विशेष मासिकसभा पूर्वी सूचनेनुसार आयोजित करण्यात आली होती तसेच तहसीलदार भोकरदन यांच्या आदेशाने श्रीमती डी .एम हरगुडे मंडळअधिकारी धावडा यांची अध्यक्षअधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली होती त्यानुसार सरपंच पदाच्या सर्वप्रक्रिया अकरा ते बारा च्या दरम्यान शांततेत पार पडल्या तसेच सरपंचपद हे एस टी महिलासाठी राखीव असल्याने प्रथमच तडवी समाजाच्या सौ .अकिलाताई सलीम तडवी यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहेत.

तसेच या निवडणुकीत दुसरा या पदासाठी कोणाचाही अर्ज प्राप्त न झाल्याने फक्त सौ .अकिलाताई सलीम तडवी एस टी महिला यांची सरपंचपदी ग्रामपंचायत वाढोणा म्हणून बिनविरोध निवड करण्यात आली आहेत. तसेच यावेळी अध्यक्षअधिकारी यांनी अकरा ते बाराच्या दरम्यान सरपंचपद घोषित केले. तसेच ही निवड सर्वांच्या मते घोषित करण्यात आली आहेत, सदर निवडीसाठी शासकीय कर्मचारी गावातील प्रतिष्ठित नागरिक समस्तगावकरी व नवनिर्मित सरपंच . उपसरपंच . ग्रामपंचायत सदस्य .ग्रामसेवक .तलाठी . मंडळअधिकारी. यासह गावातील ज्येष्ठनागरिक आजी-माजी पुढारी महिला पुरुष यावेळी हजर होते. ही निवड पॅनलप्रमुख गव्हर्मेंट कॉन्ट्रॅक्टर राजेशभैया घुनावत . भाजपाजेष्ठ कार्योकर्त पदमसिंग राजपूत .प स सदस्य प्राचार्य गणेशजी इंगळे . यांच्या उपस्थित घोषीत करण्यात आली. याप्रसंगी माजीसरपंच श्रीमती तुळसाबाई संतोष गवळी . उपसरपंच सौ सुनिताताई राजेश घुनावत . ग्रा प सदस्य सौ पुष्पाबाई प्रमोद इंगळे . सौ राधाबाई ज्ञानेश्वर गव्हाणे . रमेश गवळी . रामदास गव्हाणे . शेनफड गवळी . याच्यासह गावकरी डॉ शालिकराम गवळी दिलीप घुनावत .सांडू जाधव . यासह शेकडो गावकरी उपस्थित होते अशी माहिती डॉ शालिकराम गवळी यांनी बोलताना माहीती दिली आहेत .

# संक्षिप्त

## प्रधानमंत्री विश्वकर्मा योजनेचा कामगाराने लाभ घ्यावा - अविनाश राठोड



**तभा वृत्तसेवा**
**तळणी/प्रतिनिधी**

प्रधानमंत्री विश्वकर्मा योजनेची ऑनलाईन अर्ज करण्याची सुरुवात करण्यात आली. त्यामध्ये दहिफळ खंदारे, माळेगाव, तळेगाव,नायगाव,इ गावातील कामगार, कलाकार ,सामान्य व्यक्ती आणि महिलाचा सहभाग होता. येथील सी.एस.सी सेंटरवर अर्जाची सुरुवात नायगावचे मा.सरपंच अविनाश राठोड यांच्या शुभहस्ते करण्यात आले. प्रसंगी त्यांनी स्वतःहून मीस्त्री कामगार रामानंद राठोड यांचा पीएम विश्वकर्मा या वेबसाईटवर ऑनलाइन पद्धतीने अर्ज भरला.

त्याप्रसंगी त्यांनी तालुकात्यातील आणि लगतच्या गावातील सुतार, लोहार, कुंभार, सोनार,मिस्त्री,मालाकार आणि धोबी इतर वर्गातील कामगारांनी या योजनेचा लाभ घ्यावा असे आव्हान केले. त्याचप्रमाणे इतर ग्रामपंचायतींच्या सरपंच, उपसरपंच, सदस्य ,ग्रामसेवक आणि वरिष्ठांनी या योजनेचा प्रसार आणि प्रचार कसा झाला पाहिजे आणि संबंधित कामगाराला या योजनेचा लाभ किंवा फायदा कसा मिळवून देता येईल त्यासाठी प्रयत्न करावे अशी विनंती त्यांनी या प्रसंगी केली. पात्र झालेल्या व्यक्तीला संबंधित कार्यालयाकडून कॉल येईल आणि त्यानंतर त्यांना सात ते पंधरा दिवस प्रशिक्षणासाठी बलविण्यात येईल.नायगाव येथील प्रशिक्षण पूर्ण केलेली प्रशिक्षणार्थी अच्चीत डवरे यांनी आप बिंती सांगितली संबंधित प्रशिक्षणामध्ये व्यवसायाची माहिती , भोजनाची मोफत व्यवस्था, संबंधित कामाची ऑनलाइन परीक्षा घेऊन ती आपल्या ईमेल द्वारे कार्यालयाला पाठवणे आणि नियमित ऑनलाईन हजरी सुद्धा यात घेतली गेली,प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर माझ्या आधार बेसच्या खात्यामध्ये चार हजार रुपये प्राप्त झाले आणि आठ दिवसानंतर जिल्हा कार्यालय येथे मला टूलकिट भेटणार असल्याचे त्यांनी सांगितले. पात्र झालेल्या लाभार्थ्यांना प्रशिक्षणापूर्वी आणि प्रशिक्षणा नंतर प्रमाणपत्र व स्वातंत्र्य आयडी कार्ड देण्यात येत असल्याचे राठोड यांनी शेवटी सांगितले. आज नायगाव येथील जवळपास ५० कामगारांनी ऑनलाईन अर्ज केले आहेत त्यामध्ये शोभा पवार, धोंडीराम आंभोरे, कृष्णा कोकाटे, नितीन राठोड, श्रीहरी मगर, लक्ष्मण चव्हाण इतर अर्जदाराचा सहभाग आहे.

कार्यक्रमाप्रसंगी श्रीहरी मगर, मारुती पवार, प्रदीप राठोड, यशोदाबाई राठोड, ज्योती राठोड, शंकर कोकाटे, अमोल राठोड, दीपक घुगे इतर अर्जदार उपस्थित होते.

## अवैध वाळु विक्री करणाऱ्या तीन वाळु तस्करांवर कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**अंबड/प्रतिनिधी**

अंबड गोद्रीं दिनांक २३ रोजी सहाय्यक पोलीस निरीक्षक आशिष खांडेकर यांना मिळालेल्या गुप्त बातमीवरून सपोनि खांडेकर व स्टाप तसेच पंच यांनी मिळालेल्या गुप्त बातमीवरुन गोदी शिवारातील सिध्देश्वर फाटा येथे गोदावरी नदी पात्रातुन सागर सुनिल नानकशाही हा चालवत असलेला रंगाचा स्वराज ८५५ लाल रंगाचा हेड असलेला टॅक्ट्र ज्याचा चेसिज नंबर ५५.-४०७१०व इंजन नंबर ४७.५०११/२३३७५ असा ट्रॉलीसह गाँदी शिवारातुन नदी पात्रातुन वाळु चोरुन घेवुन जात असता मिळुन आला. तसेच इसम नाने - सागर शिवाजी शिंदे रा. गाँदी हा चालवत असलेला एक लाल रंगाचा स्वराज ७४४एलाल रंगाचा हेड असलेला टॅक्ट्र ज्याचा चेसिज नंबर त५३ -१६८८२व इंजन नंबर ४३.३००९/४०९९२ अत्ता ट्रॉलीसह गाँदी शिवारातुन नदी पात्रातुन वाळु चोरुन घेवुन जात असताना सिध्देश्वर मंदीराजवळ मिळुन आल्याने तत्तेच नवनाथ मधुकर सोळुंके रा.गाँदी हा चालवत असलेला स्वराज कंपनीचा ७४४लाल रंगाचा हेड असलेला टॅक्ट्र ज्याचा चेसिज नंबर ८३३४८ व इंजन नंबर एन४००२/४४१७४ ट्राली सह पाथरवाला शिवार गोदावरी नदी पात्रातुन वाळु चोरुन घेवुन जात असता जप्त केला वरील तिन्ही टॅक्ट्र अवैध वाळु करत असताना पोलीसांची चाहुल लागल्याने त्यावरील टॅक्ट्र चालक हे जागीच टॅक्ट्र सोडुन पळुन गेल्याने सर्व टॅक्ट्र पंचासमक्ष जप्त करुन ते पोलीस वसाहत गाँदी येथे लावण्यात आले आहेत. असा एकुन १७.५०,००० (सतरा लाख पन्नासह हजार रुपये) किमंतीचा मुददेमाल जप्त करण्यात आला आहे व तिन ही टॅक्ट्र चालक याचे विरुध्द गोदी पोलीस स्टेशन येथे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. सदरची कारवाई पोलीस अधिक्षक अजयकुमार बन्सल सो. अप्पर पोलीस अधिक्षक आयुष नोपाणी सो, उपविभागीय पोलीस अधिकारी विशाल खांबे सो, वांचे मार्गदर्शनाखाली सपोनि आशिष श्रीनिवास खांडेकर पोहेकॉ/३५९ डोईफोडे पोहेकॉ/८०६ मुंढे, पोहेकॉ/१५६३ नागरगोजे, पोकॉ/८५८ पठाडे पोकॉ/४२४ साळवे, पोकॉ/१४ सिध्दीकी, पोकॉ/५३६ राठोड, पोकॉ/१२९६ पगारे आदीनी सर्व गोंदी पोलीस स्टेशन यांनी केली आहे.

# त्या नराधमाला फाशी द्या..! बदलापूर घटनेचे निषेध आंदोलन, शेकडो ग्रामस्थांसह शाळकरी मुलींचा सहभाग

**तभा वृत्तसेवा**
**पारध/प्रतिनिधी**



ठाणे जिल्ह्यातील बदलापूर येथे दोन चिमुकल्या मुलींवर लैंगिक अत्याचार केल्याची माणुसकीला काळिमा फासणारी घटना उघड झाली अन महाराष्ट्रसह देशाच्या काळजाचा ठोका वाढला अत्यंत चीड आणि राग आणणाऱ्या या घटनेचा निषेध म्हणून तसेच त्या नराधमाला फास्ट ट्रक कोर्टात केस चालवून सरळ सरळ फाशीची शिक्षा देण्यात यावी या मागणीसाठी आज पारध पोलीस ठाण्यात वालसावंगी, पारध, पद्मावती, अवघडराव सावंगी,धावडा,शेलुध,येथील सर्वधर्मीय,सर्वपक्षीय शेकडो ग्रामस्थांच्या उपस्थित,केंद्रीय पत्रकार संघ व पारध गावातील शाळेतील मुलींनी निषेध निवेदन मुख्यमंत्री महोदयांना सपोनि वैशाली पवार यांच्या मार्फत देण्यात आले..दरम्यान राज्यातील विविध शहरात सध्या महिलांवरील घडत असलेल्या अत्याचाराच्या घटना वाढत असून हे रोखण्यासाठी राज्य शासनाने कडक कायदा करावा जेणेकरून कायद्याचा धाक राहील व या लाजिरवाण्या घटना कमी होतील.यावेळी प्रा.संग्रामराजे देशमुख, लोकजागरचे केशव पाटील जंजाळ,पत्रकार विशाल असवार,मौलाना हफिस खलील यांनी भाषणातून सदरील घटनेबाबत निषेध व्यक्त केला.शाळकरी मुलींनी देखील सदरील आरोपींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.यावेळी वालसावंगी, पारधसह , पद्मावती, अवघडराव सावंगी, धावडा, शेलुद,परिसरातील शेकडो युवक, ग्रामस्थ, पत्रकार बांधव उपस्थित होते.सूत्रसंचालन पत्रकार विकास लोखंडे यांनी केले तर आभार प्रदर्शन पत्रकार सागर देशमुख यांनी मानले. केशव पाटील जंजाळ - ठाण्यात घेतली शप थ दरम्यान निवेदन देतेवेळी उपस्थित शेकडो युवक,ग्रामस्थांनी महिलांच्या सुरक्षिततेची शपथ घेतली.आपण कुणाकडे वेगळ्या नजरेने न बघता आई,बहीण,लेक म्हणून महिलांकडे बघण्याचा दृष्टिकोन ठेवू कुणी जर नजरेदेखत छेड काढत असेल तर त्या स्त्रीच्या मदतीला जात,पात,धर्म न बघता धावून जाऊ असे या शपथ मध्ये नमूद केले असून केशव जंजाळ यांनी ही शपथ सर्वांना दिली असून सर्व गावात,शाळेत ही शपथ घ्यावी अशी विनंती त्यांनी केली आहे. दरम्यान ठाण्यात उपस्थित सर्वांच्या ओठावर केवळ आणि केवळ त्या सर्व नराधमांना फाशीच द्यावी याची मागणी होती. याबाबत युवक पेटून उठले होते.यासाठी पोलीस ठाण्यात तोबा गर्दी झाली होती. बदलापूरसह कोलकाता,अकोला, संभाजीनगर येथे महिला,मुलींवर अत्याचार झाल्याच्या घटना दुदैवी असून चीड आणणाऱ्या आहेत.शासनाने आता सदरील सर्व प्रकरण फास्ट ट्रॅक कोर्टात चालवून दोषींना सरळ फासावर लटकावले पाहिजे या मागणीसाठी आज मुख्यमंत्री यांना पोलीस ठाणे मार्फत निवेदन देण्यात आले आहे.शिवाय आता याबाबतचा कायदा देखील कडक करण्याची गरज असून माता,भगिनी,मुलींना सुरक्षित समाज देण्याची गरज आहे.यासाठी आता शासनाने विचार करण्याची गरज आहे.

## बदलापूर घटनेच्या निषेधार्थ भोकरदन येथे मविआच्या वतीने काळी फीत लावून निषेध



**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन/प्रतिनिधी**

इंडिया व महाविकास आघाडीच्या वतीने बदलापूर तसेच महाराष्ट्र राज्यामध्ये वाढत चाललेल्या महिला, बालिका यांच्यावरील वाढत्या अत्याचाराच्या घटनेचा निषेध म्हणून येथील शनिवार रोजी सकाळी शहरातील छ. शिवाजी महाराज चौकामध्ये काळे झेंडे, व काळ्या फीत लावून निषेध व्यक्त करण्यात आला आहे, दरम्यान काँग्रेसचे जालना जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आला असून, मूक निदर्शने काळ्याफिती लावून व भाऊ भीक नको तुमची फक्त सुरक्षितता अबाधित ठेवा आमची, बहन हम शर्मिंदा है तेरे अत्याचारी अभी जिंदा है असे स्लोगन असलेल्या कळया पट्ट्या तोंडाला बांधून, गृहमंत्री राजीनामा द्या असे निदर्शने करण्यात आली. या आंदोलनास राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष रमेश सपकाळ, काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष त्र्यंबक पाबळे, शिवसेना शहरप्रमुख महेश पुरोहित, उपनगराध्यक्ष इरफान सिद्दिकी, लोकजागर संघटनेचे अध्यक्ष केशव पाटील जंजाळ, युवकचे काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राहुल देशमुख, माजी नगरसेवक संतोष अन्नदाते महेश औटी, शेतकरी संघटनेचे तालुकाध्यक्ष काकासाहेब साबळे, रामदास रोडे, नगरसेवक पठाण, कदीर बापु कादरी,शेख रिझवान,अजिज पार्टी, राष्ट्रवादीच्या महिला तालुकाध्यक्षा सोनाबाई कोल्हे,श्रावण कुमार अक्से, विजय इंगळे, सोपान सपकाळ, रमेश जाधव,फैसल चाऊस, एजाज पठाण, सय्यद आरेफ ,डॉ वामन साळवे, विठ्ठल पवार, शेख रफिक, महेश दसपुते,साळुबा लोखंडे,शालीकराम गावंडे,रतन दाभाडे,आखे पाटील, पुरी महाराज,अर्जुन ठोंबरे, संतोष सुरडकर, रतन दांडगे, पंजाबराव देशमुख, बालू जाधव, रमेश सोनवणे, महेश दसपुते, विश्वास वाघ, अजित भाई, रोशन देशमुख, रामचंद्र गायके , संदीप लाड , राजू शेळके, वैभव शिंदे, महेश दसपुते,अशोक सुरडकर, सुनील गिरणारे, रवी सहाने, विठ्ठल जाधव, यांच्यासह इंडिया व महाविकास आघाडीचे पदाधिकारी उपस्थित होते

# मंठा येथे महाविकास आघाडीच्या वतीने बदलापूर घटनेचा निषेध



**तभा वृत्तसेवा**
**मंठा/ प्रतिनिधी**

महाविकास आघाडीच्या वतीने मंठा येथे बदलापूर येथे झालेल्या घटनेचा निषेध व्यक्त करण्यात आला. येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात काळ्याफिती लावून शनिवार ता. २४ रोजी मुक धरणे आंदोलन करण्यात आले. या धरणे आंदोलन कार्यक्रमात लेकीबाळीवर झालेल्या अत्याचाराचा, त्यांना पाठीशी घालणाऱ्यांचा, कायदा व सुव्यवस्-थेची वाट लावणाऱ्यांचा तसेच असंवेदनशील सरकारचा निषेध करणारे फलक आंदोलन स्थळी लावण्यात आले होते. या आंदोलनात आमदार राजेश राठोड, शिवसेना जिल्हाप्रमुख ए जे पाटील बोराडे, किसनराव मोरे, संतोष वरकड, वैजनाथ बोराडे, आसाराम चोरमारे, कबीर तांबोळी, प्रताप जाधव, दिगंबर बोराडे, बाजीराव बोराडे, नाना बोराडे, सारिकाताई वरणकर, गंगाराम गवळी, शरद मोरे, अशोक अवचार, सुरेश वाव्हळ, दिगंबर इंगळे यांच्यासह महाविकास आघाडीचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांची सुरक्षा ही सरकारची जिम्मेदारी -सौरभ शेट्टी

## विद्यार्थी संवाद यात्रेचा वडीगोद्रीत समारोप

**तभा वृत्तसेवा**
**अंबड/प्रतिनिधी**



अंबड २३ ऑगस्ट वडीगोद्री मराठवाड्यातील विद्यार्थांचे प्रश्न जाणून घेण्यासाठी स्वाभिमानी विद्यार्थी परिषदेची संवाद यात्रा ही गेल्या चार दिवसापासून मराठवाड्यात सुरू होती.या यात्रेचा अंबड तालुक्यातील वडीगोद्री येथे समारोप स्वाभिमानी विद्यार्थी परिषदेचे सौरभ राजु शेट्टी यांच्या उपस्थितीत झाला.

वडिगोद्री येथील श्री गुरुदेव विद्या मंदिर महाविद्यालय येथे भेट देऊन सौरभ शेट्टी यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. शालेय व महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणी आणि त्यांचे प्रश्न त्यांनी जाणुन घेतले.जालना जिल्हात अडीच हजारच्या वर शाळा आहेत.जिल्हात एकुन १८०८ प्राथमिक तर ८१८ माध्यामिक शाळा आहेत.या पैकी ५० शाळांमध्येच सीसीटीव्ही आहेत.बाकीच्या शाळेची सुरक्षा ही वाऱ्यावर आहे. मुलांची सुरक्षा ही सरकारची जिम्मेदारी आहे. कोलकत्ता व बदलापुर प्रकरण पाहता प्रशासनाने सुरक्षेची व्यवस्था करावी.

शासनाकडे विद्यार्थ्यांची बतीशे कोटी शिष्यवृत्ती थकीत आहे.या सरकारने लवकरात लवकर प्रश्न मार्गी लावावा अन्यथा स्वाभिमानी विद्यार्थी परिषद रस्ता वर उतरेल असा इशारा स्वाभिमानी विद्यार्थी परिषदेचे प्रदेशाध्यक्ष सौरभ शेट्टी यांनी सरकारला दिला.

या वेळी मराठवाडा अध्यक्ष गणेश गावडे, स्वाभिमानी विद्यार्थी परिषदेचे जिल्हाअध्यक्ष विशाल ढेबे, जिल्हाउपाध्यक्ष सोपान उगले,युवा तालुका कार्यध्यक्ष गोपाल खोमणे, प्रदिप खोसे, तालुका कार्याध्यक्ष सुनिल गायकवाड, पक्ष तालुका उपाध्यक्ष पांडुरंग गावडे, नारायन डाहाळे,ताराचंद पवार, विजय खटके, बाळासाहेब दखने,सचिन गावडे, बबलु लिपणे,चंद्रसेन गावडे हे उपस्थित होते.

# शिवसेनेच्या वतीने आयोजीत लाडकी बहीण योजनेच्या सन्मान मेळाव्यात अर्जुनराव खोतकर यांनी घेतला आ.कुचेंचा समाचार

**तभा वृत्तसेवा**
**बदनापूर प्रतिनिधी**





बदनापूर येथे मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना रक्षाबंधन सन्मान सोहळा बदनापूर येथे आज सकाळी ११.३० वाजता शिवसेना जिल्हाध्यक्ष भाऊसाहेब घुगे यांनी आयोजित केलेल्या भव्य दिव्य कार्यक्रम संपन्न मेळाव्याला मोठ्या संख्येने महिलांनी सहभाग नोंदवला होता मुख्यमंत्री माझी लाडकी बहिणी योजनेचा सन्मान सोहळाला उदंड प्रतिसाद मिळाला असून रक्षाबंधनाचा कार्यक्रम तसेच महिलांचा सत्कार सन्मान केला लाडक्या बहिणींना फेटे बांधत एक आकर्षक वातावरण निर्माण झाले होते तर लाडक्या बहिणीला गिफ्ट स्वरूपात भेटवस्तू देण्यात आले आहे.

कार्यक्रम दरम्यान मा.मंत्री अर्जुन खोतकरयांनी यावेळी स्थानिक आमदार महायुतीचा धर्म पाळत नाही विविध कार्यक्रमात जाणबुजून मित्र पक्षांना टाळण्याचा प्रयत्न करतात याचा खेद राज्याचे मुख्यमंत्र्यांच्याकडे व्यक्त करणार आसलेल्याच विधान केले तसेच बदनापूर मतदार संघ शिवसेनेचा कायम राहिलेला बालेकिल्ला आहे येणाऱ्या विधानसभेला शिवसेनेला जागा सोडण्याचा प्रयत्न मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे करणार असलेलेच खोतकर म्हणाले शिवसेनेच्या कार्यकर्त्यावर व उपदाधिकाऱ्याला डावल जात असेल तर अजिबात खपवून घेतल्या जाणार नाही ज्यांच्या डोक्यात मस्ती असेल ती मस्ती जिरण्याची ताकद शिवसेनेमध्ये आहे असे ते बोलत होते. जिल्हाभरामध्ये मोर्चे बांधणी व कार्यकर्ता मेळावा घेऊन शिव-सेनेची ताकद वाढवण्याचे निर्धार जिल्हाध्यक्ष या नात्याने घेतला आहे येणाऱ्या काळामध्ये जिल्हात पक्ष संघटन बळकट करण्यासाठी अहोरात्र प्रयत्न करण्याचं हे या मेळाव्यात जिल्हाध्यक्ष भाऊसाहेब घुगे यांनी प्रतिपादन केले. यावेळी आयोजित या कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी मंत्री तथा शिवसेनेचे उपनेते अर्जुन खोतकर तसेच शिवसेनेचे जिल्हा संपर्कप्रमुख पंडितराव भूतेकर, युवा सेनेचे प्रदेश सचिव अभिमन्यू खोतकर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते सह संपर्कप्रमुख ऍड सुनील किनगावकर, फिरोजलाला तांबोळी, मराठवाडा अल्पसंख्या आघाडी प्रमुख असलमखान पठाण, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख मोहन अग्रवाल, शिवसेनेची महिला आघाडी संपर्कप्रमुख सविताताई कीवंडे, महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुख कालिंदाताई ढगे, उपजिल्हाप्रमुख संतोष मोहिते,शिव-सेनेचे ज्येष्ठ नेते बाबासाहेब इंगळे, भाऊसाहेब पाऊलबुद्धे, उपजिल्हाप्रमुख राजेंद्र लाड,भालचंद्र भोजने, भूषण शर्मा ,महिला आघाडीचे ज्येष्ठ नेत्या विजाताई चौधरी, शिवसेनेचे जालना शहर प्रमुख विष्णू पाचफुले,आत्मानंद भक्त, युवा से-नेचे जिल्हाप्रमुख अमोल ठाकूर,यांची विशेष उपस्थितीती होती. तसेच शिव-सेना तालुकाप्रमुख कल्याण आवघड, विधानसभा सघटक कैलास दुधानी, ईश्वर झुंबड,भगवानराव कदम, माधव गीते, हरिभाऊ कापसे, अंबादास कळसकर, दिलीप मंत्री, कैलास खैरे,अमोल दाभाडे, कैलास वैद्य, भगवान ढाकणे, अशोक आंबीलढगे, दीपक दिघे, गणेश शिंदे, राजेंद्र चौधरी ,रामेश्वर नागवे, मनोज शिंदे ,नारायण ब्राह्मणे,रमेश चोरमारे,गणपत केकान,आर्दीसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# जम्मू-काश्मिरातील अभद्र आघाडी

जम्मू-काश्मीर विधानसभा निवडणुकीसाठी काँग्रेस आणि नॅशनल कॉन्फरन्स यांच्यातील आघाडीचे 'चोर चोर मौसेरे भाई' असे वर्णन करायला हरकत नाही. आजकाल विधानसभा निवडणूक असो की लोकसभा, स्वबळावर निवडणूक लढवण्याचे दिवस निघून गेले आहेत. देशातील कोणत्याही पक्षाची ताकद; मग तो राष्ट्रीय स्तरावरचा पक्ष असला, तरी एकट्याने निवडणूक लढण्याची त्याची ताकद राहिलेली नाही, ही कटू असली तरी वस्तुस्थिती आहे. आघाडी करण्यामागे आपला अवाढव्य देश हे एक कारण असले तरी राजकीय अपरिहार्यता हे खरे आणि महत्त्वाचे कारण आहे. देशात प्रामुख्याने भाजपा आणि काँग्रेस हे दोन प्रमुख राजकीय पक्ष आहेत. या दोन्ही पक्षांनी समविचारी पक्षांना आपल्या सोबत घेतले आहे. त्यांची आघाडी तयार केली आहे. भाजपाच्या नेतृत्वात राष्ट्रीय लोकशाही आघाडी आहे तर काँग्रेसच्या नेतृत्वात इंडिया आघाडी. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुका रालोआ आणि इंडिया या दोन आघाडीतच लढवण्यात आल्या. यात रालोआची सरशी झाली तर इंडिया आघाडीला पराभव पत्करावा लागला. भाजपा आणि काँग्रेस या दोन्ही पक्षांपासून सारख्या अंतरावर असलेल्या पक्षांची तिसरी आघाडी आहे, पण ती फारशी प्रभावी नाही. जम्मू-काश्मीर विधानसभेची निवडणूक काँग्रेस नॅशनल कॉन्फरन्ससोबत आघाडी करून लढवणार, असे मानले जात होते, प्रत्यक्षात तसेच झाले. जम्मू-काश्मीरपुरत्या मर्यादित असलेल्या नॅशनल कॉन्फरन्सशी आघाडी करायला काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे आणि माजी अध्यक्ष राहुल गांधी यांना श्रीनगरला धाव घ्यावी लागली. नॅशनल कॉन्फरन्सचे नेते डॉ. फारुक अब्दुल्ला आणि त्यांचे पुत्र उमर अब्दुल्ला या पितापुत्राशी खडगे यांनी चर्चा केली आणि दोन पक्षात आघाडी घडवून आणली. याचा अर्थ नॅशनल कॉन्फरन्ससोबत आघाडी करण्याची खरी गरज काँग्रेसला होती. नॅशनल कॉन्फरन्सला काँग्रेससोबत आघाडीची गरज असती तर त्या पक्षाच्या अब्दुल्ला पितापुत्राने दिल्लीत धाव घेत सोनिया गांधी यांच्यासह काँग्रेसच्या नेतृत्वाशी चर्चा केली असती. पण तसे झाले नाही. त्यामुळे अशी आघाडी करण्यात काँग्रेसची राजकीय हतबलता दिसून येते.

राज्यातील विधानसभेच्या ९० जागा लढवण्यावर दोन्ही पक्षांचे एकमत झाले आहे. जागावाटपाबाबतचा निर्णय घेण्यासाठी दोन्ही पक्षांच्या पाच-पाच नेत्यांची एक समिती स्थापन करण्यात आली आहे. नॅशनल कॉन्फरन्स हा काँग्रेसच्या नेतृत्वातील इंडिया आघाडीचा भाग आहे. त्यामुळे जम्मू-काश्मीरमधील विधानसभा निवडणुकीसाठी या दोन पक्षांची आघाडी होणार ही दगडावरची रेघ होती; तशी ती झालीही. नॅशनल कॉन्फरन्स आणि काँग्रेस यांच्यात निवडणूकपूर्व आघाडी ही पहिल्यांदाच झाली नाही. याआधी १९८७ मध्ये म्हणजे आजपासून ३७ वर्षे आधीही या दोन पक्षांत विधानसभा निवडणुकीसाठी आघाडी झाली होती. २००२ च्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेस आणि पीपल्स डेमोक्रेटिक पक्ष वेगवेगळे लढले होते. मात्र, निवडणुकीनंतर सत्तास्थापनेसाठी हे दोन पक्ष एकत्र आले होते. त्यांच्यात निवडणुकोत्तर आघाडी झाली होती. २००८ मध्येसुद्धा नॅशनल कॉन्फरन्स आणि काँग्रेस यांनी विधानसभा निवडणुकीनंतर आघाडी करत सरकार स्थापन केले होते. त्यामुळे राज्याला नॅशनल कॉन्फरन्स आणि काँग्रेस यांच्यातील आघाडी नवी नाही.

आज या आघाडीत मेहबुबा मुफ्ती यांचा पीपल्स डेमोक्रेटिक काँग्रेस (पीडीपी) हा पक्ष नसला, तरी उद्या तो पक्ष या आघाडीत येणारच नाही, असेही नाही. समविचारी पक्षांसाठी आमचे दरवाजे उघडे असल्याचे सूचक विधान अब्दुल्ला पितापुत्राने केले आहे. याचाच अर्थ जम्मू-काश्मिरात काँग्रेस, नॅशनल कॉन्फरन्स आणि पीडीपी विरुद्ध भाजपा अशी लढत होऊ शकते. याचाच दुसरा अर्थ ३७० कलम रद्द केल्यानंतर जम्मू-काश्मीरमध्ये भाजपाचा जनाधार वाढला आहे. भाजपाच्या वाढत्या ताकदीचा या तीन पक्षांना एकएकट्याने मुकाबला करता येणे शक्य नसल्यामुळे या तीन पक्षांना आपल्या राजकीय अस्तित्वासाठी एकत्र यावे लागले, असा अर्थ काढता येऊ शकतो. विधानसभा निवडणुकीची पहिली फेरी भाजपाने याच मुद्द्यावर जिंकली आहे, असे म्हणायला हरकत नाही. मात्र, या आघाडीने काही मूलभूत प्रश्नही उपस्थित केले आहेत. या प्रश्नांची उत्तरे येत्या काळात काँग्रेसच्या नेतृत्वाला द्यावी लागणार आहे. जम्मू-काश्मीरला विशेष दर्जा देणारे घटनेतील ३७० कलम रद्द करण्याचा धाडसी आणि ऐतिहासिक असा निर्णय मोदी सरकारने घेतला होता. ३७० कलम रद्द झाल्यानंतर प्रथमच जम्मू-काश्मिरात विधानसभा निवडणूक होत आहे. विशेष म्हणजे ही निवडणूक १० वर्षांनी होत आहे. याआधी २०१४ मध्ये राज्यात विधानसभा निवडणूक झाली होती. त्यामुळे यावेळी होणाऱ्या निवडणुकीकडे सगळ्या देशाचे लक्ष लागणे स्वाभाविक आहे. विधानसभा निवडणुकीसाठी नॅशनल कॉन्फरन्सने आपला जाहीरनामा प्रसिद्ध केला आहे. यात जम्मू-काश्मीरला विशेष दर्जा देणाऱ्या ३७० कलमांची पुनर्स्थापना करण्याचे आश्वासन दिले आहे. नॅकाँचे हे आश्वासन घड्याळाचे काटे उलटे फिरवण्यासारखे म्हणावे लागेल. ३७० कलमांची पुनर्स्थापना करण्याच्या नॅशनल कॉन्फरन्सच्या आश्वासनाशी काँग्रेस पक्ष सहमत आहे का, हे त्याला आधी स्पष्ट करावे लागणार आहे.

मुळात जम्मू-काश्मीरचे जे हाल स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आजपर्यंत झाले, त्याला ३७० कलम कारणीभूत होते. या कलमाने जम्मू-काश्मीरला देशाच्या उर्वरित भागाशी एकजीव होऊ दिले नाही. राज्यातील फुटीरतावादी भूमिकेला या कलमाने बळ दिले, असे नाईलाजाने म्हणावेसे वाटते. ३७० कलम रद्द करण्यासाठी तत्कालीन जनसंघाचे संस्थापक असलेल्या डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांना आपले बलिदान करावे लागले. 'एक देश मे दो निशान, दो विधान आणि दो प्रधान नहीं चलेंगे' म्हणत डॉ. मुखर्जी यांनी आंदोलन केले होते. तोपर्यंत जम्मू-काश्मीरचा ध्वज वेगळा होता, घटना वेगळी होती आणि जम्मू-काश्मीरच्या मुख्यमंत्र्याला 'वजीर-ए-आजम' म्हणजे पंतप्रधान म्हटले जात होते. जम्मू-काश्मीरमधील राजकीय पक्ष आणि त्यांचे नेते; मग तो पक्ष नॅशनल कॉन्फरन्स असो की पीडीपी त्यांनी आपल्या निष्ठा पाकिस्तानच्या चरणी समर्पित केल्या होत्या. हा एकप्रकारे जम्मू-काश्मीरमधील नेत्यांचा राजकीय व्यभिचार होता. आणखी कठोर शब्दात सांगायचे, तर सरळसरळ देशद्रोह होता. अश्वत्थामाच्या कपाळावरील जखम जशी अजूनही भळभळती आहे असे म्हणतात, त्याचप्रमाणे भारतमातेच्या कपाळावरील जखमही जम्मू-काश्मीरच्या रूपात ३७० कलमाने भळभळत होती. या जखमेवर ३७० कलम रद्द करण्याची शस्त्रक्रिया करण्याची आतापर्यंत कोणत्याच सरकारची आणि पंतप्रधानांची हिंमत झाली नाही. मात्र 'शेर ए भारत' पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तशी हिंमत दाखवली आणि ५ ऑगस्ट २०१९ ला जम्मू-काश्मीरला विशेष दर्जा देणारे घटनेतील ३७० कलम रद्द केले. हे कलम रद्द केल्यामुळे काश्मीर खोऱ्यातील जनता आणि त्यांचे तथाकथित नेते जमिनीवर आले आहेत. आजपर्यंत हे नेते कधीच जमिनीवर नव्हते. ३७० कलम अस्तित्वात असेपर्यंत दिल्लीच्या कोणत्याही नेत्याची काश्मीर खोऱ्यात जाण्याची हिंमत होत नव्हती. ३७० कलम रद्द करण्याच्या निर्णयाला आज काँग्रेस आणि त्याचे नेते राहुल गांधी विरोध करत असले, तरी ३७० कलम रद्द केल्यामुळे काश्मीर खोऱ्यातील दहशतवादी घटना आणि हिंसाचार थांबला आहे. त्यामुळेच राहुल गांधी श्रीनगरला जाऊ शकले आणि अब्दुल्ला पितापुत्राला भेटत विधानसभा निवडणुकीसाठी त्यांच्याशी आघाडी करू शकले. एवढ्यासाठी तरी राहुल गांधी यांनी ३७० कलम रद्द करण्याच्या निर्णयाचे स्वागत केले पाहिजे आणि असा निर्णय घेतल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे अभिनंदन करत त्यांना धन्यवादही दिले पाहिजे. जम्मू-काश्मिरातील विधानसभा निवडणुकीत सध्या तरी भाजपा विरुद्ध नॅशनल कॉन्फरन्स आणि काँग्रेस अशी लढत होणार असली, तरी त्याने फारसा फरक पडणार नाही. देशाच्या एकता आणि अखंडतेसाठी राज्यात राष्ट्रवादी सरकारची गरज आहे, राष्ट्रद्रोही सरकारची नाही, याची जाणीव जम्मू-काश्मिरातील जनतेलाही झाली आहे.

---

## यंगिस्तान

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

# विरोधकांना भारताचा बांगलादेश करायचाय्!

न्याय हा न्यायालयात मिळतो आणि तो तिथेच लवकर व योग्यपणे मिळायला हवा. चित्रपटांमध्ये दाखवतात त्याप्रमाणे रस्त्यावर न्याय होऊ लागला तर न्यायपालिका बंद पडेल, लोकशाही संपुष्टात येईल आणि संविधान धोक्यात येईल. गंभीर बाब अशी की, 'संविधान बचाओ' असं म्हणणारे घटक लोकांना रस्त्यावर येऊन न्याय मिळविण्यासाठी भाग पाडत आहेत. यामध्ये न्याय मिळविणे किंवा न्याय मिळवून देणे, हा हेतू नसून अराजकता माजवणे व भारताचा बांगलादेश करणे, हा मुख्य हेतू आहे. म्हणूनच बांगलादेशमध्ये अराजकता माजल्यावर आणि शेख हसीना यांना भारतात शरण यावे लागल्यावर डाव्यांनी अशा प्रकारची घटना भारतातही घडू शकते, अशी वक्तव्ये केली होती. राजू शेट्टी यांनी बांगलादेशप्रमाणे आपण पंतप्रधानांना पळवून लावू शकत नाही? असे वक्तव्य केले होते. समाजमाध्यमावर तर अशाप्रकारची क्रांती भारतात घडावी, अशा अनेक पोस्ट्स व्हायरल झाल्या आहेत.

विरोधक कोणत्याही मुद्यावरून लोकांना भडकवत आहेत आणि त्यांना रस्त्यावर येण्यास भाग पाडत आहेत. लोक रस्त्यावर आले की, आंदोलन हायजॅक करून तोडफोड, अराजकता माजवण्याचा प्रयत्न सुरू आहे. बांगलादेशातही आरक्षणविरोधी आंदोलन जिहाद्यांनी हायजॅक केलं आणि बांगलादेशात हिंदूंवर अनन्वित अत्याचार केले. हाच प्रयत्न भारतात व्हावा यासाठी अनेक दुर्जन घटक कामाला लागले आहेत. आयबीपीएस परीक्षा आणि एमपीएससी राज्य सेवा संयुक्त पूर्व परीक्षा एकाच दिवशी ठेवल्याने विद्यार्थी आक्रमक झाले आणि पुण्याच्या रस्त्यावर उतरले. विद्यार्थ्यांनी मोठी गर्दी केल्यामुळे वाहतूक ठप्प झाली. आंदोलकांची समजूत काढण्यासाठी पोलिस पुढे आल्यावर आंदोलकांनी पोलिसांशी वाद घातला. विशेष म्हणजे या आंदोलनात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे नेते रोहित पवार आणि रुपाली पाटीलदेखील सहभागी होते. एमपीएससीचे विद्यार्थी आक्रमक होऊ शकत नाही. कारण, त्यांच्यावर गुन्हे नोंदवले गेले तर त्यांना प्रशासकीय सेवा कशी करता येईल? यामध्ये देवेंद्र फडणवीस यांनी मध्यस्थी केली आहे. त्यांनी याबाबत सकारात्मक भूमिका घेण्याची विनंती लोकसेवा आयोगाच्या अध्यक्षांना केली आहे. तूर्तास यावरून हिंसा पेटवण्याचे विरोधकांचे मनसुबे यशस्वी झाले नाही. दुसरीकडे बदलापूरमध्ये घडलेली घटना एक वेगळंच वळण घेत आहे. चिमुरडींवर अत्याचार करणाऱ्याला शिक्षा व्हावी म्हणून पालकांनी शाळेसमोर ठिय्या आंदोलन केलं. मात्र, हे आंदोलन समाजकंटकांनी हायजॅक केलं. यासंबंधित शाळेच्या माजी विद्यार्थ्याचं एक पत्र समाजमाध्यमावर व्हायरल झालं आहे. या व्यक्तीने झालेला सर्व प्रकार समजावून सांगितला आहे. पालक शाळेच्या बाहेर आंदोलन करत असताना पोलिसांनी पालकांना घटनाक्रम समजावून सांगितला. गुन्हेगाराला पकडण्यात आले असून त्याच्यावर गुन्हा दाखल झालेला आहे आणि पीडित मुलींना व कुटुंबीयांना न्याय मिळवून देण्याचं आश्वासन दिलं. तेव्हा काही पालक घरी निघून गेले. मात्र, हे आंदोलन समाजकंटकांनी हायजॅक केलं. त्यांनी रेल्वे रोको आंदोलन छेडलं आणि एकच गदारोळ माजला.

हे लोक डुप्लिकेट आंदोलनकर्ते होते, यास मुख्यमंत्र्यांनी दुजोरा दिला आहे. मुख्यमंत्री म्हणाले की, हे आंदोलन राजकीय होतं. कारण आंदोलक स्थानिक नव्हते. गिरीश महाजन यांनी सर्व अटी मान्य केल्यानंतरही ते माघार घ्यायला तयार नव्हते. म्हणजे त्यांना केवळ सरकारची बदनामी करायची होती. या आंदोलनकर्त्यांमुळे बदलापूर ते अंबरनाथ रेल्वे सेवा १० तासांसाठी ठप्प झाली. असं आंदोलन सामान्य पालक करू शकत नाहीत. यात राजकीय हस्तक्षेप स्पष्ट दिसतो. दुसरी गोष्ट आंदोलनकर्त्यांच्या हातात बॅनर होते, ज्यावर 'लाडकी बहीण योजना नको, १५०० रुपये नको तर सुरक्षा हवी आहे,' असं लिहिलेलं होतं. यामध्ये लाडकी बहीण योजना आली कुठून? विरोधकांनी सुरुवातीपासूनच लाडकी बहीण योजनेला बदनाम करण्याचा डाव आखला आहे. आंदोलनातही या मुद्याचा वापर करण्यात आला. म्हणूनच हे आंदोलन राजकीयदृष्ट्या प्रेरित असल्याचे सिद्ध होते. समाजमाध्यमावर या प्रकरणासंबंधी एक खोटा संदेश फिरतोय. ज्यात लिहिलंय की, 'बदलापूर अत्याचार घटनेच्या निषेधार्थ शनिवार, २४ ऑगस्ट रोजी महाराष्ट्र बंद!' या संदेशात एका पीडित मुलीचे रुग्णालयात निधन झाले असल्याची खोटी माहिती दिली आहे. मुलीच्या आईनेही आत्महत्या केल्याचे खोटेच म्हटले आहे. या खोट्या माहितीच्या माध्यमातून लोकांना भडकवून पुन्हा रस्त्यावर उतरवण्याचा कट रचला जात आहे. एका वृत्तवाहिनीशी बोलताना काँग्रेसच्या खासदार प्रणिती शिंदे यांनी अतिशय वादग्रस्त आणि संविधानाच्या विरोधात विधान केलं. त्यांनी हिंसा करण्याची भाषा केली. त्यावर टीव्ही अँकरने त्यांना आठवण करून दिली की, 'तुम्ही खासदार आहात, संवैधानिक पदावर आहात. तुम्ही आग लावण्याची भाषा कशी करू शकता? तुम्ही लोकांना सांगा की, माझा उद्देश लोकांनी हिंसा करावा असा नाही.' पण यावर प्रणिती यांनी अजब उत्तर दिलं. त्या म्हणाल्या, 'ही लोकशाही आहे. लोकशाहीत लोकांना ठरवू द्या काय करायचं आहे. गृहयुद्ध, हिंसा हे लोकांना ठरवू द्या.' यावर टीव्ही अँकर हैराण झाली. तिला कळेना की, एक खासदार उघडपणे लोकांना हिंसा करायची प्रेरणा कशी देऊ शकते. पण हाच विरोधकांचा विद्रूप चेहरा आहे. लोकांना हिंसा करण्यास उत्तेजित करण्याच्या आरोपाखाली प्रणिती शिंदेंवर गुन्हा दाखल व्हायला हवा. उद्या जर खरोखर हिंसा भडकली तर कायद्याने यासाठी त्यांना जबाबदार धरायला हरकत नाही.

सुप्रिया सुळे यांनी बंगालच्या बलात्कार प्रकरणावर दुटप्पी भूमिका घेतली. एवढ्या मोठ्या देशात अशा घटना घडत राहतात. ममता बॅनर्जी संवेदनशील व्यक्ती आहेत. त्या न्याय मिळवून देतील. उलट ममता बॅनर्जींमुळे न्याय मिळायला उशीर होतोय्. महाराष्ट्रात मात्र शिंदे-फडणवीस सरकारने न्याय मिळवून देण्यासाठी पुढाकार घेतलेला आहे. विरोधक बेताल वक्तव्य मुद्दाम करीत आहेत. लोकांमध्ये गोंधळ निर्माण करून प्रणिती शिंदे म्हणाल्या, त्याप्रमाणे सिव्हिल वॉर म्हणजेच गृहयुद्ध पेटवण्याचा डाव आखला जात आहे. 'व्होट जिहाद'ची हाक देऊनही ९९ च्या पुढे जाता येत नाही, हे विरोधकांना कळलेलं आहे. भारताचा बांगलादेश करण्याचे कारस्थान सुरू झाले आहे. समाजमाध्यमावर टूलकिट गँग सक्रिय झाली आहे व रस्त्यावर औरंगजेब फॅन क्लब आणि वोकिझचे सदस्य सज्ज झाले आहेत. त्यामुळे आपण सामान्य नागरिकांनी आता अखंड सावधान असले पाहिजे. आम्हाला रस्त्यावरचा न्याय नको, न्यायपालिकेत मिळालेला न्याय हवा आहे, असं म्हणत लोकशाही आणि संविधानासाठी खंबीरपणे उभे राहिले पाहिजे. लक्षात घ्या, सज्जनांचं संघटन दुर्जनांच्या टोळ्या पळवून लावू शकतं.

writerjayeshmestry@gmail.com

---

## मुंबई वार्तापत्र

**नागेश दाचेवार**

# महाराष्ट्राची प्रतिमा!

बदलापूर प्रकरण हे महाराष्ट्राच्या प्रतिमेला आणि प्रतिष्ठेला काळिमा फासणारे आहे. राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीसांनी राजीनामा दिला पाहिजे, अशी मागणी काँग्रेस, शरद पवार गट आणि उबाठा गटाचे नेते करू लागले आहेत. पण पालघरला दोन साधूंची निर्घृण हत्या झाली, अमरावतीत जिहादी मानसिकतेतून 'सर तन से जुदा' म्हणत सर्वसामान्य व्यक्तीची हत्या झाली, सप्टेंबर २०२१ ला मुंबईच्या साकिनाका परिसरात भररस्त्यावर एका ३० वर्षीय महिलेवर अत्याचार करून गुप्तांगात रॉड टाकल्याने दोन दिवसांनी उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला, ३१ जुलै २०१३ ला झालेला शक्ती मिल सामूहिक बलात्कार, राष्ट्रीय अपराध रेकॉर्ड ब्युरो म्हणजे एनसीआरबीने २०२१ ची आकडेवारी जारी केली होती; त्यात २५०६ बलात्कार महाराष्ट्रात झाल्याचे म्हटले आहे. तर, २०२२ च्या जारी केलेल्या आकडेवारीत बलात्काराच्या संख्येत वाढ होऊन २९०४ घटना घडल्याचे म्हटले आहे. तीन हजारांच्या जवळपास राज्यात बलात्कार झाले तेव्हा महाराष्ट्राच्या प्रतिमेला आणि प्रतिष्ठेला काळिमा फासली गेली नाही. मुख्यमंत्र्यांच्या पक्षाचा प्रवक्ता पोलिस दलात सामावून घेत, वसुली केली गेली तेव्हा काळिमा फासली गेली नाही, मनसुख हिरेण या निरपराध व्यापाऱ्याची कुठलीही चुकी नसताना क्रूरतेने पोलिसांनी हत्या केली, त्यावेळी महाराष्ट्राची प्रतिमा मलिन झाली नाही, वसुलीसाठी अंबानीच्या घराजवळ पोलिसच स्फोटकं ठेवत होते, तेव्हा काळिमा फासली गेली नाही. राज्याचा गृहमंत्री १०० कोटींची वसुली करत होता, तेव्हादेखील काळिमा फासली गेली नाही. या अशा घटना २०१९ ते २०२२ या काळात घडल्या. तेव्हा सत्तेत असलेल्या महाविकास आघाडीचे मुख्यमंत्री किंवा गृहमंत्री यापैकी कोणी राजीनामे दिल्याचे ऐकिवात नाही. नैतिकतेचा पाठ पढविणारे तथाकथित बुद्धिवादी तेव्हा कुठे गेले होते? आज नाकाने कांदे सोलणाऱ्यांची तेव्हा कुठे गेली होती नैतिकता आणि महाराष्ट्राच्या प्रतिमेची चिंता? राज्याच्या गुन्हेगारीत वाढ, दंगलीत वाढ, बलात्कार, खून, दरोड्यात वाढ होत असताना, त्यावर उपाययोजना करण्याऐवजी हातात अधिकार असणारे राज्याचे प्रमुख मुख्यमंत्री घरी बसून आराम फर्मावत होते. ते लोकं आता महिला-मुलींच्या रक्षणाची चिंता करताना दिसले किंवा गृहमंत्र्यांचा राजीनामा मागताना दिसले की, अशांना शंभर हाणावं आणि एक मोजावं असे वाटते.

३ आणि ४ वर्षांच्या चिमुकलींवर लैंगिक अत्याचार करण्याचा विचार करणारा व्यक्ती विकृतच असू शकते. अशा विकृत मानसिकतेला ठेचून काढणे आज कुण्या एकट्यादुकट्याचे किंवा शासन-प्रशासनाचे काम आहे, असे थोपवून स्वतःचे हात झटकण्याचा प्रकार करण्यापेक्षा, समाजाने आपलेदेखील कर्तव्य असल्याची जाणीव ठेवली पाहिजे. सामाजिक जाणिवेतून महिला-मुलींच्या सुरक्षेला समाजाने आपले प्राधान्य समजले पाहिजे. अशा विकृतीला आळा घालण्यासाठी केवळ शासकीय यंत्रणा, सरकार, मुख्यमंत्री, गृहमंत्री जबाबदार असल्याचे सांगून आपण नामानिराळे राहणे, इतरांवर दोषारोप करून मोकळे झाल्याने समस्येचे निरसन होणार नाही किंवा अशा विकृतीला समाजातून संपवता येणार नाही. या विकृत मानसिकतेचे समूळ उच्चाटन करायचे असल्यास त्यासाठी सर्वांनी मिळून सामूहिक प्रयत्न करण्याची गरज आहे. राजकारण्यांना काय तर एकमेकांकडे बोट दाखविण्यासाठी विषयच पाहिजे असतो. प्रत्येक घटनेचं भांडवल करण्याचं काम आपापल्या सोयीने स्वतःचा राजकीय स्वार्थ साधण्यासाठी राजकारणी करत असतात. मात्र, प्रत्येक घटनेला सरकार जबाबदार असेल तर या समाजात वावरणारी सुज्ञ व्यक्ती म्हणून आपलं या समाजासाठी, राज्यासाठी, देशासाठी, येथील महिला, आई, मुली, बहिणींसाठी काही देणं लागत नाही? केवळ कोणावर तरी खापर फोडल्याने, कुणाचा तरी राजीनामा मागितल्याने आपली जबाबदारी संपत नाही किंवा मग या समस्येचं समाधानदेखील निघत नाही. समाज नेहमी राजकारण्यांच्या राजकीय खेळीचा बळी ठरत असतो. त्यांच्या खोट्या भूलथापांना बळी पडून रोगावर उपचार करण्याऐवजी, दुसराच काहीतरी औषधोपचार केला जातो. त्यामुळे रोग तर बरा होत नाहीच; शिवाय दुसरी नवी समस्या निर्माण होऊन पुन्हा समाजात अस्थिरता निर्माण होत असते.

एखाद्या शाळेत चिमुकल्यांसोबत घडलेला प्रकार अत्यंत घृणास्पदच आहे. मग केवळ चिमुकल्यांसोबत घडला आहे म्हणूनच नव्हे तर तरुणी, महिला किंवा बालकं, मुलं आदींच्या बाबतीतही असे प्रकार घडतात तेदेखील निंदनीयच आहेत. असले कृत्य करणाऱ्यांवर कठोर शासन करणे, अशा घटनेची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी उपाययोजना करणे ही सगळी जबाबदारी शासनाची आणि शासनाचा प्रमुख म्हणून मुख्यमंत्री, कायदा व सुव्यस्था असणारे गृहमंत्री यांचीच आहे. पण, त्यासाठी थेट गृहमंत्र्यांचा राजीनामा मागितला जाणे कितपत योग्य आहे. भर चौकात आत्ताच्या आत्ता फाशी द्या, आरोपीला आमच्या स्वाधीन करा, असल्या मागण्या सामान्य जनता करत होती तोवर ती त्यांची संतप्त भावना होती असे समजू. मात्र, विरोधी पक्षाचे नेते, आदित्य ठाकरे, खासदार सुप्रिया सुळे, संजय राऊत सारखे लोकं जेव्हा अशीच भाषा बोलू लागले तेव्हा मात्र खऱ्या अर्थाने संविधान धोक्यात येत असल्याचे जाणवते. मुळात बदलापूर प्रकरणातील पालक, आंदोलकांनी एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे, आपण मुस्लिम राष्ट्रात, अरब राष्ट्रात राहत नाही. आपण जगातल्या सर्वात मोठ्या लोकशाही असलेल्या देशात राहतो. आपला देश संविधानाने चालतो. संविधानाने दिलेल्या कायद्याने चालतो. आपल्या कायद्यात जागेवर फाशी देण्याची, भर चौकात फाशी देण्याची आणि बलात्काराच्या गुन्ह्यासाठी फाशी देण्याची कुठलीही तरतूद नाही. आपल्या देशात सर तन से जुदा, हात कापा, पाय कापा, डोळे फोडा, बोटं छाटा वाला न्याय नाही. त्यामुळे अशा मागण्या करणे म्हणजे हे संविधानविरोधी कृत्य आहे. भाजपा संविधानविरोधी असल्याची आवई उठविणारे, संविधान रक्षकच आज संविधान विरोधी मागणीला समर्थन करताना नव्हे, तर प्रत्यक्ष मागणी करताना दिसत आहेत. संविधान बचाववाल्या विरोधी पक्षांच्या कुण्या एका नेत्याने आंदोलकांना अशी फाशी देता येत नाही, ही मागणी सयुक्तिक नाही, संविधान विरोधी आहे, असे सांगण्याचा, समजावण्याचा प्रयत्न किंवा आवाहन का केले नाही. यातच विरोधकांची मानसिकता दिसून येते. आता याप्रकरणी पोलिसांवर कारवाई करण्यात आली. शाळा-प्रशासनावर कारवाई करण्यात आली. शाळा सरकारने आपल्या ताब्यात घेतली आहे. एसआयटी नेमून तपास करण्यात येत आहे. प्रकरण फास्ट ट्रॅक कोर्टात चालवायला मंजुरी दिली गेली. तपास तातडीने करून आरोपपत्र दाखल करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. आरोपीला अटक करण्यात आली आहे. आता कायदेशीर प्रक्रिया सुरू आहे. प्रचलित कायद्यान्वये शासनाने आज केलेल्या कारवाईपेक्षा अन्य काय करता येऊ शकते? मविआच्या हातात सत्ता दिल्यास यापेक्षा काय वेगळं करेल? सत्तेत होते तेव्हा झालेल्या बलात्कार आणि खुनाच्या प्रकरणामध्ये वेगळं काय केलं होतं? मग आता मविआने पुकारलेला महाराष्ट्र बंद कोणत्या मागणीसाठी केला आहे. हा सर्व नाना पटोले, उद्धव ठाकरे आणि शरद पवार या नटरंगांचा निव्वळ तमाशा आहे. यांना खरंच मुलींच्या सुरक्षेची चिंता असती तर फडणवीसांच्या राजीनाम्यासोबत त्यांनी बंगालच्या गृहमंत्र्याचादेखील राजीनामा मागितला असता. पण त्यावर राज्यातलेच काय राष्ट्रीय पातळीवरील राहुल गांधी, 'लडकी हू लड सकती हूं' म्हणणारी प्रियांका वढेरा यांच्यासारख्या एकानेही ब्र उच्चारला नाही. यावरूनच या संधिसाधू लोकांचा महिला सुरक्षेविषयीचा ढोंगीपणा उघड होतो.

९२७०३३३८८६

---

## वेध

**विजय कुळकर्णी**

# वर्तमानात बदलतोय् आंदोलनाचा प्रकार

भारत हा जगातील सर्वात मोठा लोकशाही देश आहे, असे म्हटले जाते. लोकशाही असल्यामुळे राज्य घटनेने नागरिकांना भाषण, लेखन व अभिव्यक्ती स्वातंत्र्य दिले आहे. त्यामुळे एखाद्या बाबीवर मत व्यक्त करण्याचा, राजकीय पक्ष, नेत्यांच्या कारभारावर टीका करण्याचा नागरिकांना अधिकार आहे. याचा विशेषतः राजकीय पक्ष व नेते मंडळी वापर करतात, हे आपण नित्य अनुभवतो. तर, आपल्या मागण्या सरकार दरबारी मांडून त्या मान्य करवून घेण्यासाठी मार्चे, आंदोलने केली जातात. लोकशाही मार्गाने तसे करण्यास काहीच हरकत नाही. त्यामुळे नागरिकांना काय हवे-नको ते सरकारच्या कानी पडते. त्यावर विचार करून सरकार विधिमंडळ किंवा मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय घेऊन नागरिकांच्या समस्यांचे निराकरण करते. सुदृढ लोकशाहीत हे अपेक्षितच आहे.

पण, वर्तमानात आंदोलनाचे प्रकार पार बदलले आपल्याला दिसत आहेत. आजपर्यंत आपण मोर्चे, उपोषण, धरणे, संप बघितले. मात्र, आता आंदोलक आपल्या मागण्यांसाठी लोकप्रतिनिधींना चक्क घेराव घालून त्यांना एखाद्या मुद्यावर त्यांची भूमिका स्पष्ट करा, असे म्हणून त्यांच्यावर दबाव आणत असल्याचे दिसत आहे.



काही दिवसांपूर्वी संसदेत केंद्र सरकारने वक्फ बोर्डाच्या नियमात काही बदल करण्याचा ठराव मांडला. त्यावर विचार करण्यासाठी केंद्र सरकारने संसदीय समितीचे गठन केले आहे. ही समिती या ठरावाबाबत चर्चा, अभ्यास करून आवश्यक त्या शिफारशी केंद्र सरकारला करणार आहे. त्यानंतर हा ठराव लोकसभा व राज्य सभेत पारित झाल्यावर वक्फ बोर्डाच्या नियमात बदल केले जाणार आहेत. मात्र, याबाबत भूमिका स्पष्ट करा, अशी मागणी घेऊन काही मुसलमान आंदोलक थेट मुंबई येथील मातोश्रीबाहेर धडकले. मातोश्री हे उबाठा शिवसेनेचे सर्वेसर्वा माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचे निवासस्थान आहे. शिवसेनाप्रमुख हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे असताना अशाप्रकारे कोणतेही मुसलमान आंदोलक मातोश्रीवर धडकले नव्हते. पण, काल-परवा मुसलमान आंदोलक ठाकरे यांच्या निवासस्थानी धडकले. वक्फ बोर्ड ही काय भानगड आहे, असा प्रश्न वाचकांना पडणे साहजिकच आहे. तर, 'वक्फ' या शब्दाचा अर्थ मराठीत 'दान' असा होतो. तुम्ही जर वक्फ बोर्डाला तुमची स्थावर अथवा जंगम मालमत्ता दिली तर ती परत मागण्याचा तुम्हाला कोणताही अधिकार राहत नाही. बोर्डदेखील ती परत करत नाही. अशा प्रकारे महाराष्ट्राचा विचार केल्यास वक्फ बोर्डाकडे मोठ्या प्रमाणात जमीन गोळा झाली आहे. केंद्र सरकारने या वक्फ बोर्डाचे नियम बदलवून त्यात महिलांना स्थान देण्याबाबत विचार सुरू केला आहे. इतरही काही बदल प्रस्तावित आहेत. वक्फ बोर्डाला ते नको आहेत. म्हणून त्यांचा त्याला विरोध आहे. इंडिया आघाडीतील काँग्रेसने त्याला विरोध केला आहे. पण, उबाठा शिवसेनेने याबाबत आपली भूमिका स्पष्ट न केल्याने त्यांची याबाबत भूमिका काय असेल व त्यांनी केंद्र सरकारच्या या ठरावाला विरोध करावा, अशी मागणी घेऊन काही मुसलमान उद्धव ठाकरे यांच्या मातोश्रीवर धडकले होते. अशाच प्रकारे मराठा आंदोलनाबाबतही घडत असल्याचे निदर्शनास येत आहे. आमदार-खासदारांना मराठा आरक्षणाबाबत तुमची भूमिका स्पष्ट करा, असे म्हणून वैयक्तिकरीत्या गाठून विचारले जात आहे. आमदार किंवा खासदार हा ते ज्या पक्षात आहेत त्यांच्या ध्येयधोरणाशी बांधील असतो. तो व्यक्तिशः कोणताही निर्णय घेऊ शकत नाही. पक्षाच्या ध्येयधोरणाविरोधात सार्वजनिक ठिकाणी त्यांनी भूमिका घेतल्यास त्यांच्यावर पक्षशिस्त भंग केल्याची कारवाई त्यांच्या पक्षातर्फे होण्याची शक्यता असते. त्यामुळे ते बोलू शकत नाहीत. मात्र, आंदोलक त्यांना वैयक्तिक भूमिका स्पष्ट करण्यास सांगत आहेत. अशा प्रकारे मंत्री, आमदार, खासदार व लोकप्रतिनिधींच्या घरावर मोर्चा नेण्याचे प्रकारदेखील राज्यात घडत आहेत. त्यावरून घटनेने दिलेल्या भाषण, लेखन व अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा गैरवापर तर होत नाही ना, असा प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होतो.

८८०६००६१४९

---

## वाचक पत्रे

### देशभर संतापाची लाट

कोलकाता येथील आरजी कार वैद्यकीय महाविद्यालयात महिला निवासी डॉक्टरवर बलात्कार करून खून केल्याने देशभरात संताप व्यक्त होत आहे. या पृष्ठभूमीवर १७ ऑगस्ट रोजी इंडियन मेडिकल असोसिएशनने देशभर संपाची हाक दिली. त्यामुळे देशभरातील शासकीय, निमशासकीय व अपवाद वगळता खाजगी रुग्णालयातील रुग्णसेवेवर परिणाम झाला. मुळातच हल्ली सामाजिक भान हरपलेल्या विकृतींनी सर्वत्र पाय पसरले आहेत. त्यांच्यावर कायद्याचा कसलाच धाक उरलेला दिसत नाही. बलात्कार, विनयभंग, छेडखानी आणि वरून खून हे आता नियमित स्वरूपात बघायला मिळत आहेत. सामाजिक अनागोंदी आणि त्यातील अस्वस्थ कंगोरे डोळ्यात खोलवर बोटे घालून जात आहेत. सार्वजनिक क्षेत्रात काम करीत असताना तेथील सुरक्षा धोक्यात आली आहे. अशा ठिकाणी विकृत मनोवृत्तीचे लोक सतत पाळत ठेवून असतात. सरकारी, निमशासकीय रुग्णालये आणि तेथील सुरक्षा व्यवस्थेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आलेला आहे. ही सुरक्षा कडक करण्यासोबतच माणसांचे सामाजिक भान का हरपत चालले आहे, विकृतीचा कहर का वाढतो आहे, लैंगिक शिक्षणाचा प्रचार, प्रसार का केला जात नाही आणि विशेष म्हणजे नैतिक मूल्यांची झालेली घसरण का ताळ्यावर येत नाही. असे अनेक प्रश्न संवेदनशीलपणे मनामनाला भिडत जात आहेत. अशा घटना वाढतच जाणार आणि बेवकूफ राजकारणी लोकांचे अशा घटनांबद्दल साधे तोंड देखील उघडत नाही, हे दुर्दैवी वाटत जाते. शेवटी अशा घटना बघून, ऐकून अंगावर काटा येतो आणि हे कधी थांबेल हा प्रश्न सतत चिंतेत भर घालत जातो.

**बाळासाहेब जोगदंड**/९४२३०५१२४६

●● ●●

### दुर्दैवी घटना

सध्या दररोज वर्तमानपत्र उघडले की मन सुन्न करणाऱ्या घटना वाचायला मिळतात. इकडे लाडकी बहीण योजनेचा लाभ घेतलेल्या महिलांच्या चेहऱ्यावर समाधान दिसते. तेवढ्यातच कोलकात्यातील दुर्दैवी घटना संपूर्ण देशाला ढवळून टाकते. अत्यंत घृणास्पद आणि माणुसकीला काळिमा फासणाऱ्या घटना एकामागून एक घडताहेत. कालचीच बदलापूर येथील नामांकित शाळेतील लज्जास्पद घटना! निषेधार्थ जनक्षोभ उसळतो, रस्त्यावर आंदोलन करतो आणि संपूर्ण खळबळ माजते. या सगळ्याला कसा आळा बसणार? इकडे सरकार भारत देश तंत्रज्ञान आणि विकास क्षेत्रात वैश्विक स्थान निर्माण करू पाहतेय आणि तिकडे नराधम आपल्याच आई-बहिणींवर अत्याचार करताहेत. त्यांच्यावर लवकरात लवकर कठोर कारवाई व्हावी.

**स्नेहल खंडागळे**/नागपूर

●● ●●

### अबब! किती ई-रिक्षे नागपुरात?

नागपुरातील कोणत्याही बाजारपेठेत जा. हल्ली हातठेलेवाले आणि ई-रिक्षावाले यांचीच भाऊगर्दी झाली आहे. रस्ते सिमेंटचे झाले व चांगले मोठे झाले, पण त्याचा फायदा जनतेपेक्षा विक्रेत्यांनाच होताना दिसतोय्. एकदा महालातील केळीबाग रोड, कल्याणेश्वर मंदिर रोड, शिवाजी पुतळा रोड जाऊन बघा. पायी चालणाराच जीव मुठीत घेऊन चालतो.



कधीतरी आयुक्तांना जाग येते आणि ते पोलिसांना जागे करतात. पोलिस दंडुका वापरतात व तात्पुरते हातठेलेवाले बाजूला होतात. हे समाधान केवळ एक-दोन दिवसांचंच असते. मग तू पण चूप मी पण चूप. नागरिक काय, सर्व त्रास सहन करायला मोकळे असतात. जनसेवेसाठी हा शब्द केवळ शोभेचा ठरतो. बरं, हातठेलेवाल्यांचा उपद्रव जन्मजात आहे, त्याला धर्माची पण जोड आहे. आपणच घाबरून राहायचं आहे आणि हेच शिकवलं आहे आपल्या लोकांना. पण ई-रिक्षा...! रस्त्यावर किती असाव्यात, याची काही आकडेवारी आहे का? या लोकांना ना लायसेंस, ना नियम. कोणीही झिलपट पोरगं वाकडं होऊन बसतो व भरगच्च रिक्षा भरून भरधाव जातो. तो अनेकदा उलटतो पण! आणि त्यात एखादा जखमी झाला तर त्यांनी दाद कुठे मागायची? आहे का नियम? एका रांगेत हे रिक्षे चालत असतात. रस्ता अडवून, मध्येच सवारी उतरवून, कधी कुठेही पार्किंग करून आणि आवश्यकतेपेक्षा जास्त सामान, सवारी लादून हे सर्रास पोलिसांसमोरून निघत असतात. कोणाचाच धाक, वचक राहिलेला नाही. या लोकांना जनता उगाच रंगदार वगैरे समजते आणि त्यांच्या वाटेला जाण्याची हिंमत करत नाही. महालात कोतवाली समोरच आहे, पण कारवाईच्या नावाने सर्व आदेशाचे पालनकर्ते आहेत. इथे अनेक नेते अस्तित्वात आहेत. काही तर स्वयंघोषित आहेत. बॅनर पटाईत आहेत, परंतु या विषयाकडे सर्रास दुर्लक्ष आहे. लोकं कंटाळून जातात या रस्त्याने जाताना आणि शेवटी सत्ताधारी नेत्यांना शिव्या देतात. ई-रिक्षा संख्या नियंत्रण, फेरीवाले संख्या नियंत्रण त्यांच्यावर कोणतेतरी कायदेशीर बंधन असले पाहिजे अन्यथा रस्त्यावर माणसं कमी आणि ही वाहनंच जास्त दिसतील. पर्यावरणपूरक वाहनांचं समर्थन करता करता ग्लोबल मारामारी सुरू होईल; त्याचं काय?

**मनोज वैद्य**/९८२२९४९२६०

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# शेतकरी टिकला तर देशाची अर्थव्यवस्था टिकेल- आ.डॉ.गुट्टे

## मी कायम सोबत गुट्टेंची ग्वाही : पूर्णा येथे शेतकरी मेळावा संपन्न

**परभणी ,/प्रतिनिधी:** आपला देश कृषीप्रधान म्हणून जगभर ओळखला जातो. देशाच्या सकल उत्पादनात शेती क्षेत्राचा मोठा वाटा असतो. तसेच केवळ अन्नधान्य नव्हे, तर रोजगार निर्मिती करण्यात सुध्दा कृषी क्षेत्र महत्त्वाची भूमिका बजावत असते. त्याामुळे केंद्र व राज्य सरकार वेगवेगळ्या योजना आणून शेतकरी वर्गाच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहात आहे. कारण, शेतकरी टिकला तर, देशाची अर्थव्यवस्था टिकेल, याची जाणीव केंद्र व राज्य सरकारला आहे, असे प्रतिपादन गंगाखेडचे रासप आ.डॉ.गुट्टे यांनी केले.

शहरातील गजानन मंगल कार्यालय येथे अंतेश्वर बंधारा संघर्ष समिती आयोजित भव्य शेतकरी मेळाव्याचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते. या मेळाव्यात तालुक्यातील शेकडो शेतकरी बांधव उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते. तसेच त्यांनी निवेदनाद्वारे आपल्या मागण्या मांडल्या.

पुढे आ.डॉ.गुट्टे म्हणाले की, शेतीचे उत्पन्न वाढले, तरच शेतकऱ्यांची उन्नती शक्य आहे. त्याामुळे केंद्र व राज्य सरकार सातत्याने शेतकरी हिताची भूमिका घेवून काम करीत आहे. यंदाच्या अर्थसंकल्पात भरीव तरतूदी करून केंद्र व राज्य सरकारने मोलाची कामगिरी केली आहे. पिक विमा, अतिवृष्टी अनुदान, प्रोत्साहनपर अनुदान, दुध व सोयाबीन अनुदान, मोफत वीज पुरवठा, नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजना सारखे सकारात्मक निर्णय घेवून देशातील शेतकरी बांधवांना दिलासा दिला आहे.

तसेच तुमच्या मागण्या अतिशय रास्त आहेत. त्याामुळे संबंधित मंत्री, विभाग व अधिकारी यांच्याकडे यथायोग्य पाठपुरावा करून त्या मागण्या पूर्ण करण्यासाठी प्रामाणिक प्रयत करणार आहे. कारण, मला आपल्या कष्टाची जाण आहे. शेती हा माझा आवडीचा विषय आहे. त्याामुळे या मागण्यासह इतरही बाबतीत कायम तुमच्या सोबत असणार आहे, अशीही ग्वाही आ.गुट्टे यांनी उपस्थित शेतकऱ्यांना दिली. दरम्यान, उन्हाळ्यात अंतेश्वर बंधाऱ्यातले ७० टक्के पाणी परिसरातील ३० गावांना मिळावे. तसेच शेती व जनावरांसाठी काही पाणी राखीव ठेवण्यात यावे, ज्या बाधीत क्षेत्राची मोजणी झालेली



नाही. त्यांची लवकर मोजणी करून त्यांना पाच पट मोबदला द्यावा, वाढीव पाणीपट्टी दर कमी करावा, भुसंपादन केलेल्या शेतकऱ्यांना प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र द्यावे, मागणी करणाऱ्या शेतकऱ्यांना पाणी परवाने द्यावेत, भुसंपादन झालेल्या शेतकऱ्यांच्या एका मोटारीला पाणी पट्टी कर घेवू नये, स्थानिक शेतकऱ्यांच्या सिंचनासाठी बंधाऱ्यात पाणी राखीव ठेवण्यात यावे, या प्रमुख मागण्यांसाठी हा मेळावा आयोजित करण्यात आला होता.

मेळाव्याचे प्रास्ताविक बळीराम कदम आणि सूत्रसंचालन माधव मोहीते यांनी केले. आभार व्यंकटराव मोरे यांनी मानले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष साहेबराव चव्हाण, तालुकाध्यक्ष गणेश कदम, सुभाष देशमुख, नंदकुमार डाखोरे, सरपंच उत्तमराव डोणे, जिल्हा नियोजन समितीचे सदस्य अनंतराव पारवे, संजय गांधी निराधार समितीचे अध्यक्ष मुकुंद भोळे, सदस्य व्यंकटराव मोरे, रासपा तालुका अध्यक्ष जगन्नाथ रेनगडे, युवक तालुकाध्यक्ष मारुती मोहिते, मारुती मोहिते महागावकर, बाळासाहेब कदम, विकास घाते,नाना आवरगंड, विश्वनाथ होळकर यांच्यासह अंतेश्वर बंधारा संघर्ष समितीचे सर्व पदाधिकारी, सदस्य, महायुतीचे पक्षीय पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेतकऱ्यांनी एकत्र येत शेती यशस्वी करण्यासाठी पुढे यावे! अलीकडे वातावरण अनिश्चित असले तरी अद्ययावत तंत्रज्ञान वापरून शेती करता येते. तसेच शेतीतील अनाठायी खर्च कमी करून योग्य जागी पैसा वापरून उत्पादन वाढीसाठी प्रयतही करता येतील. परंतु, नवीन प्रयोग करताना पुरेशी माहिती घेणे शेतकरी म्हणून आपली जबाबदारी आहे. माहिती व ज्ञानामुळे संभाव्य जोखीम कमी होते. शेतकऱ्यांनी एकत्र येत शेती यशस्वी करण्यासाठी पुढे यावे, असेही आवाहन आ.डॉ.गुट्टे यांनी केले.

## करवली येथे विवाहीत महिलेचा पतीने केला खुन



**बोरी /प्रतिनिधी-** जिंतूर तालुक्यातील करवली येथे सायंकाळी चार वाजता स्वतःच्या शेतामध्ये आखड्यावरआपल्या पतीला चारित्र्याच्या संशयावरून अवताच्या पासने हल्ला करून जागीच ठार केल्याची घटना दिनांक २२ ऑगस्ट रोजी घडली. याबाबत करवली येथील ग्रामस्थ यांनी बोरी पोलीस स्टेशनला माहिती दिली माहिती दिल्यावर सपोनी सुनील गोपनीवार यांनी आपल्या कर्मचाऱ्यासह घटनास्थळी भेट देऊन पंचनामा करून प्रेत ताब्यात घेऊन बोरी ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदन करण्यासाठी दाखल करण्यात आले होते.

याबाबत थोडक्यात माहिती अशी की करवली येथील विवाहित महिला ज्योती सतिश गिरी वय २६ वर्षे या आपल्या चरित्राच्या संशयावरून पतीला स्वतःच्या शेतातील आखाड्यावर पतीने अवताच्या पासने हल्ला करून जागीच ठार केल्याची घटना घडली आहे . याप्रकरणी बोरी पोलीस स्टेशनला मुलीचे वडील पुरी राहणार भोसा ता. मानवत गुन्ह्याची नोंद करण्याची प्रक्रिया बोरी पोलीस स्टेशनला सुरू होती. विवाहित महिलेच्या पश्चात पती सासु मुलगा मुलगी या घटनेमुळे करवली परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

## संक्षिप्त वृत्त...

### जिल्हा बंद ऐवजी काळया पिती लावून निषेध

**परभणी,/प्रतिनिधी:** महिला अत्याचाराच्या घटनेचा आणि राज्य सरकारच्या निष्क्रियतेविरोधात महाविकास आघाडीच्या नेतेमंडळींनी जाहीर केलेले जिल्हा बंदचे आंदोलन मागे घेतले आहे. बंद ऐवजी शनिवारी महाविकास आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते काळ्या फिती लावून निषेध नोंदविणार आहेत.

महाविकास आघाडीने शनिवार २४ ऑगस्ट रोजी राज्यव्यापी बंदचे आवाहन केले होते. या पार्श्वभूमीवर उच्च न्यायालयाने तो बंद पूर्णतः बेकायदेशीर ठरविला. त्याामुळे महाविकास आघाडीच्या श्रेष्ठींनी राज्यव्यापी बंदचे आवाहन मागे घेतले. त्याऐवजी काळ्या फिती लावून बदलापुरातील चिमुकल्यांवरील अत्याचाराचा तसेच राज्य सरकारच्या निष्क्रियतेचा निषेध नोंदविण्याचे आवाहन केले. त्याा प्रमाणे जिल्ह्यातील महाविकास आघाडीच्या नेतेमंडळींनी जिल्ह्यात शनिवारी बंद ऐवजी काळ्या फिती लावून निषेध नोंदविण्याचा निर्णय घेतला.

### परभणी व जिंतूरात जोरदार पाऊस

**परभणी,/प्रतिनिधी:** परभणी शहरासह परिसरात तसेच जिंतूर शहरासह परिसरात शुक्रवारी सायंकाळी मुसळधार पाऊस झाला.

गेल्या काही दिवसांपासून वातावरणात कमालीचा उकाडा जाणवत होता. परंतु, पावसाचा पत्ता नव्हता. शुक्रवारी सकाळपासून अधुनमधून ढगाळ वातावरण पसरत होते. सायंकाळी पुन्हा आभाळ आल्याबरोबर रिमझिम पाऊस सुरु झाला. पाठोपाठ मध्यम स्वरुपाचा पाऊस झाला. मात्र सायंकाळी सात वाजेच्या सुमारास मूसळधार पाऊस सुरु झाला. या पावसाने परभणी शहर अक्षरशः ओलेचिंब झाले. ठिकठिकाणी मोठ्या प्रमाणावर पाणीच पाणी साचले. सखल भाग जलमय झाला. या पावसाळ्यात शहरवासीयांनी पहिल्यांदाच मोठा पाऊस अनुभवला. परभणी प्रमाणेच जिंतूर शहरासह परिसरातसही मूसळधार पावसाने झोडपून काढले.

### झरीच्या सरपंचपदी दिलीपराव सावंत तर उपसरपंचपदी राहीन दादामियाँ इनामदार

**परभणी,/प्रतिनिधी:** परभणी तालुक्यातील सर्वात मोठ्या झरी येथील ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी दिलीपराव सावंत तर उपसरपंचपदी राहीन दादामियाँ इनामदार यांची निवड झाली.

विद्यमान सरपंच व उपसरपंच यांनी आपला पदाचा राजीनामा दिला होता. त्याा पार्श्वभूमीवर या दोन्ही पदांसाठी शुक्रवारी येथील ग्रामपंचायत कार्यालयात विशेष बैठकीतून निवडणूक झाली. सरपंच पदासाठी स्व. गजानन देशमुख यांच्या गटाकडून सुनील देशमुख यांनी तर विरोधी गटातून दिलीप सावंत यांचा सरपंच पदासाठी अर्ज दाखल झाला. तर उपसरपंच पदासाठी सुमय्या अतीक इनामदार व राहीन दादामियाँ इनामदार या दोघांचे अर्ज दाखल झाले. त्याामुळे या दोन्ही पदांसाठी निवडणूक अटळ ठरली. या दोन्ही पदासाठी निवडणूक निर्वाचन अधिकारी एस.एस. डोंगरदिवे व सचिव सतिश बनसोडे यांच्या उपस्थितीत मतदान झाल्याबरोबर मतमोजणी झाली. त्याातून सरपंचपदी सावंत हे एका मताने विजयी झाले. तर उपसरपंचपदी इनामदार हेही एका मताने विजयी झाले. एकूण १७ सदस्यांनी मतदनाचा हक्क बजावला. विरोधी गटातील सावंत हे सरपंच पदी तर सत्तारुढ गटातील राहीन दादामियाँ इनामदार हे उपसरपंचपदी निवडून आल्याने कही खुशी कही गम असे चित्र निर्माण झाले आहे. दरम्यान, यावेळी पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात होता. त्याामुळे ग्रामपंचायत कार्यालयास गावातसुध्दा अक्षरशः छावणीचे स्वरुप आले होते.

### जिल्हा परिषद कार्यालयास जत्रेचे स्वरुप

**परभणी,/प्रतिनिधी:** मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेंतर्गत जिल्हा परिषद शिक्षण विभागाने जिल्ह्यातील डी.एड. व बी.एड.धारकांकडून शुक्रवारी अर्ज मागविल्याच्या पार्श्वभूमीवर संबंधित उमेदवारांनी सकाळपासूनच जिल्हा परिषद इमारतीच्या परिसरात मोठी गर्दी केली. दुपारी तर या इमारतीस अक्षरशः जत्रेचे स्वरुप आले होते.

माध्यमिक शिक्षण विभागाने डी.एड., बी.एड. धारकांकरीता सहा महिन्यासाठी शिक्षण म्हणून प्रशिक्षणासाठी अर्ज मागविले होते. त्याामुळे दुसऱ्या माळ्यावरील कार्यालयात हे अर्ज स्विकारण्याकरीता प्रक्रियाही सुरु झाली. त्याावेळी संबंधीत उमेदवारांची भाऊगर्दी झाली. लांबलचक रांगा लागल्या. दुपारी तर या इमारतीच्या परिसरास अक्षरशः जत्रेचे स्वरुप आले होते.

सोलापूर तरुण भारत
कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी
❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया
छोट्या जाहिराती व प्रगटनासाठी
खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/
९४ २३३२४६६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३



## जिंतूर तालुक्यातील विविध गावातील राष्ट्रवादी व काँग्रेस पक्षात भाजप कार्यकर्त्यांचा समावेश

**जिंतूर/ प्रतिनिधी-** जिंतूर तालुक्यातील विविध गावातील राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गट व भाजपा कार्यकर्त्यांचा भारतीय राष्ट्रीय काँग्रेसमध्ये जाहीर प्रवेश करण्यात आला होता.

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस सचिव सुरेश नागरे यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने व पुढील काही दिवसात विधानसभेच्या निवडणुका होणार असून विविध पक्ष आपापल्या पक्षांमध्ये इतर पक्षातील कार्यकर्त्यांचे प्रवेश करवून घेत आहेत त्याचाच भाग म्हणून जिंतूर तालुक्यातील विविध गावातील राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गट व भाजपा कार्यकर्त्यांनी आज दिनांक २३ ऑगस्ट रोजी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस सचिव सुरेश नागरे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून भारतीय राष्ट्रीय काँग्रेसमध्ये जाहीर प्रवेश केला.

जिंतूर तालुक्यातील इत्यादी गावच्या राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गट व भाजपा कार्यकर्त्यांनी अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला. या मध्ये केहाळ तांडा, ईश्वर नगर, हलवीरा तांडा, भांबळे सावंगी, श्रीरामवाडी, टाकळखोपा, साखर तळा, मोहखेड, भोशी, इत्यादी गावाने महाराष्ट्र प्रदेश सचिव सुरेश भैया नागरे यांच्या वाढदिवसाच्या दिवशी राष्ट्रीय काँग्रेस पक्षामध्ये जाहीर प्रवेश केला यावेळी माजी जिल्हा परिषद अध्यक्ष प्रसादराव बुधवंत, माजी जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र नागरे, माजी जिल्हा परिषद सदस्य अविनाश भाऊ काळे,राजेश चव्हाण सरपंच कवडा, काँग्रेस शहराध्यक्ष बासू खान पठाण, माजी नगरसेवक उस्मान खान पठाण, अल्पसंख्यांक शहराध्यक्ष जाबेर मुल्ला युवा कार्यकर्ते वसीम खान पठाण बाळासाहेब जोगदंड, जम्मू भाई आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## संसार उपयोगी साहित्य वाटप- आ.साकोरे

**जिंतूर,/प्रतिनिधी-** दिनाक २३/८/२०२४ जिंतूर शहर मा.बाईसाहेब बोर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली विधानसभा आमदार सौ .मेघना दीदी साकोरे बोर्डीकर यांच्या नेतृत्वामध्ये नूतनीकरण कामगार केलेल्या कामगारांना संसार उपयोगी किट मेघना दीदी साकोरे यांच्या प्रयताने जिंतूर शहरी लक्ष्मी मंगल कार्यालय परभणी रोड जिंतूर या ठिकाणी वाटप करण्यात आले आहे.

जिंतूर शहरवासीयांना व नूतनीकरण केलेल्या कामगारांना जिल्हास्तरीय असलेले कामगार ऑफिस यामध्ये एजंटामार्फत होत असलेली पिळवणूक व गरीब लोकांची आर्थिक लूट गरीब लोकांची मजुरी व वेळ वाया जाऊ नये म्हणून याकरिता जिंतूर शहरात जिल्हा स्तरीय असलेले कामगार विभागाचे अधिकारी कर्मचारी यांना जिंतूर या ठिकाणी ऑफिसची व्यवस्था करून अडी अडचणी आलेल्या येथे सोडविण्यात यावा व संसार उपयोगी येणाऱ्या वस्तू याचे रजिस्ट्रेशन कॅम्प घेऊन सर्व लोकांना लाभ मिळावा याकरिता जेवढे रजिस्ट्रेशन केलेले आज रोजी ६०० मजुरांना किट वाटप करण्यात आले.

यावेळी उपस्थितीत. विधानसभा प्रमुख पंडित दराडे माजी नगरसेवक रहेमान लाडले, माजी नगरसेवक मुखीद भाई, सय्यद फेरोज, माधव दराडे, दत्ता कटारे, बाबू राज,भंडारे , काळे सरपंच, सचिन आडे, हमीद भाई कोकर अस्लम भाई कुरेशी, मोबीन भाई कुरेशी, सुमित सूर्यवंशी, अशोक बुधवंत, विजय राठोड, युवराज घनसावंत, आदी संख्येने उपस्थित कार्य करते.



## शिवसेनेच्यावतीने जिंतूर येथे मुक मोर्चास प्रतिसाद

**जिंतूर / प्रतिनिधी-** जिंतूरात शिवसेनेच्या वतीने येथे मूक निषेध मोर्चा काढण्यात आला होता.

बदलापूर चार वर्षाच्या चिमुरडीवरील बलात्कार प्रकरणी आज जिंतूर शहरामध्ये शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या वतीने मुक निषेध मोर्चा काढण्यात आला शिवसेनेचे पदाधिकारी श्री राम शर्मा श्री बंडू लांडगे सौ सुरेखा शेवाळे टाले श्री अरविंद कटारे पंढरीनाथ बोरगिल श्री विठ्ठल राठोड वैजनाथ कदम यांच्या उपस्थितीत शिवसेनेच्या वतीने जाहीर निषेध नोंदवण्यात आला सदरील मोर्चा शिवसेना संपर्क कार्यालय जिंतूर येथून तहसील कार्यालय जिंतूर पर्यंत काढण्यात आला पक्षाच्या वतीने पदाधिकाऱ्यांनी श्री तहसीलदार साहेब जिंतूर यांना बदलापूर घटनेचा जाहीर निषेध नोंदवत निवेदन देण्यात आले.

पत्रकारांशी बोलत असताना शिवसेनेच्या जिल्हा संघटक सुरेखाताई शेवाळे टाले यांनी पक्षाच्या आदेशाचे पालन करत तसेच माननीय परभणी जिल्ह्याचे खासदार शिवसेनेचे उपनेते संजय जी जाधव उर्फ बंडू बॉस यांच्या नेतृत्वाखाली आजचा मुख निषेध नोंदवल्याचे




सांगण्यात आले तसेच सदरील बदलापूर या ठिकाणी झालेल्या चार वर्षाच्या चिमुकली वरील बलात्काराच्या प्रसंग हा गंभीर असून आज महिला सेफ नाही यावर प्रशासनाने गांभीर्याने दखल घेणे गरजेचे आहे तसेच संबंधित नराधमाला फाशीची शिक्षा झाली पाहिजे अशी मागणी राज्यपालांकडे करण्यात आले आहे महाराष्ट्राचे गृहमंत्री अशा घटना होऊनही निद्रा अवस्थेत आहेत की काय असा प्रश्न सामान्य जनतेला पडलेला असून अशा घटना थांबवण्यासाठी प्रशासनाने व गृह खात्याने गंभीर कलमे लावली पाहिजे आज रोजी महाराष्ट्राची परिस्थिती ही विदारक असो अशा अनेक घटना महाराष्ट्रात घडत असताना दिसत आहेत सरकारने याकडे गांभीर्याने पाहण्याची गरज व्यक्त केली जात आहे..

## पुंगळा जि.प.शाळेच्या नवीन इमारतीसाठी करणार पाठपुरावा- ॲड.सुनिल बुधवंत



**जिंतूर / प्रतिनिधी-** जिंतूर तालुक्यातील पुंगळा गावातील जि. प. शाळेची भिंत कोसळल्याची घटना दि. १७ ऑगस्ट रोजीच्या रात्री घडली होती. शिवसेनेचे शिंदे गटाचे जिंतूर तालुकाप्रमुख ॲड. सुनिल शिवाजीराव बुधवंत यांनी दि. २४ ऑगस्ट रोजी शाळेला भेट देऊन पडलेल्या भिंतीची तसेच इतर वर्गखोल्यांची पाहणी केली.

सदरील प्राथमिक शाळेचे बांधकाम निजामकालीन असल्यामुळे वर्ग खोल्यांचे बांधकाम जीर्ण झालं आहे. शाळेतील चारही वर्गखोल्या धोकादायक परिस्थितीत असून त्याा पडण्याच्या स्थितीत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. शालेय शिक्षण समिती सदस्यांशी, शिक्षकांशी तसेच गटशिक्षणाधिकारी यांच्याशी चर्चा केली असता शालेय शिक्षण समितीच्या उपाध्यक्षा आश्विनी रामप्रसाद उपाध्ये तसेच कुर्येवार सर यांनी सदरील जीर्ण झालेल्या शाळेचा प्रस्ताव परभणी जिल्हा परिषदेच्या शिक्षणाधिकारी कार्यालयाकडे पाठवला असून प्रलंबित असल्याचे सांगितले. तेंव्हा ॲड. सुनिल बुधवंत यांनी जिल्हा परिषदेच्या शिक्षणाधिकारी कार्यालयाकडे संपर्क करून तसेच बांधकाम संबंधित अभियंत्यांशी चर्चा करून लवकरात लवकर शाळेच्या नवीन इमारतीसाठी पाठपुरावा करणार असल्याचे सांगितले. पाहणी दरम्यान शिवसेना सचिव अशोकराव देशमुख, शालेय शिक्षण समिती उपाध्यक्षा आश्विनी रामप्रसाद उपाध्ये, मुख्याध्यापक हजारे सर, कुर्येवार सर, आडे सर, पवार सर, दुबे सर, बोपीनवार मॅडम, तायडे मॅडम, देशमाने मॅडम, सुभाषराव जगताप, मुंजाजी पालवे इत्यादी उपस्थित होते.

## बदलापूर प्रकरणी महाविकास आघाडीचा मानवत शहरात निषेध

**मानवत ,/प्रतिनिधी:** मानवत येथे आज बदलापुर प्रकरण काळया फीती लाऊन निषेध व्यक्त करण्यात आला. मानवतमहाविकासआघाडीच्या वतिने निवेदन देण्यात आले तहसिलदार यांचे प्रतिनिधि म्हणून महसूल विभागाचे तलाठी माणिकराव जाधव यांनी निवेदन स्वीकारले.

या निवेदनात माणुसकिला काळीमा फासणारी घटना बदलापूर येथे घडली आहे अशी घटना घडत असताना देखील पोलिस प्रशासनाची पिडितेस व तिच्या आई वडिलास ११ तास फिर्याद घेण्यास पोलिस स्टेशनमध्ये बसून ठेवले त्यांच्यावर अत्याचार होऊन त्यांनाच यातना यातुन हे स्पष्ट होते की या राज्य शासनाच्या काळात कायद्याची बकाल अवस्था झाली आहे प्रत्योक ठिकाणी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झालेला आहे महाराष्ट्रा मध्ये महिला सुरक्षित नाहीत, गुंड प्रवृत्तीच्या लोकांना कायद्याची वचक राहिलेली नाही काही अधिकारी व कर्मचारी गुंड प्रवृत्ती करण्यास मदत करतात त्याामुळे गुन्हा करण्याची हिंमत दिवसेंदिवस वाढत आहे या राज्यातल्या युती सरकारमुळे महाराष्ट्राची संस्कृती रसातळाला गेली आहे गृहमंत्री गृहखाते सांभाळण्याच्या ऐवजी पक्ष फोडाफोडी मध्ये व्यस्त आहेत.

मानवत तालुका व मानवत शहराच्या महाविकास आघाडी च्या वतीने सदरिल घटनेचा तीव्र निषेध करण्यात येतो या निवेदनावर मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षा चे जिल्हा कमिटी सदस्य रामराजे महाडीक , राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गट जिल्हा उपाध्यक्ष ॲड. लुकमान बागवान , तालुका अध्यक्ष भारतीय राष्ट्रीय कांग्रेस बाबाजी आवचार , तालुका अध्यक्ष राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गट संतोषराव लाडाने , जिल्हा उपाध्यक्ष माणिकराव काळे, संभाजी ब्रिगेड चे गोविंद आबा घांडगे , उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे शहर प्रमुख अनिल जाधव ,



युवा सेनेचे ता. प्रमुख कृष्णा शिंदे , शहर संघटक सुरेश बनगर , ॲड. विक्रमसिंह दहे , अनंतमामा भदर्गे , शैलेश वडमारे , माऊली काका कदम , नंदू पाटील , सरपंच बबलू राजे , दत्ता पांढरे , सुरेश चव्हाण , अफसर भाई अंन्सारी , आरेफभाई, हरदयालसिंग , जाबेरलाला, वैजेनाथ महीपाल , संतोष आंबेगावकर , बाबा काळे , गणेश दहे , कैलास दळवे , कूंडलिक थिटे , भागवत गायकवाड , ईत्यादी सह महाविकास आघाडी चे सर्व आजी माजी पदाधिकारी या वेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## श्री. स्वामी समर्थ महाविद्यालय येथे विद्यापीठ वर्धापन दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.२३ ऑगस्ट -**



श्री.स्वामी समर्थ कला व विज्ञान वरिष्ठ महाविद्यालय, रुईभर येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा ६६ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी डॉ. आंबेडकर बाल विकास शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सुभाष कोळगे यांच्या हस्ते विद्यापीठ ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष सुभाष कोळगे म्हणाले, उच्च शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी महाविद्यालयाने नवीन शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करावी असे अवाहन करून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी आपल्या उच्च शिक्षणातून समाजकार्य करावे, असे मत व्यक्त केले.

याप्रसंगी माजी जि.प. सदस्य रामदास कोळगे, शिवसेना नेते राजनारायण कोळगे, माजी सरपंच बालाजी कोळगे, प्राचार्य जयप्रकाश कोळगे, श्री स्वामी समर्थ कला व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य संतोष कपाळे, उपप्राचार्य धनाजी भोसले, प्रशासकीय अधिकारी शिवकन्या साळुंके, इंदिरा गांधी प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक नानासाहेब शेलार, पर्यवेक्षक के.ए.डोंगरे प्राध्यापक, प्राध्यापिका शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



### संक्षिप्त वृत्त...

## शबरी शहरी घरकुल योजनेअंतर्गत घरकुल जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते लोकार्पण

**धाराशिव, दि.२४ ऑगस्ट -**

शबरी घरकुल योजनेअंतर्गत सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात आदिवासी समाजाकरिता मंजूर झालेल्या हक्काच्या घरकुलांचा लोकार्पण सोहळा सोमवार, २६ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी १० वाजता पापनास नगर धाराशिव येथे आयोजित करण्यात आला आहे. जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओंम्बासे यांच्या हस्ते घरकुलाचे लोकार्पण होणार आहे. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून ठाणे आदिवासी विकास विभागाचे अप्पर आयुक्त दीपककुमार मीना, धाराशिव जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मैनाक घोष तर एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प सोलापूरचे प्रकल्प अधिकारी धनंजय झाकर्डे, धाराशिवच्या तहसिलदार डॉ.सौ.मृणाल जाधव, नगर परिषदेच्या मुख्याधिकारी वसुधा फड, आदिवासी पारधी महासंघाचे प्रदेश कार्याध्यक्ष सुनील काळे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. धाराशिव शहरातील शासकीय दुध डेअरीच्या पाठीमागील पापनास नगर येथे होणाऱ्या कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प सोलापूरचे सहायक प्रकल्प अधिकारी विशाल सरतापे यांनी कळविले आहे.



## तेरणा महाविद्यालय परिसरात परिसर स्वच्छतेचे आयोजन

**धाराशिव, दि.२४ ऑगस्ट -**

तेरणा महाविद्यालय येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महाविद्यालय परिसरात परिसर स्वच्छतेचे आयोजन प्राचार्य डॉ. अशोक घोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. याप्रसंगी महाविद्यालयाच्या परिसरातील स्वच्छता करण्यात आली. यामध्ये राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. सुशीलकुमार सरवदे, डॉ.अनघा तोडकरी, डॉ.तुळशीराम उकिरडे तसेच महाविद्यालयातील प्रा.उत्तरेश्वर तवले, डॉ.अरुणा सावरगावकर, डॉ.डी.बी.मोरे, डॉ.दीपिका देशमुख, प्रा.अर्चना तवले, प्रा.रोहिणी माने, प्रा.सुचिता कोल्हे, प्रा.छाया शिंदे, प्रा.बालाजी काकडे, तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक विद्यार्थी, विद्यार्थिनी उस्फूर्तपणे मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# भाविकांची नवरात्र काळात गैरसोय होणार नाही याची दक्षता घ्यावी : जिल्हाधिकारी डॉ.ओम्बासे

## शारदीय नवरात्र महोत्सव २०२४ : शारदीय नवरात्र महोत्सव पूर्व तयारीचा आढावा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२४ ऑगस्ट -**

ऑक्टोबर महिन्यात दि. ३ ते १८ या कालावधीत श्री.तुळजाभवानी मातेचा शारदीय नवरात्र महोत्सव होणार आहे.यादरम्यान विविध विभागाकडून यात्रेत व्यवस्था करण्यात येते.ही यात्रा व्यवस्था उत्तम असण्यासह महोत्सवादरम्यान भाविकांची गैरसोय होणार नाही याची दक्षता यंत्रणांनी घ्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओम्बासे यांनी दिले.

श्री.तुळजाभवानी मंदीर संस्थान सभागृह, तुळजापूर येथे आगामी शारदीय महोत्सवासाठी २३ ऑगस्ट रोजी आयोजित आढावा बैठकीत डॉ.ओंबासे बोलत होते. यावेळी जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष,पोलिस अधिक्षक संजय जाधव, उपविभागीय अधिकारी संजय डव्हाळे, अति.पोलिस अधिक्षक गौहर हसन, उपविभागीय अधिकारी संजय डव्हाळे, उपविभागीय पोलिस अधिकारी निलेश देशमुख, तहसीलदार अरविंद बोळंगे, तुळजाभवानी मंदीर प्रशासकीय व्यवस्थापक तथा तहसीलदार माया माने, सहाय्यक धार्मिक व्यवस्थापक सिध्देश्वर इंतुले यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ.ओंबासे म्हणाले, येणाऱ्या भाविकांना विविध सुचना देण्यात येवून तुळजापूरकडे येणाऱ्या सर्व रस्त्यावर महामार्गावर तसे फलक लावण्यात यावे.शहरात अनेक रिक्षा अनधिकृत असून त्या गॅसवर चालविण्यात येतात. यामुळे अनुचित प्रकार घडण्याची शक्यता आहे.तसेच प्रवाशांची फसवणूक होणार नाही यासाठी रिक्षांचे दरपत्रक रिक्षा स्टँडवर लावण्यासह प्रवाशांची संख्या निश्चित करावी.

संभाव्य अपघाताच्या ठिकाणी प्रतिबंधात्मक कारवाईच्या सुचना यावेळी त्यांनी सहाय्यक प्रादेशिक अधिकारी यांना दिल्या.

नगर परिषदेने शहरात बॅरेकेटींग लावणे, आवश्यक त्या ठिकाणी जंतूनाशक पावडरची फवारणी करणे,शहरातील अंतर्गत रस्ते दुरुस्त करुन स्ट्रीट लाईट लावणे,श्री घाटशीळ,पापनाश व महाव्दार परिसरात २४ तास स्वच्छता कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात यावी असे सांगून डॉ. ओंबासे म्हणाले, प्रधिकरणावेळी करण्यात आलेल्या कामामुळे पोल काढण्यात आले आहेत, अशा ठिकाणी पोल बसवून घ्यावे. शहरात फिरणारी मोकाट जनावरे,श्वान व वराह यांचा बंदोबस्त करावा.कोंडवाडयाची व्यवस्था करावी. तसेच जनावरे मालकाकडून दंड वसुल करावा असे निर्देश तुळजापुर नागरपालिकेला डॉ.ओंबासे यांनी दिले.

रस्त्यांच्यासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागांनी आपआपली जबाबदारी पार पाडावी असे सांगून डॉ.ओंबासे म्हणाले की,तुळजापूर शहराकडे येणाऱ्या सर्व रस्त्यांची दुरुस्ती करुन घ्यावी,तसेच रस्त्याच्या कडेला वाढलेले गवत काढून तात्काळ त्या ठिकाणी मुरुम टाकण्याची व्यवस्था करावी.भाविकांना मार्गदर्शनासाठी विविध स्वरुपाचे फलक लावावेत.

शारदीय नवरात्र महोत्सवादरम्यान विद्युत पुरवठा खंडीत होणार नाही या दक्षतेसह या काळात एक उपअभियंता व दोन वायरमन यांची स्वतंत्रपणे नियुक्ती करण्यासह मंदीरासाठी करण्यात येणाऱ्या पाणीपुरवठयाचा विजपुरवठा खंडीत होणार नाही याची दक्षता घेण्याचे निर्देश देऊन डॉ. ओंबासे म्हणाले, ट्रान्सफार्मरवर येणारा लोड क्षमतेपेक्षा जास्त नसावा. शहरातील विजेचे केबल, बॉक्स, मेन बॉक्स उघडे राहणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

महाराष्ट्र राज्य परिवहन विभागाने बसेसची व्यवस्था करुन बसमुळे वाहतूक विस्कळीत होणार नाही याची दक्षता घ्यावी. इतर सर्व विभागांना नेमून दिलेली कामे वेळेत पूर्ण करुन भाविकांची गैरसोय होणार नाही. यांची दक्षता घेण्याच्या सुचना यावेळी दिल्या.

यावेळी पोलिस निरीक्षक रवींद्र खांडेकर, तुळजापूरचे आगार व्यवस्थापक रामेश्वर शिंदे, मंदीर संस्थानचे अधिकारी - कर्मचारी तसेच विविध यंत्रणांचे अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.



### जिल्हाधिकारी यांनी केली चर्चा अन् सुटला प्रश्न

शारदीय नवरात्र महोत्सवादरम्यान स्थानिकांना आपल्या दुचाकी घराकडे नेण्याचा मोठा प्रश्न निर्माण होत होता. यामुळे सुवर्णेश्वर गणपती मंदीराजवळ अनेक वेळा वाद निर्माण होत होता. यामुळे येथे बॅरेकेटींग लावण्यासाठी या परिसरातील नागरिकांचा विरोध होता. या आढावा बैठकीत ज्या नागरिकांचा विरोध होता त्यांना बोलावून त्यांचेशी चर्चा केली. आता त्या ठिकाणी तात्पुरते बॅरेकेटींग झुलता पुल बसविण्यात येणार आहे.यामुळे स्थानिकांना येथे येणे-जाणेसाठी आता अडचण येणार नाही.

### बोगस पुजाऱ्यांवर होणार कारवाई

मंदीरात अनुचित प्रकार घडू नये,तसेच भाविकांची फसवणूक होवू नये यासाठी आता बोगस पुजाऱ्यांवर कारवाई करण्यात येणार आहे.यासाठी तीनही पुजारी मंडळाच्या याद्यांची पुर्नतपासणी करण्यात येवून त्यांना क्यु आर कार्ड असलेले ओळखपत्र देण्यात येणार आहे.

### सिमोल्लंघानावेळी आता कुंकाऐवजी फुले

शारदीय नवरात्र महोत्सवाचा सिमोल्लंघन हा महत्वाचा उत्सव असतो. सिमोल्लंघनावेळी काहीजण मंदीरावर चढून पालखीवर पोत्याने कुंकू उधळल्याने गोंधळाची परिस्थिती निर्माण होते.यामुळे आता पालखीवर कुंकूऐवजी फुले उधळण्यात येणार आहेत.

## संस्कृत विभागामार्फत रक्षाबंधन सण साजरा

**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.२४ ऑगस्ट -**

रक्षाबंधन सणानिमित्त अणदूर येथील जवाहर महाविद्यालयातील संस्कृतच्या विद्यार्थीनींनी बहीण- भावाचे अतुट नाते सांगणारा रक्षाबंधन हा सण नळदुर्ग येथील पोलिस ठाण्यातील उपस्थित पोलिस बांधवांना राख्या बांधून व औक्षण करुन साजरा केला.

प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षीही संस्कृत विभाग प्रमुख प्रा. सत्येंद्र राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली भाऊ बहिणीच्या पवित्र प्रेमाचा सण साजरा केला. पोलीस बांधवांना जवाहर महाविद्यालयातील संस्कृत विषयाच्या प्रीती राजपूत, कोमल सराटे, ज्योति शंकरशेटे, शुभांगी लोंढे, दिपिका अक्कलकोटे, साक्षी मुळे, मुस्कान पठाण, पल्लवी मनशेट्टी, भक्ती होगाडे, प्रतिक्षा मनशेट्टी, राधिका गायकवाड, स्वाती निकंबे, श्रेया सोनटक्के, माधवी दळवे, कांचन दळवे, पल्लवी चौगुले, प्राची डोकडे आदी उपस्थित होते.

## भारतीय किसान संघ जिल्हा अध्यक्षपदी नितिन घुले यांची निवड

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२४ ऑगस्ट -**



भारतीय किसान संघ जिल्हा संमेलन काल धाराशिव येथे नुकतेच पार पडले. या अधिवेशनासाठी भारतीय किसान संघ महाराष्ट्र प्रांतचे उप अध्यक्ष अ‍ॅड.रावसाहेब शहाणे, भारतीय किसान संघ जिल्हा सोलापूरचे अध्यक्ष नागाप्पा सिंदगी उपस्थित होते.

शेतकऱ्यांनी शेतकऱ्यांसाठी चालवलेली देशव्यापी व सामूहिक नेतृत्व असलेले गैर राजकीय संघटन म्हणून भारतीय किसान संघ देश भर ओळखला जातो. या भारतीय किसान संघाचे जिल्हा अधिवेशन धाराशिव येथे पार पडले.

या अधिवेशनात शेतकऱ्याच्या विविध समस्यांवर चर्चा होवून त्यावर काही ठराव संमत करण्यात येवून ते महाराष्ट्र शासनास सादर करण्याचे ठरले. त्यासोबतच भारतीय किसान संघ करीत असलेल्या देशभरातील कार्याची माहिती उपस्थित शेतकरयांना देण्यात आली. उपस्थित शेतकऱ्यांमधून आगामी तीन वर्ष साठी भारतीय किसान संघ धाराशिव जिल्हा अध्यक्षपदी नितीन घुले वाशी यांची एकमताने निवड करण्यात आली.

जिल्हा मंत्री म्हणून येवती येथील भूपाल गायकवाड यांची, जिल्हा युवा प्रमुख अमृत पाटील सिंदगाव, भारतीय किसान संघ तुळजापूर तालुका अध्यक्षपदी अभिजीत पांढरे सिंदफळ, लोहारा तालुका अध्यक्षपदी काशिनाथ लकडे जेवली, कळंब तालुका अध्यक्षपदी गणेश अडसूळ इटकुर, वाशी तालुका अध्यक्षपदी संग्राम नन्नवरे वाशी, धाराशिव तालुका अध्यक्षपदी सुधाकर केवळराम सुभा यांच्या नियुक्त्या केल्याची घोषणा भारतीय किसान संघ महाराष्ट्र प्रांत निवडणूक अधिकारी रावसाहेब शहाने पाटील यांनी केली.

## ग्रामीण भागातील युवकांची जिद्द व अपार कष्ट करण्याची तयारी हवी : डॉ.प्रसाद देवधर यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२४ ऑगस्ट -**



ग्रामीण भागामध्ये सुद्धा आजच्या युवकांसाठी खूप काही करण्यासारखे आहे परंतु त्यासाठी जिद्द व अपार कष्ट करण्याची तयारी हवी ,ग्रामविकासाच्या संकल्पनेत बायोगॅस निर्मिती मधून स्त्रियांचा स्वयंपाक करण्याचा वेळ वाचला व त्या वेळेमध्ये स्त्रियांना इतर गोष्टी बचत गटाच्या माध्यमातून शिकवण्यात आल्या त्यामुळे स्त्रिया स्वावलंबी झाल्या आहेत त्यांचे आर्थिक उत्पन्न वाढले आहे. अशी बायोगॅस निर्मिती प्रकल्पाची यशोगाथा त्यांनी विषद केली. असे सामाजिक कार्य करत असताना ते सुद्धा प्रोफेशनली केले पाहिजे. प्रत्येक कार्य करत असताना शास्त्रीय दृष्टिकोन व गणिताची सांगड घालून केल्यास यश प्राप्ती होते. ग्रामीण भागामध्ये सुद्धा आजच्या युवकांसाठी खूप काही करण्यासारखे आहे परंतु त्यासाठी जिद्द व अपार कष्ट करण्याची तयारी हवी. विद्यार्थ्यांनी आपला वेळ मोबाईल मध्ये वाया न घालता, त्या वेळेमध्ये नवीन गोष्टी आत्मसात केल्या पाहिजेत, असे मोलाचे मार्गदर्शन डॉ. प्रसाद देवधर यांनी केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ उपपरिसर, धाराशिव येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांचा ग्राम विकासामध्ये सहभाग या विषयावर डॉ. प्रसाद देवधर, भागीरथ ग्रामविकास प्रतिष्ठान, सिंधुदुर्ग यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमाला ज्येष्ठ पत्रकार देविदास पाठक, सिनेट सदस्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजी नगर हे अध्यक्ष म्हणून तर डॉ. जितेंद्र कुलकर्णी, विभाग प्रमुख जैवतंत्रज्ञान विभाग व डॉ. मकरंद चौधरी, जिल्हा समन्वयक, राष्ट्रीय सेवा योजना धाराशिव जिल्हा त्यांची प्रमुख उपस्थिती लाभली. सदरील कार्यक्रम विद्यापीठ उपपरिसराचे संचालक डॉ. पी.पी. दीक्षित यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपा मध्ये देविदास पाठक यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवून कार्य करावे. जे की ग्रामीण भागातील जनतेसाठी उपयोगी पडेल.

डॉ. प्रसाद देवधर सारखे व्यक्ती हे समाजाला प्राप्त झालेले रत्न आहेत. त्यांचा आदर्श ठेवून विद्यार्थ्यांनी समाजासाठी कार्य करावे. असे प्रतिपादन देविदास पाठक यांनी आपल्या मार्गदर्शना मध्ये केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. मेघश्याम पाटील यांनी केले. प्रास्ताविकानंतर भागीरथ ग्राम विकास प्रतिष्ठान च्या कार्यासंबंधी चित्रफीत दाखवण्यात आली. ज्या मधून विद्यार्थ्यांना त्यांच्या कार्याविषयी माहिती मिळाली. डॉ. प्रसाद देवधर यांनी आपल्या विविध प्रकल्पान विषयी माहिती दिली.

कार्यक्रमाचे आभार डॉ. जितेंद्र कुलकर्णी यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वीते साठी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. राहुल खोब्रागडे यांनी प्रयत्न केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रतीक्षा भातलवंडे यांनी केले.

## महिलांसाठी न्यु होम मिनिस्टर कार्यक्रमाचे आयोजन; अशोक जगदाळे यांची निवडणूकीची जोरदार तयारी

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२४ ऑगस्ट -**

महाविकास आघाडीचे नेते तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गटाचे प्रदेश कार्यकारीणी सदस्य अशोक जगदाळे यांनी विधानसभा निवडणुकीची जोरदार तयारी सुरु केली असुन त्यांनी तुळजापुर तालुक्यातील आठ जि.प.गटात सध्या महाराष्ट्रात प्रसिद्ध असलेल्या सिनेभिनेते क्रांती नाना मळेगावकर व टीव्ही स्टार सह्याद्री मळेगावकर यांचा खास महिलांसाठी न्यु होम मिनिस्टर या कार्यक्रमाचे आयोजन करून आठ जि.प.गटातील ४० हजार महिलांशी संवाद साधला आहे. या कार्यक्रमास महिलांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला असल्यामुळे विधानसभा निवडणुकीत याचा अशोक जगदाळे यांना मोठा फायदा होणार असल्याचे दिसुन येत आहे.

येत्या एक, दोन महिन्यात महाराष्ट्रात विधानसभा निवडणुक होणार आहे या निवडणुकीसाठी सर्वच राजकीय पक्षांकडुन सध्या जोरदार मोर्चेबांधणी करण्यात येत आहे. अनेक राजकीय पक्षांकडुन निवडुन येणाऱ्या उमेदवारची चाचपणी केली जात आहे. यावेळी आई तुळजाभवानीच्या तुळजापुर विधानसभा मतदार संघातही अनेक इच्छुक उमेदवारांनी निवडणुकीची जय्यत तयारी सुरु केली आहे. यामध्ये सर्वात पुढे महाविकास आघाडीचे नेते अशोक जगदाळे हे आहेत. मागच्या विधानसभा निवडणुकीत पहिल्यांदाच विधानसभेची निवणुक लढवितांना अशोक जगदाळे यांनी तब्बल ३७ हजार इतके मतदान घेऊन सर्वांनाच आश्चर्यचकीत केले होते. पहिल्यांदा निवडणुक लढविताना तुळजापुर विधानसभा मतदार संघात इतके मतदान आजपर्यंत कुणालाच घेता आले नाही ही वस्तुस्थिती आहे.



मागच्या विधानसभा निवडणुकीत झालेला पराभव विसरून अशोक जगदाळे यांनी आगामी होणाऱ्या विधानसभा निवडणुकीची जोरदार तयारी सुरु केली आहे. सध्या हिंदु धार्मियांचा पवित्र श्रावण महिना सुरु आहे. या महिन्यात खास महिलांसाठी अशोक जगदाळे यांनी सिनेभिनेते क्रांती नाना मळेगावकर व टीव्ही स्टार सह्याद्री मळेगावकर यांचा न्यु होम मिनिस्टर या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. आतापर्यंत तुळजापुर तालुक्यातील अणदुर, सावरगाव, काटी, तामलवाडी, अपसिंगा, मंगरूळ, कटगाव आणि काक्रंबा या आठ जि.प.गटात हे कार्यक्रम झाले आहेत. याला महिलांचा प्रचंड मोठा प्रतिसाद मिळाला आहे.

जवळपास ४० हजार महिलांशी संवाद साधला आहे. जुना तुळजापुर विधानसभा मतदार संघ जळकोट जि. प. गट वगळता आज अशोक जगदाळे यांनी अक्षरक्षा पिंजुन काढला आहे. अशोक जगदाळे यांनी केवळ महिलांसाठी न्यु होम मिनिस्टर हा कार्यक्रम आयोजित करून थांबले नाहीत तर प्रत्येक कार्यक्रमात स्पर्धेतील अकरा विजेत्या महिलांना विशेष वस्तु भेट तर कार्यक्रमासाठी उपस्थित असलेल्या प्रत्येक महिलेला संसारात उपयोगी पडेल अशी एक चांगली वस्तु भेट दिली आहे.


### जाहीर नोटीस

**परंडा येथील जिल्हा न्यायालय-१, परंडा अपीलाच्या सुनावणीसाठी निश्चित केलेल्या दिवसाची नोटीस,**

रेग्युलर दिवाणी अपिल क्र.३६/२०२३

Sukhadeo / Vitthal

Respondent :-

2.Dattau Nivrutti Diwate (Died) through his Lrs.2/2.Nita Balasaheb Yadav

Age-45 yrs

R/o.Sirsav Tal- Paranda Dist -Dharashi (Osmanabad)

तुम्हास नोटीस देण्यात येते की नियमीत दिवाणी दावा क्र १७/२००४ विठठल विरुध्द दत्तु या प्रकरणांतील हुकुमनाम्यावर/आदेशावर अपेलेन्ट सुखदेव निवृत्ती दिवटे यांनी अपील सादर केले असुन ते या न्यायालयात नोंदविण्यात आले आहे तथापि सदर प्रकरणातील प्रतिवादी क्र.**२. दत्तु निवृत्ती दिवटे** नयत झालेले आहेत त्यामुळे प्रतिवादी क्र.२ चे वारस आपण असल्याचे या न्यायालयाकडे अर्ज दाखल केलेला असुन सदरचा अर्ज मंजुर होवुन सदरील अपिलामध्ये आपणास प्रतिवादी म्हणुन समाविष्ठ केलेले आहे. करीता सदरील अपिलावर सुनावणीसाठी **दिनांक १९/०९/२०२४** रोजी हा दिवस निश्चित केला आहे. तरी उपरोक्त दिवशी सकाळी १०.३० या न्यायालयात हजर रहावे. तुमच्यातर्फे तुम्ही स्वतः किंवा या अपीलाच तुमच्या तर्फे काम चालविण्यास विधीद्वारे प्राधिक केलेलेली कोणीही व्यक्ती हजर झाली नाही तर तुमच्या गैरहजेरीत त्या अपीलाची सुनावणी करून निकाल देण्यात येईल.

**आज दिनांक १६/०८/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.**

**स्वाक्षरित /-**
**(अधिक्षक)**
**जिल्हा न्यायालय-१. परंडा**
**(आदेशावरून)**


# भाजपा देणार मुली, महिलांसाठी मोफत ज्युडो कराटे प्रशिक्षण

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२४ ऑगस्ट -**

समाजातील काही विकृत मानसिकतेमुळे मुली आणि महिलांच्या मनात असुरक्षिततेची भावना निर्माण होत आहे. परंतु अशा परिस्थितीमध्ये हिम्मत न हारता आत्मविश्वासाने सामोरे जाणे अत्यावश्यक आहे. या गोष्टीचा विचार करून आ.राणा जगजितसिंह पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय जनता पक्षाचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य तथा धाराशिव नगरपालिकेचे माजी गटनेते युवराज नळे यांनी सामाजिक दायित्वाच्या भावनेतून दि १ सप्टेंबर पासून सायंकाळी पाच ते सहा या वेळेत सर्व प्रकारच्या वयोगटातील मुली आणि महिलांसाठी त्यांच्यात शारीरिक आणि मानसिक कणखरता निर्माण करण्यासाठी दोन महिने मोफत कराटे प्रशिक्षण देण्याचा निर्णय घेतला आहे. युवराज नळे हे कराटे क्षेत्रातील जुने अनुभवी मुख्य प्रशिक्षक (ब्लॅक बेल्ट ३ डिग्री) असून इंडियन तायक्कांदो अँन्ड किक बॉक्सिंग असोसिएशन या संस्थेच्या माध्यमातून त्यांनी यापूर्वी अनेक वर्षे कराटे मुख्य प्रशिक्षक म्हणून काम केलेले आहे. यामध्ये इतरही काही असोसिएशन सहकार्य करणार आहेत.

सद्यस्थितीत महिला व मुलींच्या मनात आत्मविश्वास निर्माण व्हावा व त्यांना स्वसंरक्षणाचे धडे मिळावेत, या उद्देशाने कराटे क्षेत्रातील सहकारी भास्कर ढगे, प्रविण गडदे, हरिदास रोकडे, रफिक शेख, सुनील शिंदे, रणजित कोकणे, तानाजी माने, हरिश सुर्यवंशी, वैष्णवी सरडे, अपूर्वा कुलकर्णी अशा काही ब्लॅक बेल्ट सहका-यांसह प्रशिक्षण देण्याचा हा निर्णय घेतला आहे. या प्रशिक्षण शिबिरात फिजिकल फिटनेस सह कराटे मधील स्वसंरक्षणाचे तंत्र, ज्युडो व लाठीकाठीचे प्रशिक्षणही देण्यात येणार आहे.

भाजपच्या वतीने आयोजित सदरच्या प्रशिक्षणासाठी कोणतेही शुल्क आकारले जाणार नसून दोन महिने प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. तरी ज्या महिला व मुलींना आत्मसंरक्षण व आत्मसन्मानासाठी कराटे प्रशिक्षण घ्यायचे आहे त्यांनी हरिदास रोकडे ७८४१०३४६२८, योगिनी फुगारे ९४०५६६०६०३ , ऋतुजा खरे ९३०७७८६७६५ व वैष्णवी सरडे ९४०३७०७५९१ या क्रमांकावर संपर्क साधून ३० ऑगस्टपर्यंत नाव नोंदणी करावी असे आवाहन युवराज नळे यांनी केले आहे.

तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# बिंदुसरा नदीला पहिल्यांदाच आलं पाणी



तभा वृत्तसेवा
बीड दि.२४ ऑगस्ट

दोन दिवसांपासून बीड जिल्ह्यामध्ये दमदार पाऊस पडू लागला. रात्री तालुक्यात संततधार पाऊस पडला. आज सकाळीही पाऊस झाला असून या पावसामुळे यंदाच्या पावसाळ्यात पहिल्यांदाच बिंदुसरा नदीला पाणी आलं. रात्रीपासून पडत असलेल्या पावसामुळे जिल्ह्यातील दहा मंडलात अतिवृष्टी झाल्याची नोंद करण्यात आली आहे.

जिल्ह्यात दोन दिवसांपासून दमदार पावसाला सुरुवात झाली. रात्री अनेक ठिकाणी धो धो पाऊस पडला. यात जिल्ह्यातील दहा मंडलामध्ये अतिवृष्टी झाली. यामध्ये बीड ७०.०, पाली ७५.३, नाळवंडी ७५.८, लिंबागणेश ७४.८, पाटोदा ७८.५, उमापूर ७५.८, नित्रूड ६७.५, बनसारोळा ६७.३, परळी ६५.३ आणि कवडगाव ६५.० या दहा मंडळांमध्ये अतिवृष्टी झाली आहे. बीड जिल्ह्यात दमदार पाऊस पडला नाही. त्यामुळे धरणात पाणी जमा झाले नाही. यंदाच्या पावसाळ्यात पहिल्यांदाच रात्रीच्या पावसाने बिंदुसरा नदीला पाणी आले होते.

# शिवसैनिकांनो, बीड विधानसभेवर शिवसेनेचा भगवा फडकविण्यासाठी दंड थोपटून मैदानात उतरा-मोरे

तभा वृत्तसेवा
बीड दि.२४ ऑगस्ट

तळागाळातील लोकांची जाण असणारे महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब सर्व सामान्य जनतेसाठी अहोरात्र काम करून लोकाभिमुख योजना राबवत आहेत. राज्याच्या हितासाठी मुख्यमंत्री शिंदे साहेब पुन्हा सत्तेवर येणे काळाची गरज आहे. याबरोबरच शिंदे साहेबांच्या नेतृत्व मार्गदर्शनाखाली शिवसेना पक्षाची यशस्वी वाटचाल सुरु आहे. जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप आणि सचिन मुळूक यांच्या कार्यपद्धतीवर सन्मानीय मुख्यमंत्री शिंदे साहेब प्रचंड खुश आहेत. अनिलदादा जगताप हा बीडकरांच्या मनावर राज्य करणारा आणि यंदाच्या विधानसभेचा प्रबळ दावेदार असल्याने आपल्या सर्वांची जिम्मेदारी आहे अनिलदादा यांना ताकद द्यायची. याबरोबरच बीड विधानसभेवर शिवसेनेचा भगवा फडकवण्यासाठी दंड थोपटून मैदानात उतरा, मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब यांनी महिलांसाठी राबविलेल्या लाडकी बहीण योजनेचा लाभ गावागावात पोहचवा, मुख्यमंत्री शिंदे साहेबांचे हात बळकट करण्यासाठी पूर्ण ताकदीने कामाला लागा असे शिवसेना जिल्हा संपर्क प्रमुख बाप्पुसाहेब मोरे यांनी पदाधिकारी शिवसैनिकांना आदेशित केले. शिवसेना मध्यवर्ती कार्यालय जालना रोड येथे काल दु. १.०० वाजताच्या दरम्यान शिवसेना जिल्हा संपर्क प्रमुख बाप्पुसाहेब मोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत जिल्हा आढावा बैठक संपन्न झाली.



या बैठकीकरिता शिवसेना युवासेना पदाधिकारी, महिला आघाडी, लोकप्रतिनिधी उपस्थित होते. या बैठकीचे प्रास्ताविक उप जिल्हप्रमुख संतोष जाधव यांनी केले तर शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप आणि सचिन मुळूक यांनी पदाधिकाऱ्यांना कार्यपद्धती बाबत सूचना मार्गदर्शन दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन शहर प्रमुख नंदकिशोर पिंगळे यांनी केले.

# बदलापूर घटनेच्या निषेधार्थ जिल्हाधिकारी कार्यालयासमोर महाविकास आघाडीचे आंदोलन



तभा वृत्तसेवा
बीड दि.२४ ऑगस्ट

बदलापूर घटनेच्या निषेधार्थ महाविकास आघाडीकडून पुकारण्यात आलेला बंद सध्या मागे घेण्यात आला असून, त्याऐवजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर काळ्या फिती, काळे झेंडे घेऊन धरणे आंदोलन करण्यात आले.यासाठी सर्व नागरिक, महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी आ.संदीप क्षीरसागर, माजी आ.उषा दराडे, माजी आ.सय्यद सलिम, खुर्शीद आलम, के.के.वडमारे, सुशील पिंगळे, मिनाक्षी देवकते, ॲड.हेमा पिंपळे, गणेश वरेकर, गणेश बजगुडे, परमेश्वर सातपुते यांच्यासह महाविकास आघाडीचे कार्यकर्ते, पदाधिकारी उपस्थित होते.

ठाणे जिल्ह्यातील बदलापूर येथे दोन चिमुलींवर त्या शिक्षण घेत असलेल्या शाळेतच लैंगिक अत्याचार झाल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. आणि या गंभीर प्रकरणावर पोलिसांनी दाबादाबी करण्याचा प्रयत्न केला होता. पीडितेची आई ज्यावेळी तक्रार दाखल करण्यासाठी पोलीस स्टेशन मध्ये गेली असता त्यांना तासनतास ठाण्यात बसवून ठेवण्यात आले. याउलट या प्रकरणाचा निषेध व्यक्त करण्यासाठी रस्त्यावर उतरलेल्या नागरिकांच्या विरोधात पोलिसांनी तातडीने गुन्हे दाखल केले. म्हणजे लहानग्या मुलींवर अत्याचार झाल्याचे गंभीर प्रकरण असताना त्यात पोलिसांनी अजिबात तत्परता दाखवली नाही या प्रकरणावर आवाज उचलणाऱ्या नागरिकांचा आवाज दाबण्यासाठी मात्र पोलीस तत्पर असल्याचे स्पष्ट झाले आहे. या सर्व प्रकारचा निषेध व्यक्त करण्यासाठी महाविकास आघाडीकडून आज शनिवार दि. २४ ऑगस्ट रोजी बंद पुकारण्यात आला होता. परंतु हा बंद भारतीय राज्यघटनेच्या मूलभूत अधिकारांच्या कक्षेत होता त्यामुळे मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी सदरचा बंद घटनाबाह्य असल्याचा निर्वाळा दिला आहे. सदरच्या निर्णयाविरुद्ध मा.सर्वोच न्यायालयात तातडीने दाद मागणे वेळेच्या मर्यादेमुळे शक्य नाही. त्यामुळे वरिष्ठांच्या आदेशानुसार आज शनिवार दि.२४ ऑगस्ट रोजीचा बंद मागे घेण्यात आला असून त्याऐवजी बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्यात आले.



परळी पांगरी येथील वाण नदीच्या पुराने पर्यायी नळकांडी पुल वाहून गेला आहे. यामुळे परळी, सिरसाळा, बीड या मार्गावरील वाहतूक ठप्प. (छाया-कृष्णा शिंदे)

# सभासदांच्या विश्वासावरच पतसंस्थेचे यश अवलंबून असते-डॉ.हेमंत वैद्य

**सावरकर कर्मचारी पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न**

बीड (प्रतिनिधी) एखाद्या सहकारी पतसंस्थेमध्ये काम करत असताना सभासदांचे हित जोपासताना पतसंस्थेने सामाजिक कार्यातही पुढाकार घ्यायला हवा, विश्वासाचे नाते निर्माण करायला हवे,सभासदांच्या विश्वासावरच पतसंस्थेचे यश निर्माण होत असते असे प्रतिपादन भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे कार्यवाह डॉ. हेमंत वैद्य यांनी केले.सावरकर कर्मचारी सहकारी पतसंस्थेची २३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक २१ ऑगस्ट २०२२ रोजी सावरकर महाविद्यालय संपन्न झाली. व्यासपीठावर पूर्णवादी बँकेचे अध्यक्ष डॉ. सुभाष जोशी, सावरकर संकुलाचे अध्यक्ष डॉ. पि.के कुलकर्णी, कार्यवाह डॉ.अविनाश देशपांडे, संस्थेचे मुख्य प्रशासकीय अधिकारी प्राध्यापक चंद्रकांत मुळे, प्रमोद कुलकर्णी, एस एन कुलकर्णी पतसंस्थेचे अध्यक्ष डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर सचिव शशिकांत पसारकर, उपाध्यक्ष डॉ. देविदास नागरगोजे, कोषाध्यक्ष उमेश जगताप यांची उपस्थिती होती. पुढे बोलताना डॉ.हेमंत वैद्य म्हणाले की सावरकर कर्मचारी पतसंस्थेने कर्मचाऱ्यांचे हित जोपासत योग्य रीतीने वाटचाल केलेली आहे. आपात कालीन परिस्थितीमध्ये पतसंस्थेने कर्मचाऱ्यांना साथ दिली आहे. यावेळी पूर्णवादी नागरी सहकारी बँकेचे अध्यक्ष डॉ. सुभाष जोशी यांचा सत्कार करण्यात आला. डॉ. सुभाष जोशी बोलताना म्हणाले की सार्वजनिक संस्थांमध्ये काम करत असताना विश्वस्त म्हणून भूमिका पार पाडावी लागते. सभासदांमध्ये विश्वास निर्माण करावा लागतो. सावरकर पतसंस्थेचे कार्य कौतुकास्पद आहे.



अध्यक्षीय समारोपात पतसंस्थेचे अध्यक्ष डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर यांनी विविध ठराव मांडले. सभासदांनी त्यास मंजुरी दिली. डॉ. बाहेगव्हाणकर म्हणाले की सभासदाचा विश्वास हाच पतसंस्थेचा आत्मा आहे. यापुढेही पतसंस्था सभासदांच्या हितासाठी प्रयत्न करेल. प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी १३ टक्के लाभांश सभासदांना देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. मान्यवरांचे स्वागत संचालक मोहन मंकले, अभिजीत पांडव यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कोषाध्यक्ष उमेश जगताप यांनी केले. अहवाल वाचन सचिव शशिकांत पसारकर यांनी केले. सूत्रसंचालन संचालक सचिन सानप यांनी केले. यावेळी पतसंस्थेच्या वतीने दहावी, बारावी परीक्षेमध्ये उज्वल यश संपादन करणाऱ्या सभासदांच्या पाल्यांचा सत्कार करण्यात आला.पद्य सुलक्षणा खणके यांनी सादर केले. कार्यक्रमाला पतसंस्थेचे सभासद उपस्थित होते.

# द केंब्रिज व्हॅली इंटरनॅशनल स्कूल गेवराई जिल्ह्यातुन सर्वोत्कृष्ट



तभा वृत्तसेवा
गेवराई दि.२४ ऑगस्ट

बालरंगभूमी परिषद मुंबई,यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या जल्लोष लोककलेचा ह्या नृत्य,वाद्य,संगीत ह्या स्पर्धेत द केंब्रिज व्हॅली इंटरनॅशनल स्कूल गेवराई च्या संघाने केलेल्या धनगरी नृत्य ह्या सांघिक नृत्य प्रकारात सर्वोत्कृष्ट कामगिरी करत,सांघिक प्रथम येत तब्बल ११०००/-हजार रू,प्रमाणपत्र,सन्मानचिन्ह मिळवले.

अधिक माहिती अशी की, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद मुंबई.यांची उपशाखा असलेल्या बालरंगभूमी परिषद मुंबई च्या अध्यक्षा सुप्रसिद्ध अभिनेत्री सौ.नीलम शिर्के - सामंत यांच्या संकल्पनेतून विविध केंद्रावर जल्लोष लोककलेचा ह्या नृत्य,वाद्य,संगीत स्पर्धा बालरंगभूमी परिषदेच्या उपाध्यक्षा तथा बालरंगभूमी परीषद शाखा बीड जिल्हा अध्यक्षा डॉ.सौ.दिपाताई क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली व बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्षा सौ.नीलम शिर्के - सामंत यांच्या प्रमुख उपस्थितीत तसेच मध्यवर्ती शाखा मुंबई बालरंगभूमी परिषदेचे सर्व कार्यकारिणी सदस्य आणि बीड जिल्हा बालरंगभूमी परीषदेचे सर्व सदस्य रसिक प्रेक्षकांच्या प्रचंड प्रतिसादात बीड येथील सौ.के.एस.के महाविद्यालयात मोठ्या उत्साहात संपन्न झालीं ह्यात जिल्ह्यातील तब्बल २००० च्या वर बालकलावंतांनी सहभाग नोंदवला.ह्या स्पर्धेत गेवराई येथील नृत्य दिग्दर्शक श्री.दिपक जी गिरी सर यांच्या नेतृत्वात द केंब्रिज व्हॅली इंटरनॅशनल स्कूल गेवराई च्या चमूने अस्सल लोककलेची सांस्कृतिक परंपरा जपत मंगळागौर,धनगरी नृत्य व महाराष्ट्राची शान शाहिरी पोवाडा सादर करून उपस्थितांचे मन जिंकले, पार्थ पवार ह्या विद्यार्थ्याने सादर केलेल्या शाहिरी पोवाडा ह्या कलाप्रकारासाठी उत्तेजनार्थ पारितोषिक मिळवले. व सांघिक नृत्य प्रकारात धनगरी नृत्यासाठी रुपये ११०००/- प्रमाणपत्र,सन्मानचिन्ह असं प्रथम पारितोषिक मिळवत सर्वोत्कृष्ट संघाचा बहुमान मिळवला. ह्या स्पर्धेत शुभ्रा पवार,ओवी वावरे, राजनांदिनी धोत्रे, शिवानी पल्लेवाड, ऋतुजा टेकाळे, ईश्वरी गणगे, ज्ञानेश्वरी बेद्रे, श्रुतिका मोरे, विर चव्हाण, सोहन फिसके, ओमकार खटके, रणवीर सोळुंके, कृष्णा शेळके, कार्तिक धोत्रे, गजानन सांगडे, अमर दिवटे, संस्कार आखरे, ओम माळवदे, नैतिक धार, सार्थक महानोर ह्या विद्यार्थ्यांनी यशस्वी सहभाग नोंदवून विजय मिळवला..त्याबद्दल संस्थेचे अध्यक्षा ,प्राचार्य डॉ वर्षा मोटे व, सर्व शिक्षक तथा शिशिकेत्तर कर्मचारी यांनी ही अभिनंदन केले.

# परळी मतदारसंघातील बेरोजगारांसाठी नौकरीची सुवर्णसंधी २५ ऑगस्ट रोजी रोजगार महोत्सवाचे आयोजन

**या भव्य रोजगार महोत्सवात हजारो युवक-युवतीनी सहभागी व्हावे- सुनिल गुट्टे**

तभा वृत्तसेवा
परळी वैद्यनाथ दि.२४ ऑगस्ट



परळी मतदारसंघातील युवक-युवती व बेरोजगारांसाठी नोकरीच्या संधी मिळाव्यात म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार)च्या ज्येष्ठ नेत्या सौ.सुदामती गुट्टे यांच्या मार्गदर्शनाखाली उद्योजक सुनील रत्नाकर गुट्टे यांनी रविवार दि.२५ ऑगस्ट रोजी परळी येथे नोकरी महोत्सवाचे आयोजन केले असुन या रोजगार महोत्सवात युवक-युवतींनी सहभागी व्हावे असे आवाहन आयोजक सुनिल गुट्टे यांनी पत्रकार परिषदेत केले. रविवार दि.२५ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी ९ ते ६ या वेळेत हा रोजगार महोत्सव होणार आहे.यात ५ वी पास ते सर्व पदवीधर,पदव्युत्तर, आय.टी. आय,डिप्लोमा आणि अंतिम वर्ष पदवी शैक्षणिक पात्रता असणाऱ्या युवक-युवती व बेरोजगारांना नोकरीची संधी मिळणार आहे.या महोत्सवात ५० पेक्षा अधिक नामांकित कंपन्यांचा सहभाग असणार आहे.या नौकरी महोत्सवात ऑनलाइन नावनोंदणीसाठी स्कॅनर स्कॅन करून नोंदणी किंवा ७८२२८३२५८३ ८७८८३४५८५० या मोबाईल क्रमांकावर संपर्क करुन नोंदणी करावी. हा रोजगार महोत्सव मराठवाड्यातील सर्वात मोठा ठरणार असुन याचा परळी मतदार संघातील युवक-युवती व बेरोज गारांनी लाभ घ्यावा असे आवाहन सुनिल गुट्टे यांनी केले आहे.

# नानाजी देशमुख विद्या मंदिरमध्ये रक्षाबंधनाचा कार्यक्रम उत्साहात

तभा वृत्तसेवा
बीड दि.२४ ऑगस्ट



दीनदयाल शोध संस्थान संचलित, नानाजी देशमुख विद्यामंदिर बीड येथे राखी पौर्णिमेनिमित्त दि.२३.८.२४ शुक्रवार रोजी रक्षाबंधनाच्या कार्यक्रमाचे आयोजन केलेले होते. बहिण भावाच्या पवित्र नात्याचा सण मानला जातो आणि आपली संस्कृती जपणं हे आपल्या शाळेचा प्रथम उद्देश आणि कर्तव्य आहे. त्या अनुषंगाने राखी पौर्णिमेचा कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सोनसाले ताई यांनी केले. कार्यक्रमाला मार्गदर्शिका म्हणून लाभलेल्या श्रीमती सुनंदाताई कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना राखी पौर्णिमेचे महत्त्व सांगितले. इयत्ता पहिली ते सातवीचे विद्यार्थी राखी बांधण्यासाठी आणि बांधून घेण्यासाठी अतिशय उत्सुक होते. त्यांनी एकमेकांना राखी बांधल्यानंतर देण्यासाठी भेटवस्तू देखील आणल्या होत्या. किती सुंदर आणि निरागस भावना मनात ठेवून मुलींनी मुलांना राख्या बांधल्या. एवढेच नव्हे तर दीनदयाल शोध संस्थान येथील कार्यकर्ते यांना शाळेतील शिक्षिका यांनी राखी बांधून कार्यक्रमाचा आनंद अजून द्विगुणीत केला. श्रीमती सुनंदाताईंनी सुद्धा राखी बांधण्याच्या कार्यक्रमात स्वतः उत्स्फूर्त सहभाग घेतला. तसेच सर्व विद्यार्थ्यांना राखी बांधून झाल्यानंतर खाऊ देण्यात आला. या कार्यक्रमाला सुनंदाताईंचे मार्गदर्शन लाभले तसेच नानाजी देशमुख विद्या मंदिर च्या प्रभारी मुख्याध्यापिका सौ. अर्चनाताई मोराळे व सर्व शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले.

# अखंड हरिनाम सप्ताह

तभा वृत्तसेवा
केज दि.२४ ऑगस्ट

केज तालुक्यातील जीवाची वाडी येथे अखंड हरिनाम सप्ताह,ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा व काकडा भजन दैनंदिन कार्यक्रम कार्यक्रम पुढील प्रमाणे आरंभ दि. २ज/ज८/२०२४ ते २७/ज८/ २० २४ किर्तनरूपी सेवा रात्री ज९ते ११ वा.पुढील प्रमाणे मंगळवार ह.भ.प.श्री. बालाजी महाराज मुंडे. बुधवार ह.भ.प.श्री.केशव महाराज घुले,शास्त्री. गुरुवार ह.भ.प.श्री.संतोष महाराज वनवे. शुक्रवार ह.भ.प.श्री.आप्पासाहेब महाराज चौरे. शनिवार ह.भ.प.श्री. व्याकरणाचार्य अर्जुनजी महाराज लाड(गुरुजी) रविवार ह.भ.प.श्रीराम महाराज चोले(खडकी) सोमवार ह.भ.प.श्री.विठ्ठल महाराज चौरे(पंढरपूर) मंगळवार दि.२७ रोजी सकाळी ज९ते ११:जज वा.ह.भ.प.श्री. बालयोगी हरिहर महाराज (दिवेगावकर)यांचे अमृतुल्य काल्याचे किर्तन व नंतर महाप्रसाद होईल. आयोजक:ग्रामस्थ जीवाचीवाडी



नांदेड- विष्णुपूरी प्रकल्पाच्या पाणलोट क्षेत्रात पाण्याची वाड झाल्याने शनीवारी सायंकाळी प्रकल्पाचे दोन दरवाजे उघडण्याज आले. या दरवाज्यातुन ८९६ क्युमेक्स वेगाने पाण्याचा विसर्ग होत आहे.

## महिला पत्रकारास अपमानस्पद वागणूक दिल्या प्रकरणी मुदखेड पत्रकार संघाच्या वतीने निषेध

**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड,२४ ऑगस्ट -**



बदलापूर येथील महिला पत्रकार यांना धमकी तसेच अपमानस्पद वागणूक दिल्या प्रकरणी मुदखेड तालुका मराठी पत्रकार संघाच्या वतीने तीव्र निषेध करण्यात आला.

बदलापूर याठिकाणी वार्ताकन करण्यासाठी पत्रकार मोहिनी जाधव गेले असता माजी नगराध्यक्ष वामन म्हात्रे यांनी असभ्य भाषेत अपमान करत धमकी दिली व अर्वच्य भाषेत शिवीगाळ करणाऱ्या वामन म्हात्रे यांना तात्काळ अटक करून ठोस कारवाई करण्यात यावी. लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ म्हणुन पत्रकार ओळखला जातो या प्रकारच्या घटनामुळे घटना म्हणजे लोकशाहीची पायमल्ली तसेच आवाज दाबण्याचा प्रयत्न केला जात आहे.सदर प्रत पत्रकारांच्या भावना लक्षात घेऊन राज्याचे मुख्यमंत्री तसेच उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री यांना पाठविण्यात यावी व शासनाने या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन पत्रकार मोहीनी जाधव यांना न्याय मिळवुन देण्यात यावे असे निवेदन तालुका मराठी पत्रकार संघाच्या वतीने नायब तहसीलदार संतोष कामठेकर यांना निवेदन देण्यात आले.

यावेळी मराठी पत्रकार संघाचे जिल्हा संघटक प्रताप देशमुख तालुकाध्यक्ष सिद्धार्थ चौदंते, शेख अजगर हुसेन साब, दिनेश शर्मा, अतिक अहेमद, साहेबराव हौसरे, शेख जब्बार, शेख शमशोद्दीन यासह आदि पत्रकार बांधव उपस्थीत होते.

# लोहा शहरात ओबीसीच्या एल्गार सभेचे आयोजन



**तभा वृत्तसेवा**
**लोहा,२४ ऑगस्ट -**

मराठा समाजाला वेगळे आरक्षण द्या.ओबीसी प्रवर्गातून नको अशी भूमिका घेऊन. वडीगोद्री येथे ओबीसी उपोषणकर्ते प्रा. लक्ष्मण हाके व नवनाथ वाघमारे यांची २७ ऑगष्ट रोजी राधाई मंगल कार्यालय येथे ओबीसींची एल्गार सभा आयोजित केली आहे या सभेचे आयोजक व संयोजक समितीचे माजी लोकायुक्त नगराध्यक्ष गजानन सावकार सूर्यवंशी, ग्रामीण शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ.संजय पवार यांनी माहिती दिली

लोहा शहरात २७ ऑगष्ट रोजी राधाई मंगल कार्यालय येथे ओबीसींची एल्गार विराट सभा आयोजित केली आहे.

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटिल यांनी पुन्हा उपोषण करुन ओबीसी मधुनच आरक्षणाची मागणी केली.मराठा समाजाला वेगळं आरक्षण द्यावे अशी भूमिका घेऊन ओबीसी नेते प्रा. लक्ष्मण हाके यांनी जालना जिल्ह्यातील वडीगोद्री येथे उपोषण करून विरोध केला.यांच्या उपोषणाला मराठवाड्यातून भरभरून ओबीसी बांधवांनी प्रतिसाद दिला. ओबीसी समाजाची एकजुट व समाज एकत्रीकरणा साठी प्रा.लक्ष्मण हाके व वाघमारे यांनी मराठवाड्यात दौऱ्याला सुरुवात केली असुन यांची २७ ऑगस्ट रोजी लोहा शहरात ओबीसीची एल्गार सभा आयोजित केली आहे.

राज्यातील ओबीसी समाजाच्या आरक्षणाला धक्का लागू नये म्हणून वंचित बहुजन आघाडीचे सर्वेसर्वा प्रकाश आंबेडकर यांनी ओबीसी समाजाला पाठिंबा दर्शवत महाराष्ट्रात आरक्षण बचाव यात्रा काढली होती .त्याच अनुषंगाने २ऑगस्ट रोजी लोहा शहरात या यात्रेचे उत्स्फूर्तपणे ओबीसी समाजाने स्वागत केले. शहराच्या परंपरेनुसार खारीक खोबर्याचा हार घालुन भव्य सत्कार करण्यात आला या आरक्षण बचाव यात्रेमुळे ओबीसी समाज जागृत झाला त्यांच्यामध्ये नवचैतन्य निर्माण आहे.

कंधार लोहा तालुक्यातील ओबीसी समाज एकवटला पाहिजे .या करिता गजानन सावकार सूर्यवंशी व डॉ.संजय पवार, चंद्रसेन पाटील सुरनर सातत्याने परिश्रम घेत आहेत. ओबीसीचा मोरक्या प्रा.लक्ष्मण हाके व नवनाथ वाघमारे यांची एल्गार जाहीर सभा २७ ऑगष्ट रोजी राधाई मंगल कार्यालय येथे दुपारी १२ वा. होणार आहे. सभेपूर्वी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर चौक ते छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यापर्यंत शहरातून भव्य मिरवणूक निघणार आहे. शहरातील महामानवांना अभिवादन केल्यानंतर या मिरवणुकीचे जाहीर सभेत रूपांतर होणार आहे. या एल्गार सभेसाठी कंधार व लोहा तालुक्यातील सकल ओबीसी समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे आसे आहवान केले आहे..या पत्रकार परिषदेला माधवराव मुसळे, उत्तम चव्हाण, आंगत केंद्रे ,सुदरसीग जाधव, बि एस मुंडे , रमेश माळी ,युवराज वाघमारे ,दत्ताभाऊ शेटे,केरबा केंद्रे, प्रभाकर केंद्रे, डॉ विश्वनाथ राठोड, विश्वनाथ गरजे, विठ्ठल खाडे, अशोक गीते यांची उपस्थित होती.

# सुधाकर भोयर यांना हटविण्यासाठी हदगाव- हिमायतनगरचे पदाधिकारी एकवटले

**तभा वृत्तसेवा**
**हदगाव,२४ ऑगस्ट -**

हदगाव - हिमायतनगर भाजपा विधानसभा प्रवास प्रमुख पदी सुधाकर भोयर यांची नियुक्ती करण्यात आल्यानंतर हदगाव-हिमायतनगर तालुक्यातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर असंतोष उफळून आला होता तर दिवसेंदिवसे कार्यकर्त्यांमध्ये मोठ्या प्रमाणात नाराजी उमटत होती. त्याच अनुषंगाने प्रथम हदगाव व त्यानंतर हिमायतनगर येथे स्वतंत्ररित्या बैठक घेऊन दुसऱ्यांदा सुधाकर भोयर यांना पदावरून पायउतार करण्याकरिता भाजपाचे दोन्ही तालुक्यातील पदाधिकारी व हजारो कार्यकर्ते



लवकरच ही मागणी घेऊन मुंबईत धडकणार असून या ठिकाणी भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेऊन निवेदन देतील त्यानंतर जिल्हा पातळीवरील नेते खा. अशोक चव्हाण, माजी खा. प्रतापराव पा. चिखलीकर, विक्रांत पाटील, संघटन मंत्री संजय कौडगे, उत्तरचे जिल्हाध्यक्ष किशोर देशमुख, तसेच रामदास पा. सुमठाणकर यांना सुद्धा निवेदन देण्यात येईल. सदरील निवेदनावर दोन्ही तालुक्यातील पदाधिकारी यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीत हिंगोली मतदारसंघात युतीच्या उमेदवारास इतर विधानसभापैकी हदगाव-हिमायतनगर मतदारसंघात बरोबरीने मतदान करून घेण्यासाठी बूथ प्रमुख, शक्ती केंद्रप्रमुख, सुपर वॉरियर्स, भाजपाचे सर्व आजी - माजी पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी प्रचंड मेहनत घेतली. भाजपास या मतदारसंघात अत्यंत पोषक वातावरण असताना सुद्धा शंभर किलोमीटर दूर असलेल्या मतदारसंघातील व्यक्तीची निवड होणे ही बाब पदाधिकारी व कार्यकर्ते यांना रुचली नाही. तरी झालेली निवड रद्द करून स्थानिक तालुक्यातील एका सामान्य कार्यकर्त्यांची निवड करावी जेणेकरून त्याचा संपूर्ण फायदा पक्षाच्या संघटन वाढविण्यासाठी होईल म्हणून आमच्या भावना लक्षात घेऊन ही निवड तात्काळ रद्द करावी अशी ही मागणी यावेळेस करण्यात येणार असल्याची माहिती मिळाली.

**सुधाकर भोयर यांचा कार्यकाळ राहिला वादग्रस्त**

सुधाकर भोयर हे यापूर्वी जिल्हाध्यक्ष पदावर असताना हदगाव-हिमायतनगर तालुक्यामध्ये पदाचा गैरवापर करून वरिष्ठांना विश्वासात न घेता स्वतःची मनमानी करून दोन्ही तालुक्यांमध्ये अंतर्गत गटबाजी केल्यामुळे ही गटबाजी आता कुठेतरी निवळत असताना पुन्हा त्याच व्यक्तीची निवड झाल्या असल्यामुळे संपूर्ण कार्यकर्त्यात असंतोष पसरला आहे.

# आ. भीमराव केरामांनी केली विकासकामांची पाहणी

**तभा वृत्तसेवा**
**किनवट,२४ ऑगस्ट -**

किनवट/माहूर विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार भीमराव केराम यांनी इस्लापूर परिसरात विकासात्मक कामाचा सपाटा लावला असून तब्बल एक कोटी ७५ लक्ष रुपयांच्या कामांना मंजुरी इस्लापूर या ठिकाणी देण्यात आली. त्यामध्ये समाज मंदिर रस्ते असे विविध कामे आमदार निधी व इतर योजनेच्या माध्यमातून टाकण्यात आली. विशेषतः गेल्या ३५ ते ४० वर्षापासून ग्रामस्थांकडून सातत्याने जिल्हा परिषद शाळेकडे गावातून जाणाऱ्या रस्त्याच्या मागणी पाठपुरावा केला होता पण अद्याप पर्यंत कुठल्याही लोकप्रतिनिधीने या बाबतीत लक्ष केंद्रित केले नव्हते. त्यामुळे विद्यार्थ्यांना मुख्य रस्ता सोडला तर कुठल्याही रस्त्याने शाळेला जाता येत नव्हते. त्यामुळे मुख्य रस्त्यावर सारखी वर्दळ असायची त्यामुळे अपघाताचे प्रमाण सुद्धा वाढले होते. सदरील कामावर प्रत्यक्ष जाऊन आमदाराने जातीने लक्ष वेधून या कामाची पाहणी केली.

या रस्त्यावरून ये जा करणाऱ्या शाळेतील विद्यार्थ्यांशी संवाद साधला विद्यार्थ्यांचे चेहऱ्यावरील हास्य पाहूण आमदारांनी समाधान व्यक्त केले. सदरील काम दर्जेदार पद्धतीने व वेळेच्या आत पूर्ण केल्याने केल्यामुळे या कामाचे गुत्तेदार विजय घोगरे यांचे सुद्धा त्यांनी कौतुक केले. इस्लापूर परिसरातील सर्वच कामी दर्जेदार स्वरूपाची व्हावी ही अपेक्षा सुद्धा त्यांनी याप्रसंगी व्यक्त केली. मतदारसंघांमध्ये कुठलेही विकासात्मक काम करताना मी जातपात बघितली नाही ना मला या गावातून किती मतदान पडले हे सुद्धा मी बघितले नाही मी लोकप्रतिनिधी असल्याने माझ्या मतदारसंघाचा



विकास करणे हे मी माझे कर्तव्य समजतो. विकासाच्या बाबतीत झालेल्या कामाची व शासनाच्या राबवण्यात येणारे योजनेची भाजपाच्या कार्यकर्त्यांनी माहिती तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचावी व निराधार चे प्रश्न असो लाडली बहिणीचे प्रश्न असो सोडवावीत अशा सूचना सुद्धा याप्रसंगी आमदार भीमराव केराम यांनी दिल्या. या कार्यक्रमाच्या प्रसंगी किनवट नगरपालिकेचे माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार, आदिवासी नेते गोविंद अंकुरवाड, माजी उपसभापती कपिल करेवाड, सा. पोलीस निरीक्षक उमेश भोसले, अभियंता श्रीराम पाटील, कमलबाई देशमुख, तालुका अध्यक्ष बालाजी आलेवार, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तुकाराम बोनगीर, मा.सरपच देविदास पळसपुरे, भाजपा सचिव काशिनाथ शिंदे, माधव बोंबले, राजलिंग चटणे पांडुरंग जाधव रमेश पडवळ, पेवे सर, सुर्यकांत बोधनकर, रवी कसबे, प्रकाश दंडे सरपंच प्रतिनिधी नारायण शिनगारे, ग्रामविकास अधिकारी शंकर गर्दसवार, श्रीधर रेड्डी, भूमेष किनी , संचालक सत्यनारायण जाधव, बालाजी काळे, यांच्यासह परिसरातील भाजपाचे अन्य पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अत्याचार करणाऱ्यांना तात्काळ फासावर द्या

**तभा वृत्तसेवा**
**हिमायतनगर,२४ ऑगस्ट -**

बदलापूर जिल्हा ठाणे येथील आदर्श विद्या मंदिरात शिक्षण घेणारी चार वर्षीय चिमुरडीवर शाळेतील सफाईगारांनी लैंगिक अत्याचार केल्याने संपूर्ण महाराष्ट्रात एकच खळबळ माजले आहे.एका लहान निरागस बालिकेवर अशा पद्धतीने अत्याचार जर होत असेल, तर या पुरोगामी महाराष्ट्राला लाजीरवाणी गोष्ट म्हणावी लागेल.तसेच चाकूर जिल्हा लातूर येथे सुद्धा साडेचार वर्षाचा बालकेवर सुद्धा लैंगिक अत्याचार करण्यात आला आहे.मौजे काजीखेड तालुका बाळापूर जिल्हा अकोला येथील माध्यमिक जिल्हा परिषद येथे शिक्षण घेणारे इयत्ता आठवी वर्गात असणारी मुलींला अश्लील व्हिडिओ दाखवत अत्याचाराचा प्रयत्न केला गेला आहे. अत्याचार करण्याचा प्रयत्न नराधम शिक्षक प्रमोद सरदार यांनी केल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले आहे.या वाढत्या घटनांमुळे शहरासह तालुक्यात लहान मुलींवर व शालेय युवती,मुलींना शाळेत व शिकवणी वर्गाकडे कसे पाठवावे?अशी चिंता पालक वर्गांना वाटत असल्याने, वाढत्या घटनेवरुन



मुलींचे कुटुंब भयभीत झालेआहे.दिवसेंदिवस महिला,युवती व लहान बालिकेवर मोठ्या प्रमाणात अन्याय,अत्याचार वाढतआहेत.यामुळे संपूर्ण महाराष्ट्रातील जनता भयभीत झालेली आहे. महाराष्ट्र राज्य कायद्याचे राज्य आहे की नाही?अशी भावना निर्माण झाली आहे.अत्याचार प्रकरणातील दोषीं नराधमाला कठोरातील कठोर फाशीची शिक्षा अतिजलद न्यायालयात प्रकरण चालवुन त्यांना लवकरात लवकर फाशी देण्यात यावी. अशी मागणी तालुक्यातुन आता समोर येत आहे.तसेच मोठ्या प्रमाणात ग्रामीण भागातुन शिक्षण घेण्यासाठी मुलीं,युवती शहरात येतआहेत. शहरातील परमेश्वर मंदिर देवस्थान परिसरात आणि हुतात्मा जयवंतराव पाटील विद्यालय, राजा भगीरथ विद्यालय,शासकीय आयटीआय परिसर, जिल्हा परिषद माध्यमिक शाळा या ठिकाणी शाळा सुरु होताना व शाळा सुटल्यानंतर रस्त्यावर पोलीस स्टेशन कडून कडक बंदोबस्त लावून, रोडवर टवाळखोरी करणाऱ्या मुलांवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी. यामुळे मुलीच्यां छेडछाडी, अत्याचार प्रकरणावरआळा बसेल,याची तातडीने दक्षता घेण्यात यावी.अशी मागणी एका निवेदनाद्वारे तहसीलदार पल्लवी टेमकर व पोलीस निरीक्षक अमोल भगत यांच्या केली आहे.

यावेळी परमेश्वर गोपतवाड ,श्रीदत्त पवार सोनारीकर,विलास वानखेडे, संजय माने, धोंडोपंत बनसोडे, अँड ज्ञानेश्वर पंदलवाड,निलेश चटणे, पंडित ढोणे,भानुदास पोपुलवाड ,शिरफुले पाटील, जाधव, सह अनेक जण उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त

### पुण्यजागर परिवाराच्या वतीने आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबीयां सोबत रक्षाबंधनाचे आयोजन

**अर्धापूर** -पुण्यजागर परिवार् व तालुका पत्रकार संघाच्या वतीने आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयां सोबत रक्षाबंधनाचा कार्यक्रम रविवारी (ता २५) आयोजित करण्यात आला आहे. पुण्यातील भोई फाऊंडेशने नांदेड जिल्ह्यातील आत्महत्या केलेल्या शेतकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक पालकत्व स्वीकारले आहे.गेल्या आठ वर्षांपासून पुण्यजागर हा शैक्षणिक प्रकल्प सुरू करण्यात आला आहे.शेतकरी कुटुंबातील सदस्यांशी भावनिक व स्नेह वृद्धिंगत करण्यासाठी दिवाळी, रक्षाबंधन, रंगोत्सव आदी सण उत्सव एकत्रित साजरे करण्यात येतात.यंदाचा रक्षाबंधनाचा कार्यक्रम नांदेड शहरातील श्री संत पाचलेगावकर महाराज अश्रामात रविवारी सकाळी अकरा वाजता होणार आहे.कार्यक्रमास भोई फाऊंडेशने अध्यक्ष डॉ मिलिंद भोई, महाराष्ट्र शासनाच्या पुरातत्त्व विभागाचे तांत्रिक अधिकारी हेमंत गोसावी, पल्लवी वाघ,गितांजली देगावकर, डॉ ज्योती पुरंदरे, बी आर कदम, बाजार समितीचे सभापती संजय देशमुख लहानकर, ॲड किशोर देशमुख आनंद बोंढाकर, इंजिनिअर विश्वांभर पवार, सामाजिक कार्यकर्ते सुधाकर टाक, दत्ता टोकलवाड यांची उपस्थिती लाभणार आहे.या कार्यक्रमास उपस्थित रहावे असे आवाहन पुण्यजागर. प्रकल्पाचे जिल्हा समन्वयक लक्ष्मीकांत मुळे, नागोराव भांगे, गुणवंत विरकर, निळकंठ मदने.साबेर शेख यांनी केले आहे.

### बदलापूर घटनेचा निषेध

**भोकर**-देशासह महाराष्ट्रात महिला व बालिकांवर झालेल्या अमानुष अत्याचारा विरोधात भोकर महाविकास आघाडी तर्फे दि.२४ रोजी काळ्या फिती बांधून शासनाच्या विरोधात डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक ते तहसील कार्यालयापर्यंत मूक रॅली काढण्यात आली व तसेच बांगड्या फोडून तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला. निवेदनाद्वारे दोषींना त्वरित फाशी देऊन पिडीतांना न्याय देण्याची मागणी करण्यात आली.यावेळी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष गोविंद पाटील गौड,शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे माजी जिल्हा उपप्रमुख सतीश देशमुख, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे तालुकाध्यक्ष अँड.शिवाजी कदम,सुभाष पाटील किन्हाळकर,सुरेश बिल्लेवाड,आप्पाराव राठोड, भीमराव दुधारे,काँग्रेस शहराध्यक्ष तौसिफ इनामदार, निळकंठ वर्षेवार, अँड.परमेश्वर पांचाळ, शिवसेना शहर प्रमुख पांडुरंग वर्षेवार,रमेश महागावकर, आनंद चिट्टे,यशोदाबाई शेळके,शकूंतला कदम कमल नर्तावार,आनंदाबाई चुनगुरवाड,सुरेखा माळे आदींची उपस्थिती होती.

## विविध मागण्यांसाठी सोमवारी रास्ता रोको

**तभा वृत्तसेवा**
**मुखेड,२४ ऑगस्ट -**

संविधान रक्षक समितीच्या वतीने जनसामान्यांच्या विविध मागण्यांसाठी आजपर्यंत डझनभर निवेदन व दोन वेळा तहसिल कार्यालयावर हजारो नागरिकांचा मोर्चा काढून ही तहसील प्रशासन कुंभकर्णी झोपेचे सोंग घेत आहे. याच्या निषेधार्थ व तालुक्यातील तलाठी, मंडळाधिकारी, ग्रामसेवक सज्जावर मुक्कामी रहावे यासाठी सोमवार दि.२७ ऑगस्त रोजी तहसिल कार्यालयासमोर रास्ता रोको व बेमुदत धरणे आंदोलन करणार असल्याचे निवेदन माजी जि.प.सदस्य तथा समिती संस्थापक दशरथराव लोहबंदे यांनी तहसिलदार राजेश जाधव यांना दिले.

## खासदार सुपुत्र प्रा. रविंद्र पाटील हेच नायगांव विधानसभेचे उमेदवा :प्रल्हाद ढगे

**तभा वृत्तसेवा**
**उमरी,२४ ऑगस्ट -**

नायगांव विधानसभा माजी आमदार तथा लोकसभेचे विदेमान खासदार यांचे सुपुत्र बुंडू पाटील उर्फ प्रा. रविंद्र चव्हाण यांना नायगाव मतदार संघात विद्यानसभेचे तिकीट मिळणार असून तेच योग्य आहेत असे प्रतिपादन उमरी काँग्रेस तालुकाध्यक्ष प्रल्हाद पाटील इज्यतगावकर यांनी प्रतिक्रीया दिली आहे.

प्रल्हाद पाटील ढगे पुढे म्हणाले की नामगाव विधानसभा २०२४ ची निवडणूक प्रा.रविंद्र चव्हाण हेच लढविणार असून. कांही राजकीय महत्वाकांक्षी लोक खा.वसंतराव चव्हाण यांचा प्रकृतीचा विषय घेऊन नायगांव मतदार संघात वेगळी चर्चा करीत असल्याचे कळते, कोणीही राजकीय व्यक्ती असो त्यांच्या प्रती अशा



दूख:द प्रसंगी समाजामध्ये माणुसकीला न-शोभणारी वक्तव्य करुन टपोरी राजकारण करणाऱ्यांना नेत्याना जनता कधीही माफ करणार नाही अनेक दू:ख पचविण्याची शक्ती चव्हाण परिवार नायगांवकर यांचेकडे ईश्वराने अगोदरच दिली असल्याने या प्रसंगातूनही सूखरूप बाहेर येतील अशी हजारो जनसमुदायाच्या प्रार्थनेतून नक्कीच बरे होतील. असा ठाम विश्वास आहे. खा.वसंतराव चव्हाण यांच्या प्रकृतीत दैनंदीन सूधारणा होत आहे.

येणाऱ्या नायगांव विधानसभा मतदार संघाची निवडणूक प्रा.रविंद्र चव्हाण हे भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसचे उमेदवार असतील व निवडणूक लढवतील. तेव्हा सध्याच्या आडचनीच्या प्रसंगाच्या माध्यमातून राजकीय पोळी भाजू पहाणाऱ्या कावेबाज दुबळ्या प्रकाराला कॉंग्रेस पक्षाचा कार्यकर्ता बळी पडणार नाही आणि चव्हाण परिवारावर प्रेम करणारा लाखो जनसमुदाय कोणत्याही प्रसंगी यांच्या सोबत खंबीरपणे उभा राहील यात काही शंका नांही असा विश्वास प्रल्हाद पाटील इज्जतगावर यांनी केला आहे . मतदार संघातील सर्व कार्यकर्ते चव्हाण परिवारांच्याच पाठीशीच आहेत असा ठाम विश्वास व्यक्त करतो असे ही म्हणाले


प्रा.रविंद्र वसंतराव चव्हाण हे दि. २५ व २६ ऑगस्ट रोजी नायगांव येथे कार्यकर्त्यांना भेटण्यासाठी उपस्थीत रहाणार आहेत. असे खा.वसंतराव चव्हाण जनसंपर्क कार्यालय नायगांव यांच्या वतीने कळविण्यात आले आहे प्रतिक्रीया दिली आहे.

# सकल मुस्लिम समाजाच्या वतीने नरसी बंदला चांगला प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**नायगाव,२४ ऑगस्ट -**

महम्मद पैगंबर यांच्या बद्दल रामगिरी महाराज यांनी अपशब्द वापरून दोन समाजात तेढ निर्माण केल्याबद्दल त्यास त्वरित अटक करा असे सकल मुस्लिम समाजाच्या वतीने आज दि. २३ ऑगस्ट रोजी शुक्रवारी सकाळी नरसीतील सर्व बाजारपेठ बंद ठेवून निषेध व्यक्त करण्यात आला. यावेळी पोलीस व मुस्लिम समाजात काही काळ तणाव निर्माण झाला होता.

नायगाव तालुक्यातील नरसी चौकात सकल मुस्लिम समाजाच्या वतीने बाजारपेठ बंद करण्यासाठी शंभर ते दीडशे लोकांनी पुढाकार घेऊन बाजारपेठ बंद करण्यासाठी



पुढे आले होते यावेळी रामतीर्थ पोलीस ठाण्याचे सपोनि श्रीधर जगताप यांनी सकल मुस्लिम समाजाच्या कार्यकर्त्यास स्वयंस्फूर्तीने जो कोणी दुकाने बंद ठेवत असेल त्यांना ठेऊ द्या ज्यांना चालू ठेवायची असतील त्यांना चालू ठेवू द्या असे म्हणाले असता मुस्लिम समाजातील कार्यकर्त्यांत व पोलीस यांच्यात काही वेळ तणाव निर्माण झाला होता.

सपोनी श्रीधर जगताप यांनी सकल मुस्लिम समाजाच्या कार्यकर्त्यांना जो तुम्ही आज बंद ठेवून निषेध करत आहात तो ऑलरेडी गुन्हा दाखल झालेला आहे जर तुमच्या आणखी काही मागणी असतील तर मी तसे वर कळवतो असे म्हणाले, तुम्ही आज बाजारपेठ बंद करण्यासाठी आलात ज्यांना बंद करायचा असेल ते स्वंयस्फुरतीने बंद करतील आणि ज्यांना चालू ठेवायचा असेल त्यांना चालू ठेवू द्या दमदाटी करायची नाही असे म्हणताच मुस्लिम समाजाच्या कार्यकर्त्यांनी आज आम्ही बाजारपेठ बंद करत असताना आम्हाला तुम्ही का करू देत नाही आणि दुसरा समाज कोणता जर त्यांच्या हक्कासाठी निषेध व्यक्त करण्यासाठी आमची दुकाने बंद ठेवायला सांगतात त्यावेळेस आम्ही बंद ठेवतो आज तुम्ही त्यांची दुकाने चालू ठेवा असे का मनत आहात, यावेळी सपोनि श्रीधर जगताप यांनी सकल मुस्लिम समाजाच्या कार्यकर्तास आपल्या आणखी काही मागण्या असतील तर ते आपण रितसर निवेदन द्यावे आम्ही वर कळवतो अशी समज देऊन आपण करत असलेला बंद व निषेध रीतसर करावा असे म्हणाले तेव्हा सकल मुस्लिम समाजाच्या कार्यकर्त्यांनी समाधान व्यक्त केले. व महंमद पैगंबर यांच्याविषयी अपशब्द वापरल्यामुळे सकल मुस्लिम समाजाच्या भावना दुखावल्या आहेत त्यासाठी रामगिरी महाराज यांच्यावर कारवाई करण्यात यावी तसेच लवकर अटक व्हावी अशा मागणीचे निवेदन देण्यात आले. यावेळी बंद दरम्यान सपोनि जगताप यांनी नरसी चौकात चोख पोलीस बंदोबस्त ठेवला होता.